यशवंतराव चव्हाण व्याख्यानमाला - १९८०



नगरपालिका नगरवाचनालय, कऱ्हाड

# यशवंतराव चव्हाण व्याख्यानमाला

923.60954
NAG
G04279

Y. B. CHAVAN LIBRARY
- MUMBAI -
CALL NO.
ACC. NO.: G04279
DATE: 8/6/2015

# यशवंतराव चव्हाण व्याख्यानमाला

वर्ष ८ वे १९८०.

Y.C.P.
923.60954/NAG
G04279
LIBRARY

किमत साडेसात रुपये

प्रकाशन :

**मा. तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्री जोशी.**

प्रमुख संपादक, मराठी विश्वकोश, वाई.

यांच्या शुभहस्ते

१२ मार्च १९८१.

प्रकाशन स्थळ :

कराड नगरपालिका कार्यालय, कराड.

प्रकाशक :

**श्री. आनंद आबाजी भिसे**

प्रशासक,

कराड नगरपालिका कराड.

मुद्रक :

**श्री. आनंदराव दादासाहेब पाटील**

२३९/२०, शनिवार पेठ, कराड.

मुद्रणस्थळ :

**कराड मुद्रणालय, कराड.**

२३९/२०, शनिवार पेठ, कराड.

---

**मुखपृष्ठ छपाई :** श्री. गजानन प्रिंटिंग प्रेस, मिरज.



# ा. यशवंतराव चव्हाण

# मनोगत

कराड नगरपालिकेने १९७३ मध्ये 'यशवंतराव चव्हाण व्याख्यानमाला' सुरू केली. १९८० सालातील यशवंतरावांच्या वाढदिवशी ज्या थोर विचारवंतांची व्याख्याने झाली, त्यांची ही मुद्रित प्रत वाचकांच्या हाती देताना मनाला एक समाधान वाटते.

साहित्य, सौंदर्य, संगीत, क्रीडा, करमणूक या समाज जीवनाला स्पर्श करणाऱ्या व समाधान देणाऱ्या गोष्टी आहेत. शारदीय व्याख्यानमालेच्या निमित्ताने कराड नगरपालिकेने या संदर्भात कराडची एक वैशिष्टयपूर्ण अभिरूची निर्माण केली आहे. त्याच बरोबर आजच्या गतिमान कालखंडात, नव्या पिढीतील समाजघटकांत चिकित्सक नि अभ्यासूवृत्ती वाढीस लागावी. सामाजिक, राजकीय, आर्थिक समस्यांचा आणि स्थित्यंतराचा परिचय व्हावा ही अत्यावश्यक बाब आहे. समाजातील विचारवंतांचे विचारधन मुक्तपणे उपलब्ध करून देण्याच्या हेतूने ही व्याख्यानमाला आयोजित केलेली आहे. एका प्रयत्नवादी, अभ्यासू नि यशस्वी अशा सर्वस्पर्शी व्यक्तिमत्वाच्या – संस्काराचे – विचारधन प्रसारणाचे एक अनन्यसाधारण कार्य नगरपालिकेने आजपावेतो कराडच्या जीवनात समाधानाने उभारले आहे.

या व्याख्यानमालेतील व्याख्यानातून यशवंतरावांच्या जीवनचरित्राची चर्चा होत रहावी हा तर प्रधान हेतू

मुळीच नाही. तर आजच्या भारतीय समाजाच्या नि राष्ट्रीय जीवनाच्या समस्या आव्हानाचे स्वरूप घेऊन आपल्यापुढे उभ्या राहिल्या आहेत त्या सामाजिक, राजकीय, आर्थिक समस्यांचा अभ्यासपूर्ण उहापोह अधिकारी व्यक्तींचा नियोजित व्याख्यानातून व्हावा, हाच प्रधान हेतू या व्याख्यानमालेचा आहे.

विचारवंतांच्या विचारांचे प्रसारण करणारे मुक्त व्यासपीठ म्हणून यशवंतराव चव्हाणांचे नाव या व्याख्यानमालेला देण्यात आलेले आहे. १९७२-७३ साली या विचारप्रसारण कार्याला 'यशवंतराव चव्हाण व्याख्यानमाला' या नामाभिधानाने शुभारंभ झाला. म्हणजे असा लोकजागरणाचा वसा घेऊन त्यांचा वाढदिवस हा प्रत्येक कराडकरांच्या जीवनातील एका ममत्वाच्या भावनेला हेलावणारा दिवस आहे.

सामाजिक, आर्थिक, राजकीय समस्यांचा परिचय होत राहिला, विचार–विवेक–विमर्श या विचारमंथनाच्या प्रक्रीया व्यक्तिच्या जीवनावर जर संस्कार करून गेल्या तर कोणता सामाजिक आविष्कार व्यक्त होतो त्याचे यशवंतरावजी चव्हाण हे मूर्तिमंत उदाहरण आहे. यशवंतरावांचे जीवनचरित्र हे नव्या पिढीला दीपस्तंभा-सारखे मार्गदर्शक ठरणारे आहे. महाराष्ट्रातील सामाजिक नि राजकीय चळवळीचे प्रवाह समजून देणारा एक खळाळून जीवन स्रोत ! अशा गतिमान व्यक्तिमत्वाच्या वाढदिवसानिमित्ताने जनजागरणाचा उपक्रम म्हणजे ही व्याख्यानमाला होय.

कराड नगरपालिकेचे समृद्ध आणि संपन्न ग्रंथसंख्या असणारे ग्रंथालय, हे कराडच्या लोकजीवनाचे एक उत्तम संस्कार धन आहे. नागरिकांच्या सोयीसाठी

आणि सौख्यासाठी या समृद्ध ग्रंथालयाचे स्थलांतर नगरपालिकेने नवीन बांधलेल्या वास्तूमध्ये लवकरच होत आहे. या नववास्तूमध्ये अभ्यासिका, महिलाविभाग, बालवाचक आणि संशोधकांचेसाठी स्वतंत्र दालने असून त्यामध्ये उत्तम फर्निचर, उत्तम बैठक व्यवस्था आणि अद्ययावत अशा सर्व सुखसोयींची व्यवस्था करण्यात आली आहे. त्यामुळे हे नवीन ग्रंथालय म्हणजे कृष्णा–कोयनेच्या प्रीतिसंगमावरील एक उत्तम संस्कारकेंद्र होणार आहे. आणि कराडच्या इतर वैशिष्ट्यात त्यामुळे उल्लेखनीय अशी भर पडणार आहे. हा अद्ययावतपणा वाचकांच्या आनंदात भर घालणारा ठरणार आहे. त्यासाठी अशा वाचकांची आणि सुखसोयींचा लाभ घेणाऱ्या रसिकांच्या आम्ही अभिलाषा बाळगून आहोत.

आमच्या निमंत्रणाला मान देऊन माननीय प्राचार्य डॉ. जनार्दन वाघमारे लातूर व माननीय श्री. प्रतापराव भोसले, भुईंज, ता. वाई या दोन थोर विचारवंतांनी या मालेत व्याख्याने दिली. त्याबद्दल त्यांचे कृतज्ञतापूर्वक आभार मानने आमचे कर्तव्य आहे.

हे 'शब्दांकित' स्वरूप प्रकट होताना प्रा. वि. पु. गोखले व डॉ. कन्हैया कुंदप यांनी जे परिश्रम घेतले आहेत त्यांचे आणि कराड मुद्रणालयाचे संचालक श्री. आनंदराव दादासो पाटील नि त्यांचे कुशल, मेहनती कामगार यांनी ही पुस्तिका वेळेवर व सुबक छापून दिली त्याबद्दल आम्ही त्यांचे आभारी आहोत.

या व्याख्यानमालेत जे जे विचारमंथन, चिंतन होईल ते ते त्याच विचारवंतांच्या भाषेत 'शब्दांकित' करण्याच्या हेतूने ही सर्व व्याख्याने प्रतिवर्षी पुस्तकरूपाने

प्रकाशित करून हा 'ज्ञानयज्ञ' खऱ्या अर्थाने 'अक्षर मुद्रांकित' करून हे सर्व तत्वचिंतन उपलब्ध करून ठेवले जावे हाही हेतू आहे. ही पुस्तिका समाज पुरुषाच्या हाती देताना एकच प्रार्थना –

मा. यशवंतरावजींना राष्ट्रसेवेसाठी उदंड आयुरारोग्य लाभो ! त्यांच्या जीवनाचा आदर्श नव्या पिढीला जीवनाची विधायक दृष्टी देणारा ठरो !

कराड, **पी. डी. पाटील,**
२ फेब्रुवारी १९८१. नगराध्यक्ष.

# ‘ अंतरंग ’

१० व ११ मार्च १९८०

## महाराष्ट्रातील राजकारण व समाजकारण : कालचे, आजचे व उद्याचे.

डॉ. जे. एम्. वाघमारे
प्राचार्य,
राजर्षी शाहू महाविद्यालय, लातूर.

१२ मार्च १९८०

## ‘ शेतीचे अर्थशास्त्र व त्यातील दुग्ध व्यवसायाचे स्थान ’

मा. श्री. प्रतापराव भोसले
माजी राज्यमंत्री,
महाराष्ट्र राज्य.



# महाराष्ट्रातील राजकारण व समाजकारण : कालचे, आजचे व उद्याचे.

–डॉ. जे. एम्. वाघमारे.

अर्वाचीन महाराष्ट्रातील समाजकारण व राजकारणाच्या प्रक्रियांचा शोध ब्रिटीश आमदानीच्या आरंभ काळापासून घ्यावा लागतो. इंग्रजी विद्या, इंग्रजी न्याय व्यवस्था आणि वैचारिक प्रबोधन या तीन प्रमुख गोष्टींनी महाराष्ट्राची सामाजिक व राजकीय मानसिकता घडविली आहे. इंग्रजी शिक्षण घेतलेल्या पहिल्या पिढीने समाज जागृतीचे व सुधारणेचे कार्य हाती घेतले. दुसऱ्या पिढीने समाजकारणाबरोबर राजकीय सुधारणांचा विचारही लोकापर्यंत पोहोचवला. १९ वे शतक संपेपर्यंत महाराष्ट्रात समाजकारण व राजकारण एकमेकांच्या हातात हात घालून वाटचाल करीत होते. पण पुढे त्याच्यात फाटाफूट झाली. गांधीयुगात मात्र राजकारणाला पुन्हा सामाजिक आशय प्राप्त झाला. दलितांच्या मुक्तिसंग्रामासाठी आंबेडकरांनी आक्रमक भूमिका घेतली. स्वातंत्र्य प्राप्तिनंतर सामाजिक सुधारणेची प्रक्रिया मंद झाली. सत्तास्पर्धेच्या राजकारणाने जातियतेसारख्या समाजविघातक गोष्टींना अधिक प्रोत्साहन दिले. त्यामुळे राजकारणाला आवश्यक असणारा सामाजिक आशय लुप्त होतो की काय याची भीती निर्माण झाली. ज्यांना सत्तेत पाय रोवता आले त्यांच्यातून एक नवीन वर्ग उदयास आला. दलित, पीडित आणि शोषितांच्या पदरात कसलाच लाभ पडला नाही. शिक्षण प्रसाराबरोबर लोकांच्या अपेक्षा मात्र खूपच वाढल्या. लोकसंख्येच्या भरमसाठ वाढीबरोबर आर्थिक विषमतेची दरीही खूपच वाढली. त्यामुळे मराठी समाजजीवनावर खूप मानसिक ताण निर्माण झाले. परिणामतः महाराष्ट्राचे मन दुभंगले. महाराष्ट्राचे सामाजिक व राजकीय मनही उद्याचा अपेक्षित महाराष्ट्र घडविण्यासाठी समाजकारण व राजकारण एकत्रित आले पाहिजे. प्रामुख्याने तीन प्रश्नांची सोडवणूक करणे आवश्यक आहे. दारिद्र्य रेषेखालील करोडो लोकांच्या भाकरीचा प्रश्न, माणुसकीला नकार देणारा अस्पृश्यतेचा प्रश्न आणि लोकशाही मूल्यांच्या विरोधात उभा असलेला व सामाजिक विघटनाला जबाबदार असलेला जातीवादाचा प्रश्न. हे प्रश्न सोडविल्याशिवाय भारतीय लोकशाहीला उज्वल भवितव्याची वाट सापडणार नाही.

# डॉ. जे. एम्. वाघमारे

शिक्षण : एम्. ए., एल्एल्. एम्., पीएच्. डी.

जन्म : १९३४ साली. सामान्य शेतकरी कुटुंबात.
लातूर , हैद्राबाद आणि पुणे येथे शिक्षण.

- सध्या लातूर येथे राजर्षी शाहू महाविद्यालयाचे प्राचार्य म्हणून काम करतात.
- इंग्रजी भाषा आणि साहित्याचे नामवंत प्राध्यापक म्हणून २१ वर्षाची सेवा. श्री छत्रपती शिवाजी कॉलेज, उमरगा, जि. उस्मानाबाद, डॉ. आंबेडकर कॉलेज औरंगाबाद आणि देवगिरी कॉलेज, औरंगाबाद या ठिकाणी अध्यापन कार्य त्यांनी केलेले आहे.
- इंग्रजी, मराठी आणि हिंदीतील नामवंत वक्ते म्हणून ते प्रसिद्ध आहेत. अनेक ठिकाणी त्यांनी सामाजिक, राजकीय, शैक्षणिक व साहित्यिक बिषयावर व्याख्याने दिलेली आहेत.
- प्रतिष्ठान, लोकवाङ्मय, अस्मितादर्श, पूर्वा, समाजप्रबोधन पत्रिका, मनोहर, माणूस, मराठवाडा, क्वेस्ट इ. नियतकालिकातून त्यांचं लिखाण प्रसिद्ध झालेलं आहे.
- 'अमेरिकन नीग्रो : साहित्य आणि संस्कृती' हे त्यांचे पुस्तक १९७८ मध्ये प्रसिद्ध झाले आहे.
- 'The Problem of Identity in the Postwar American Negro Novel' या विषयावरचा इंग्रजी साहित्यातला त्यांचा शोध प्रबंध मराठवाडा विद्यापीठाने १९८० साली पीएच्. डी. साठी मान्य केलेला आहे.
- मराठवाडा विद्यापीठाच्या विधिसभा, विद्वत्सभा, मानव्य विद्याशाखा, इंग्रजी अभ्यास समिती इ. मंडळाचे ते सभासद आहेत. महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक मंडळाच्या इंग्रजी अभ्यास मंडळाचेही ते सदस्य आहेत.
- मराठवाडा साहित्य परिषदेच्या कार्यकारिणीचे सदस्य, म. सा. प. लातूर शाखेचे अध्यक्ष, मराठवाडा विद्यापीठ प्राचार्य संघटनेचे अध्यक्ष, विषमता निर्मूलन परिषदेचे अध्यक्ष, समाज प्रबोधन संस्थेच्या कार्यकारिणीचे सदस्य आणि इतर अनेक सामाजिक व शैक्षणिक संघटनांचे सदस्य या नात्याने ते काम करीत आहेत.

पत्ता –
श्रमसाफल्यनगर,
अंबाजोगाई रोड,
लातूर – ४१३ ५१२.

वाघमारे

कराड नगरपरिषदेचे अध्यक्ष माननीय श्री. पी. डी. पाटील, नगरवाचनालयाचे ग्रंथपाल श्री. व्ही. व्ही. पाटील आणि बंधु-भगिनींनो :

आपल्या या शहरातील नगरपरिषदेच्या नगरवाचनालयाच्या वतीने माननीय श्री. यशवंतरावजी चव्हाण यांच्या नावाने १९७३ पासून प्रतिवर्षी व्याख्यानमाला आयोजित केली जाते ही अभिनंदनीय अशी गोष्ट आहे. कराडच्या या श्रेष्ठ नागरिकाचा वाढदिवस आपण या व्याख्यानमालेच्या रूपाने साजरा करता ही गोष्ट तर मला फारच नाविन्यपूर्ण व अर्थपूर्ण वाटते. अशा

प्रकारची व्याख्यानमाला कराडसारख्या छोटचा शहराच्या वैचारिक जीवनाची पातळी वाढविण्याच्या दृष्टीने महत्वाची ठरते यात शंकाच नाही. कराडची नगरपरिषद एक उत्कृष्ट वाचनालय चालविते आणि त्या वाचनालयाच्या वतीने ही व्याख्यानमाला दरवर्षी चालविली जाते ही बाब मला खरोखरच महत्वाची व मोलाची वाटते. अशा प्रकारचा अभिनव प्रयत्न महाराष्ट्रातील फारच थोडचा नगरपालिका करीत असाव्यात आपल्या या अभिजात उपक्रमाची माहिती होताच मला ग्रीक देशातील अथेन्स या प्राचीन नगरीची आठवण झाली. या ऐतिहासिक ग्रीकनगरीने आपल्या नागरिकांची सांस्कृतिक अभिरूची वाढविण्यासाठी आणि त्यांच्या सामाजिक व राजकीय जीवनाची पातळी उंचावण्यासाठी खूप प्रयत्न केले होते हे आपणास माहित असेलच. आपल्या नागरिकांची वैचारिकता घडविण्याचा एक शानदार व स्तुत्य प्रयास अथेन्स नगरीने केला होता. लोकशाहीच्या संकल्पनेचा विकास आणि तिचे परिपोषण या प्राचीन शहरात जेवढे झाले तेवढे क्वचितच दुसरीकडे कोठे झाले असेल. आणि म्हणूनच ही नगरी सॉक्रेटीस सारख्या महान तत्वज्ञाची खरीखुरी कर्मभूमि ठरली. सॉक्रेटीस म्हणजे या शहराच्या रस्त्यारस्त्यातून फिरणारे विद्यापीठ! या शहराच्या प्रत्येक चौरस्त्यावर लोकशाही विचाराचे मंच या तपस्वी विचारवंताने निर्माण केले होते. लोकशाहीचा विचार प्रत्येक नागरिकाच्या दारापर्यंत पोचवण्याचे काम या महापुरुषाने केले होते. म्हणूनच लोकशाही जीवनाचा पहिला रखवालदार (**Watchman**) होण्याचा मान त्याला मिळाला. परखड विचारांचा असूड हातात घेऊनच त्याने आपली सगळी हयात घालविली. विचारांच्या परखडपणासाठी लागणारी किंमतही त्याला द्यावी लागली ही गोष्टही आपल्याला माहित आहेच. एखाद्या ठिकाणचं वैचारिक वातावरण अशा व्यक्तीशिवाय निर्माण होत नसतं हे सत्य आहे. आणि वस्तुतः अशा प्रकारच्या

वैचारिक वातावरणाशिवाय नवनवीन विचारांना जन्मही मिळू शकत नाही; आणि तो मिळालाच तर त्या विचारांची व्हावी तेवढी वाढ होऊ शकत नाही हेही तितकेच सत्य आहे.

मित्रहो, आपल्या या कराड शहरात विचारांना जन्म देणारं आणि त्यांचं भरणपोषण करणारं वातावरण निर्माण करण्याचा प्रयत्न गेल्या काही वर्षांपासून अगदी सातत्याने होतो आहे ही अभिमाची गोष्ट आहे. पुण्या-मुंबईसारख्या मोठ्या शहरात अशा प्रकारचे उदंड प्रयत्न होतात, पण त्यांच्याविषयी आपल्याला आश्चर्य वाटण्याचे फारसे कारण नाही. उलट कराडसारख्या एखाद्या छोट्या शहरात नगर परिषदेसारखी एखादी संस्था अशा प्रकारचा उपक्रम हाती घेते ही गोष्ट पूर्णत: नवलाईची नसली तरी अनुकरणीय मात्र खचितच आहे, असे मला वाटते. अशा प्रकारचे अर्थपूर्ण उपक्रम आता गावागावातून केले पाहिजेत, झाले पाहिजेत. सर्वसामान्य लोकांचं वैचारिक व सांस्कृतिक जीवन समृद्ध करण्यासाठी नवनवीन विचारांचं पाणी आता गावागावातील पाणवठ्यांवर मिळालं पाहिजे. अशा प्रकारचे विविध असे वैचारिक उपक्रम हाती घेतल्याशिवाय समाज प्रबोधनाचं कार्य महाराष्ट्रातील खेड्यापाड्यांपर्यंत जाऊन पोहोचणार नाही. 'गाव तिथे ग्रंथालय' आणि 'वाचक तिथे विचार' अशा नव्या म्हणी आता रूढ झाल्या पाहिजेत असे मला वाटते; आणि म्हणूनच प्रत्येक ग्रामपंचायतीने आपल्या गावात वाचनालय चालवावे आणि वैचारिक वातावरण निर्माण करण्यासाठी डोळस-पणे प्रयत्न करावेत असं मला प्रामाणिकपणे वाटते. अलीकडे ग्रामीण भागात झालेला शिक्षण प्रसार लक्षात घेतला तर अशा प्रयत्नांची नितांत आवश्यकता आहे आणि तशा प्रयत्नांना वावही भरपूर आहे. आपल्या या पश्चिम महाराष्ट्रात काही ठिकाणी अशा प्रकारचे प्रयत्न होत आहेत ही अतिशय समा-

धानाची गोष्ट आहे. वैचारिक जीवनाची पातळी उंचावणाऱ्या अशा प्रकारच्या प्रयत्नांना चळवळीचे स्वरूप प्राप्त झाल्याशिवाय ग्रामीण महाराष्ट्राला खऱ्या अर्थाने समाज परिवर्तन घडवून आणता येणार नाही. अशी माझी प्रामाणिक समजूत आहे. लोकशाही जीवनाच्या कक्षा विस्तारण्यासाठी तर ही गोष्ट फारच आवश्यक आहे. लोकशाहीचा विचार **grass roots** पर्यंत नेल्याशिवाय सामाजिक प्रबोधनाची व पर्यायाने सामाजिक परिवर्तनाची प्रक्रिया बळकट होणार नाही, ही गोष्ट आपण लक्षात घेतली पाहिजे.

मित्रहो, "यशवंतराव चव्हाण व्याख्यानमाले" साठी यापूर्वी महाराष्ट्रातील काही थोर विचारवंतानी आपले प्रगल्भ विचार कराडच्या सुजाण व सुबुद्ध नागरिकांसमोर व्यक्त केलेले आहेत. पण या वर्षी महाराष्ट्राला ज्याचा फारसा परिचय नाही अशा एका सामान्य व्यक्तीला या व्याख्यान मालेत दोन व्याख्याने देण्यासाठी आपण पाचारण केलं आहे. नगराध्यक्ष श्री. पाटील साहेबांनी आपल्या प्रास्ताविकात माझा महाराष्ट्रातील एक प्रसिद्ध विचारवंत म्हणून जो उल्लेख केला तो केवळ या प्रसंगाचे औचित्य दर्शविणारा आहे. माझ्या विषयी त्यांनी काढलेले उद्गार हे उलट त्यांच्या मनाच्या मोठेपणाची साक्ष देणारे आहेत. वस्तुतः या ठिकाणी येण्याचं मी जे कबूल केलं त्याचं मुख्य कारण माननीय यशवंतरावांच्या विषयी माझ्या मनात असलेला आदर व जिव्हाळा हे आहे, तो अभिव्यक्त करण्याची संधी कराडकरांनी मला दिली त्याबद्दल मी आपला आभारी आहे. कृष्णा-कोयनेच्या काठावर वाढलेल्या एका थोर पुरुषाच्या विचारांशी नाते सांगणाऱ्या मराठवाड्यातील तेरणा-वांजरेच्या थडीवर वाढलेल्या माझ्या सारख्या एका सामान्य व्यक्तीला येथे येण्याची संधी मिळाली ही खरोखर त्या व्यक्तीच्या जीवनातील एक अपूर्वाई

आहे. माननीय यशवंतरावजींचं अभीष्टचिंतन करावं आणि त्याच बरोबर आपल्याशी महाराष्ट्रातील समाजकारण व राजकारण या विषयावर थोडसं प्रकट चिंतन करावं या दुहेरी हेतूने मी आपल्या समोर उभा आहे. आणि म्हणून प्रथम मी श्री. यशवंतरावांना त्यांच्या वाढदिवसाच्या निमित्तानं दीर्घायुरारोग्य चिंतितो.

माननीय यशवंतरावांना श्रद्धास्थान मानणारे जे अनेक लोक या महाराष्ट्रात आहेत त्यात मीही माझ्या परिने सहभागी आहे. भारतीय राजकारणात एक शक्तिकेंद्र म्हणून ओळखले जाणारे यशवंतराव हे केवळ राजकारणी व्यक्ती नव्हेत. महाराष्ट्राच्या सामाजिक जीवनाच्या प्रत्येक अंगावर त्यांच्या व्यक्तिमत्वाचा ठसा उमटलेला आहे. त्यांच्या व्यक्तिमत्वाच्या जडणघडणी मध्ये राजकारणाचा फार मोठा वाटा आहे यात शंका नाही. पण ज्या राजकारणाने त्यांना घडविलं ते राजकारण निव्वळ राजकारण नव्हतं व नाही हे मी आपल्याला आवर्जून सांगू इच्छितो. सामाजिक बांधिलकी सांगणाऱ्या राजकारणानं त्यांना घडविलं आहे; हे आपण लक्षात घेतलं पाहिजे. गेल्या अनेक वर्षांपासून मराठी सारस्वताच्या दरबारात एक उच्च प्रकारची सांस्कृतिक अभिरूची घेवून ही व्यक्ती उभी आहे हे मी आपल्याला सांगण्याची गरज नाही. आणि म्हणूनच यशवंतरावांच्या राजकारणामागे एक विचारसूत्र आहे, एक विचारमूल्य आहे. ते विचारसूत्र किंवा विचारमूल्य त्यांच्या अनेक वर्षांच्या सर्जनशील चिंतनातून आणि कार्यातून विकसित झालेलं आहे. यशवंतरावांच्या राजकारणाचे 'रूटस्' आधुनिक महाराष्ट्राच्या सामाजिक व सांस्कृतिक परंपरेत खोलवर पसरलेले आहेत. या देशातील आशयगर्भ राजकारणाने यशवंतरावजींना घडविले; आणि त्याची परतफेड म्हणून यशवंतरावजींनी महाराष्ट्रातील राजकारणाला आपल्या विचारांनी

घडविले. राष्ट्रीय पातळीवरचं राजकारणही त्यांनी विचार आणि विवेक बाजूला ठेवून केलं नाही. राजकारण करण्यासाठी विचार लागतातच असं नव्हे. विचारांचा आधार न घेता, अगदी अविचारानेही राजकारण केलं जाऊ शकतं हे सांगण्याची आवश्यकता तरी आहे का ? पण अशा प्रकारचं विचारशून्य राजकारण अधिककाळ पर्यंत टिकू शकत नाही हे आपण लक्षात ठेवलं पाहिजे. पायाशिवाय वास्तू उभी करता येत नाही; तद्वत् विचाराशिवाय राजकारण निभविता येत नाही, ही गोष्ट सत्तास्पर्धेत बेभानपणे गुंतलेल्या मंडळींना कुणी व कशी सांगावी? महाराष्ट्राच्या विचारपरंपरेला अनुसरून ज्या ज्या नेत्यांनी आपले राजकीय जीवन घडविले त्यांच्या मालिकेत माननीय यशवंतरावांचे स्थान अगदी वरचे आहे, हे निदान महाराष्ट्रालातरी विसरता येणार नाही.

आणि म्हणूनच यशवंतरावांनी महाराष्ट्र राज्याच्या मुख्यमंत्री पदाची धुरा हातात घेतल्या बरोबर त्याच्या सर्वांगीण विकासाचा सम्यक व समग्र विचार आपल्या समोर मांडला होता, विशद केला होता. आणि त्या विचाराला कार्यान्वित करण्यासाठी अतिशय चैतन्यदायी अशा भावनिक वातावरणाची निर्मितीही केली होती, " सह्याद्रिचे वारे " वाचल्यानंतर आजही त्या चैतन्ययुक्त वातावरणाची कल्पना आपल्याला येऊ शकेल. यशवंतरावांचा संदेश व त्यांच्या शब्दातील अमृताशी स्पर्धा करू शकेल. असा गोडवा सह्याद्रिच्या वाऱ्यांनी महाराष्ट्राच्या सर्व कानाकोपऱ्यांपर्यंत नेऊन पोहोचवला होता ह्याची मी आपल्याला आठवण करून देत आहे. महाराष्ट्रात स्वेच्छेने सामिल झालेल्या आमच्या मराठवाड्याच्या मनालाही त्या वाऱ्यांनी स्पंदित केले

होते. आणि मग सातशे वर्षांच्या जुलमी इतिहासाने मराठवाड्याच्या डोळ्यात गोठवलेलं दुःख सह्याद्रिच्या वाऱ्यांचा स्पर्श होताच आसवांची नदी बनून वाहिलं होतं. हरवलेलं नातं पुन्हा सापडल्याचा, तोडलेलं नातं नियतीनं पुन्हा जोडल्याचा, आनंद काय असतो हे मराठवाड्यातील लोकांनाच विचारला पाहिजे. संयुक्त महाराष्ट्राच्या निर्मितीनंतर त्याच्या उज्वल भवितव्याचे स्वप्न यशवंतरावजींनी आमच्या समोर उभं केलं होतं. महाराष्ट्राच्या भवितव्याची सफर नेमकी कोणत्या दिशेत होणार आहे आणि कोणत्या मार्गांवरून होणार आहे, याची कल्पना त्यांनी आम्हाला दिली होती. संतश्रेष्ठ ज्ञानेश्वर, छत्रपती शिवाजी महाराज, महात्मा जोतिबा फुले व लोकमान्य बाळ गंगाधर टिळक यांना महाराष्ट्राची प्रातिनिधिक प्रतिकं मानून एकात्म मराठी मनाच्या व समाजाच्या नवनिर्मितीचा यशवंतरावजींनी जो विचार मांडला होता तो त्यांच्या दृष्टीची झेप व ध्येयाची उंची दाखविणारा विचार होता हे मी आपल्याला सांगू इच्छितो. इतिहासाचे भान असणाऱ्या आमच्या या नेत्याने आपली दृष्टी सातत्याने खिळविली होती ती भविष्याच्या उत्तुंग क्षितिजावर! भविष्याच्या दाराचा उंबरठा वर्तमान काळाच्या छातीवर असतो. हे मी आपल्याला सांगू इच्छितो. तो ओलांडूनच आतील दालनात प्रवेश करावा लागतो. संयुक्त महाराष्ट्राच्या निर्मितीनंतर यशवंतरावांनी आम्हाला या उंबरठ्यावर उभे केले होते. महाराष्ट्रातील सर्व जातीजमातीतील लोकांना प्रगतीच्या सर्व वाटा मोकळ्या झाल्या पाहिजेत, हा विचार त्यांनी बोलून दाखविला होता. आणि तो विचार साकार करण्यासाठी ते वचनबद्ध व कृतिशील राहिले. महाराष्ट्र राज्य हे एका विशिष्ट जातीचं राज्य बनणार नाही, तर ते येथे राहणाऱ्या सर्व

जातीधर्मातील लोकांचं राज्य बनेल याची ग्वाही त्यांनी आम्हांला दिली होती. छत्रपती शिवाजी महाराजांनी ज्या वर्धिष्णू राज्याचे स्वप्न बघितले होते त्याच्या परिपूर्तीसाठी आम मराठी जनतेला प्रतिबद्ध होण्याचे त्यांनी आवाहन केले होते. शिवाजी महाराजांची राजमुद्रा ही नव्याने महाराष्ट्र राज्याची राजमुद्रा बनली ती आपल्या अपूर्ण स्वप्नाच्या पूर्तीसाठीच ना? महाराष्ट्रातील विविध विभागांचा विचार जसा त्यांनी महाराष्ट्राच्या संदर्भात केला तसा महाराष्ट्राचा विचारही त्यांनी भारताच्या संदर्भातच केला. महाराष्ट्राच्या भवितव्याचे चित्र भारताच्या विशाल कॅनव्हासवरच चितारावे लागेल याचे भान त्यांनी सतत बाळगलेले आहे. भाषावाद किंवा प्रादेशिक वादाच्या संकुचित विचाराला त्यांनी थारा दिला नाही. यशवंतरावांना आपल्या आयुष्यात राज्यपातळीवरून राष्ट्रीयपातळीवर नेतृत्व करण्याची जी संधी उपलब्ध झाली तिचे रहस्य एकात्मतेसाठी आसूसलेल्या त्यांच्या या विशाल व विधायक दृष्टीत आहे, हे आपल्याला विसरता येणार नाही. त्यांच्या राजकारणामागे सातत्याने हे विधायक विचारसूत्र उभे आहे याची आठवण मी करून देत आहे एवढेच.

माननीय यशवंतरावांनी आपल्या आयुष्यात प्रामुख्याने दोन गोष्टींवर निरतीशय प्रेम केलं आहे. त्या कोणत्या दोन गोष्टी आहेत? शब्द आणि माणसं याच त्या दोन गोष्टी आहेत. शब्दांच्या व माणसांच्या सामर्थ्यावर त्यांचा विश्वास आहे. त्यांच्या शक्ती-सामर्थ्यावरच त्यांनी महाराष्ट्रातील व या देशातील राजकारणात भाग घेतला व आपला स्वतःचा वाटा उचलला. शब्द-वेडा व माणूसवेडा हा नेता आहे. अर्थसंपन्न व आशयगर्भ विचार व्यक्त करण्यासाठी शब्द आणि तितकेच भावपूर्ण व कर्तृत्वसंपन्न राजकारण करण्यासाठी माणसं त्यांना हवी होती, हवी आहेत.

यशवंतरावांची **Literary Vocabulary** जेवढी समृद्ध आहे तितकीच त्यांची **Political Vocabulary** सुद्धा समृद्ध आहे. या नेत्याचा 'शब्दकोश' आणि 'मानुषकोश' अतिशय संपन्न असल्यामुळेच त्याला राजकारणामागे माणसं आणि माणसांच्या मागे विचार उभे करता येऊ शकले. शब्दांनी त्याला वक्तृत्वाची देणगी दिली आणि माणसांनी त्याला कर्तृत्वाचे अभिवचन दिले.

पण कधीकधी शब्द हे वाक्यातील आपली स्वत:ची स्थानं सोडून जातात आणि अर्थशून्य बनतात. संदर्भ सोडून दूर गेलेल्या शब्दांना त्या संदर्भांचा शोध घेतल्याशिवाय, परत आपल्या स्थानी आल्याशिवाय अर्थच सापडत नाही. माणसांची परिस्थिती देखील कधीकधी अशीच होते. ज्या व्यक्तीने त्यांना राजकीय किंवा सामाजिक जीवनात संदर्भ दिले त्या व्यक्तीला सोडून जेव्हा ते दूर जातात तेव्हा ते स्वत:च्या संदर्भापासून अलिप्त होतात व अर्थशून्य बनतात. यशवंतरावांच्या शब्दांनी आपले संदर्भ सोडले नाहीत. म्हणूनच त्यांच्या शब्दांनी व्यक्त केलेला आशय हरवला नाही व विचार विसकटला नाही. पण त्यांनी जोडलेल्या बऱ्याच माणसांनी मात्र आपले संदर्भ सोडले आहेत. सत्तेच्या राजकारणाने त्यांना नि:संदर्भ केले आहे. आणि म्हणूनच त्यांच्या राजकारणाला फारसा अर्थ राहिलेला नाही. वाक्याचा **syntax** विस्कटल्यानंतर शब्दांमधला अर्थ गळून पडतो. तो **syntax** पुन्हा प्राप्त केल्याशिवाय त्या शब्दांना अर्थवादी व आशयग्वाही होता येत नाही. महाराष्ट्राच्या एकसंध राजकीय विचाराचा **syntax** आज अशाच प्रकारे विस्कटल्यामुळे त्याचे जे विघटन व नष्टचर्य झाले आहे ते अतिशय दु:खदायी आहे. महाराष्ट्राच्या राजकीय जीवनाचा **syntax** पुन्हा बांधण्यासाठी यशवंतरावांचे विचार उपयोगी पडतील अशी माझी प्रामाणिक धारणा आहे. स्वत: यशवंतरावजी हा राजकीय **syntax** जोडण्याचा प्रयत्न करतीलच

त्यांना त्यात यश मिळेल किंवा नाही हे मी आज सांगू शकणार नाही. पण त्यांच्या विवेकशील व विधायक विचारांचा आधार घेतल्याशिवाय महाराष्ट्राला आपल्या राजकीय जीवनाचा **syntax** जोडता येणार नाही हे मी आपल्याला निःसंदिग्ध शब्दात सांगू इच्छितो. राजकारण हे केवळ सत्तेमुळे सामर्थ्यशाली होत नसते. खऱ्या अर्थाने सामर्थ्यशाली होण्यासाठी त्याला वैचारिक शक्तीची आवश्यकता असते. वैचारिक बांधिलकीचा त्याग करून सत्तेच्या मागे लागलेल्या लोकांकडे बघून मला **The Emperor's New Clothes** या लोककथेची आठवण होते. आपण ती अवश्य वाचावी. ती सांगण्यात मी आपला वेळ खर्च करू इच्छित नाही.

मित्रहो, राजकारणाला जेव्हा सामाजिक आशय प्राप्त होतो तेंव्हाच ते अर्थपूर्ण होते. हा विचार अधिक विस्ताराने आपल्या समोर मांडावा म्हणूनच मी " महाराष्ट्रातील राजकारण आणि समाजकारण : कालचे, आजचे व उद्याचे " हा विषय निवडला आहे. केवळ दोन व्याख्यानामध्ये मला या विषयाची मांडणी आपल्या समोर करावयाची आहे. वेळेच्या अभावी मी या विषयाला पूर्ण न्याय देऊ शकणार नाही याची मला जाणीव आहे. आजच्या व्याख्यानात मी महाराष्ट्रातील कालच्या राज–कारणाचा व समाजकारणाचा केवळ मागोवा घेणार आहे. १८१८ ते १९३५ पर्यंतच्या एका प्रदीर्घ कालखंडाचा आजच्या या व्याख्यानात मी धावता आढावा घेणार आहे. या कालखंडात ज्या राजकीय व सामाजिक घटना व चळवळी झाल्या त्यांचा थोडक्यात परिचय मी आपल्याला करून देणार आहे.

महाराष्ट्राच्या इतिहासात १८१८ हे एका युगांताचा निर्देश करणारं वर्ष आहे, तर १९३५ हे एका युगांतराचं दिग्दर्शन

करणारं वर्ष आहे. १८१८ साली पेशवाई बुडाली आणि एका सामाजिक दुःस्वप्नांचा अंत झाला. पण त्याच बरोबर आपल्या हातून काहीतरी हरवल्याची तीव्र जाणीवही मराठी मनाला झाली. वस्तुतः पेशवाईच्या शेवटच्या काळात छत्रपती शिवाजी महाराजांना अभिप्रेत असलेल्या स्वराज्याचा आणि मराठी संतांना अभिप्रेत असलेल्या समतेचा आशय पूर्णतः संपुष्टात आला होता. महाराष्ट्रातील सर्व जातीधर्मातील लोकांना एकत्वाच्या सूत्रात बांधणारा कसलाच विचार किंवा ध्येयवाद या काळात उरला नव्हता. उलट या ठिकाणचा बहुजन समाज सामाजिक गुलाम-गिरीचे निकृष्ट जीवन जगत होता. सावकारी पाशात व पुरोहित-शाहीच्या जाचात तो संपूर्णतः जखडला गेला होता. शिवाजी महाराजांनी स्नानसंधेसाठी उपलब्ध करून दिलेलं पाणी हे पेशवाईच्या काळात पुरोहितशाहीने पूर्णतःच गढूळ करून टाकलं होतं हे आपल्याला माहित आहेच. पण ते देखील येथील अस्पृश्य समाजाला पिण्यासाठी मिळू शकत नव्हतं. महाराष्ट्रातला पददलित समाज अमानुषतेच्या टाचेखाली सर्वस्वी सापडला होता. आणि म्हणूनच पेशवाई बुडाल्याचा आनंद सामाजिक व आर्थिक विष-मतेला बळी पडलेल्या लोकांनी व्यक्त केला. ते स्वाभाविकही होते. पण परकियांची सत्ता येथे प्रस्थापित झाल्यामुळे एक सूप्त खंतही मराठी मनाला बोचत होती. स्वत्व गमावल्याची तीव्र जाणीव बुद्धिवादी महाराष्ट्राला होणे क्रमप्राप्त होते. तेंव्हा अशा प्रकारे एका संमिश्र भावनेत (**ambivalent feeling**) मराठी मन सापडले होते.

पेशवाई बुडाल्यानंतरचा काळ हा मराठी जनतेसाठी मानसिक-दृष्टया पुनर्वसनाचा व सामाजिकदृष्टया पुनर्बांधणीचा काळ होता. वस्तुतः तो स्वतःला सावरण्याचा, सावरून उभे राहाण्याचा, उभे राहून दिशा निर्धारित करण्याचा व दिशा निर्धारित करून

पुढे चालण्याचा काळ होता. इंग्रजांच्यासाठी तो स्वत:चे पाय खंबीरपणे रोवून आपल्या साम्राज्याचा विस्तार करण्याचा काळ होता. वस्तुत: महाराष्ट्राच्या राजकीय व सामाजिक जीवनातली ती संक्रमणावस्था होती. महाराष्ट्राला एक नवीन मानसिकता निर्माण करण्याची व घडविण्याची आवश्यकता होती. राजकीय व सामाजिकदृष्टचा एका वेगळचा अवस्थांतराच्या संदर्भातच ती निर्माण करणे किंवा घडविणे अपरिहार्य होते. इंग्रजांनी आपल्याबरोबर जे विचार आणले, जी जीवनमूल्ये आणली आणि ज्या संकल्पना आणल्या त्या येथे रूजण्यासाठी बराच कालावधी लागला यात शंका नाही. इंग्रज भारतात आले ते **White man's burden** ची संकल्पना घेवून, हे आपण विसरता कामा नये. जगाच्या पाठीवर ज्या ज्या ठिकाणी त्यांनी वसाहती निर्माण करून आपल्या साम्राज्याचा विस्तार केला त्या त्या ठिकाणी ते " श्वेत माणसाचे ओझे " आपल्या पाठीवर घेवून गेले होते हे ऐतिहासिक वास्तव आपण लक्षात घेणे आव–श्यक आहे. त्यांच्या वसाहतवादाच्या, विस्तारवादाच्या किंवा साम्राज्यवादाच्या मागची प्रेरणा व विचारसरणी या **White man's burden** च्या संकल्पनेत आपल्याला सापडेल. त्याच्या मागचे विचारबीज या संकल्पनेत आहे. **" We are the chosen people of God "** असं गोऱ्या लोकांचं म्हणणं होतं. त्यांच्या साम्राज्यविस्ताराच्या व ख्रिस्तीधर्मप्रचाराच्या मागच्या प्रेरणा व प्रवृत्ती याच संकल्पनेत अनुस्यूत आहेत. ज्ञान-विज्ञानाची शक्ती प्राप्त केलेल्या युरोपीय राष्ट्रांनी वसाहतवादाच्या विस्तारातून जगातील सत्तासंपत्तीचा उपभोग घेण्याचा जन्मसिद्ध अधिकार ईश्वराने फक्त गोऱ्या लोकांनाच बहाल केला आहे. असे सिद्ध करण्याचा प्रयत्न केला. इंग्रज लोक याला अपवाद नव्हते. **White man's burden** च्या संकल्पनेतला उग्र दर्प भारतातील त्यांच्या साम्राज्य विस्तारालाही होताच. भारताला

सुसंस्कृत करण्याचे "मिशन" घेऊन इंग्रजलोक भारतात आले असे समर्थन अनेकांनी केले होते. इंग्रजी साहित्य आणि पाश्चिमात्य संस्कृती भारतीयांना सुसंस्कृत बनवू शकेल अशी ब्रिटिश विचारवंतांची प्रामाणिक धारणा होती. ख्रिस्तीधर्म-प्रचारकांच्या समोर भारतीय नेटिव्हांना सुसंस्कृत कसे करावे हा प्रश्न उभा होता. भारतात आलेल्या इंग्रजांनी आमच्या देशावर राजकीय गुलमगिरी लादण्यात शेवटी यश मिळविले. परिणामतः अटकेपार गेलेला भगवा ध्वज शनिवार वाड्यावर देखील राहू शकला नाही ही आमची ऐतिहासिक शोकांतिका होती. उत्तरेतलं वैभवशाली मोगल साम्राज्य संपुष्टात आलं आणि शेवटच्या मोगल साम्राटाला अ।पल्या जीवनाचा शेवट इंग्रजांच्या बंदिशाळेत करावा लागला. बहाद्दूरशाहाला आपल्या प्रीयभूमित स्वतःच्या दफनावधीसाठी देखील दोन गज जमीन मिळू शकली नाही. बहाद्दूरशाहाचे शोकगीत हे मोगल साम्राज्याचे मृत्यूगीत होते असे राहून राहून मला वाटते.

पण राजकीय गुलामगिरी भारतावर लादणाऱ्या इंग्रजांच्या अमदानीत सामाजिक स्वातंत्र्याचा हुंकारही जनसामान्यांना ऐकू आला. आमच्या देशातील इंग्रजांचे आगमन ही नियतीचं जणु देणच आहे असे अनेकांना वाटले. त्याचे कारण काय ? इंग्रजांनी आपल्याबरोबर जे विचार आणले होते, जे राजकीय व सामाजिक तत्वज्ञान आणले होते, त्यात एक प्रकारची विमोचक शक्ती होती, याचा प्रत्यय प्रथमतः महाराष्ट्रातील विचारवंतांना व नंतर सामान्य मराठी जनतेला येऊ लागला. त्यांनी आपल्याबरोबर आणलेल्या विचारांच्या व संकल्पनांच्या आधारावर या ठिकाणच्या सामाजिक व सांस्कृतिक जीवनाला हळूहळू संस्थात्मक रूप मिळू लागले. आणि अशा प्रकारे महाराष्ट्रात सुधारणावादी युगाचा शुभारंभ झाला हे मी आपल्या लक्षात आणून देऊ इच्छितो. या

ठिकाणची मध्ययुगीन रात्र संपून आधुनिक युगाची पहाट झाली होती. आपली राज्यव्यवस्था मजबूत करण्याचा इंग्रजांनी प्रयत्न केला ही गोष्ट खरी असली तरी त्यांनी आपल्या बरोबर आणलेल्या विचारांमध्ये आमच्या विचारवंतांनी व समाज सुधारकांनी नवीन समाज व्यवस्थेसाठी व सांस्कृतिक नवनिर्मितीसाठी आवश्यक असणाऱ्या दिशा व प्रेरणा धुंडाळण्याचा प्रयत्न केला. इंग्रजांच्या साहित्यात राजकीय आणि सामाजिक तत्वज्ञानात मानवतावादाच्या व स्वातंत्र्याच्या प्रेरणा व भावना दडलेल्या होत्या. त्यामुळे त्यांच्या प्रशासनात उदारमतवादाला स्थान मिळाले होते. त्यात लोकशाहीचे संकेत होतेच. कल्याणकारी राज्याचे विचारबीज इंग्रजांच्या उदारमतवादी धोरणात होते. आणि म्हणूनच त्या सर्व गोष्टींचा परिणाम येथील वैचारिक व सामाजिक जीवनावर झाला हे निराळे सांगण्याची आवश्यकता नाही.

महाराष्ट्राच्या वैचारिक जीवनावर सखोल परिणाम घडविणाऱ्या ज्या काही घटना १९ व्या शतकाच्या पूर्वार्धात व उत्तरार्धात या ठिकाणी घडल्या त्यात तीन घटना माझ्यामते अतिशय महत्वाच्या आहेत. आणि त्या म्हणजे : १) नवीन शिक्षण पद्धती ; २) वैचारिक प्रबोधन ; आणि ३) नवीन विधि व न्याय व्यवस्था. प्रामुख्याने या तीन गोष्टींनी आमची मानसिकता घडविली असे माझे मत आहे. या तिन्ही गोष्टींनी निर्माण केलेल्या वैचारिक मुशीत या ठिकाणचे राजकीय व सामाजिक मन ढाळले गेले असे मी म्हणालो तर त्यात कसलीच अतिशयोक्ती होणार नाही. आमच्या विचारवंतांच्या, धर्म व समाजसुधारकांच्या विचारसरणींची जडणघडण या घटनांनी किंवा गोष्टींनी निर्माण केलेल्या वैचारिक आणि मानसिक वातावरणात झाली हे वेगळे सांगण्याची आवश्यकता मला वाटत नाही. महाराष्ट्रातील

कालच्या व बऱ्याचअंशी आजच्या राजकारण व समाजकारणाची पाळं-मुळं आपल्याला मुख्यतः या घटनांमध्येच आढळतील. म्हणूनच मी त्यांची माहिती आपल्याला देतो आहे.

ब्रिटिशांनी या ठिकाणी आणलेल्या शिक्षण पद्धतीवर आपण कितीही कठोरतेने टीका केली तरी तिचे ऐतिहासिक महत्व कमी होणार नाही. मेकॉलेच्या शिक्षणविषयक टिपणाच्या आधारावर १८३५ सालीच ब्रिटिशांची या ठिकाणची शैक्षणिक आणि पर्यायाने सांस्कृतिक नीति निर्धारित झाली. राज्यकारभारासाठी त्यांना इंग्रजी जाणणाऱ्या कारकुनांची आवश्यकता होती ही गोष्ट खरी असली तरी त्यांच्या शिक्षणपद्धतीने या ठिकाणी नुसते कारकुनच निर्माण केले नाहीत. कोणतेही शिक्षण नसते. मर्यादित अर्थाने ज्याला आपण शिक्षण म्हणतो. तेवढयापुरतेच ते मर्यादित नसते. ज्या सामाजिक परिस्थितीमध्ये ते दिले जाते. त्याच्यावरच ते परिणाम करीत असते हे आपण लक्षात घेतले पाहिजे. त्याला आपोआपच एक सामाजिक आशय प्राप्त होतो. ब्रिटिश अमदानी मध्ये ज्या प्रकारचं शिक्षण या ठिकाणी मिळू शकलं त्या प्रकारचं शिक्षण आमच्या देशात पूर्वी कधीही मिळालेलं नव्हतं. " स्कूल " नावाची संकल्पना व संस्था आमच्या देशात त्याकाळी अस्तित्वात नव्हती. " पाठशाला " आणि " मदरसे " येथे होते, नाही असे नाही. त्याठिकाणी एकीकडे केवळ धर्मग्रंथांचं अध्ययन-अध्यापन केलं जात होतं आणि दुसरीकडे केवळ व्यावहारिक पातळीवर उपयोगी पडणारं जुजबी शिक्षण दिलं जात होतं. पाठशाला ह्या मंदिरात, धर्मशाळेत, मठात किंवा खाजगीमालकीच्या वाडयात भरत असत. मदरसे हे दर्गा किंवा मशिदीच्या इमारतीत चालत असत. आमच्या देशात त्याकाळी दिलं जाणारं शिक्षण धार्मिक स्वरुपाचं किंवा मर्यादित अर्थानं निव्वळ व्यवहारी स्वरूपाचं होतं. जे होतं तेही सर्व समाजाला मिळत नव्हतं. सर्व जातीधर्मातील

लोकांना शिक्षण मिळालं पाहिजे हा विचार या ठिकाणच्या समाजव्यवस्थेला खरं तर मंजूरच नव्हता. शिक्षण हे राजकर्त्यांची जबाबदारी असते हा विचारही या ठिकाणी अस्तित्वात नव्हता. शिक्षणाचाच अभाव असल्यामुळे शिक्षण उपलब्ध करून देण्याचा विचार आमच्या समाजव्यवस्थेच्या मनात येणे शक्यही नव्हते. आणि परंपरेने अनेक शतकांपासून चालत आलेला दैववाद किंवा कर्मवाद येथील जनमानसात एवढा खोलवर रुजला होता की त्याची पाळं-मुळं खणून काढणं शक्य नव्हतं. येथील बहुजन समाजाजवळ अज्ञान हीच जणू " अनंताची " ठेव होती. दारिद्र्य आणि अज्ञान हीच आमच्या संस्कृतीची उपलब्धी होती.

इंग्रजांनी जे शिक्षण या ठिकाणी उपलब्ध करून दिलं त्यातून आम्हाला तीन महत्वाच्या गोष्टी प्राप्त झाल्या. त्या म्हणजे : इहवादी जीवनदृष्टी, सामाजिक समता आणि व्यक्तीस्वातंत्र्य. वस्तुतः या तिन्हीही गोष्टी आमच्या सामाजिक किंवा सांस्कृतिक परंपरेतून पूर्णतः लोप पावल्या होत्या. भौतिक जीवनाचे प्रतिपादन करणारा लोकायती विचार या ठिकाणी फारसा विकसित होऊ शकला नव्हता. कुठल्याही समाजव्यवस्थेमध्ये भौतिकवादीदृष्टी ही स्वभावतःच एक विमोचक शक्ती म्हणून काम करीत असते. कारण ती दैववादी विचाराच्या विरोधात उभी राहून माणसाच्या पुरुषार्थाला आव्हान देत असते. निसर्गावर आणि सभोवतालच्या परिस्थितीवर मात करण्यासाठी व भौतिक जीवन सुखी व समृद्ध करण्यासाठी माणसाला व समाजाला ती प्रवृत्त करीत असते. अज्ञान व अंधपरंपरेत खोलवर रूतून बसलेल्या आजच्या समाजपुरुषाला इंग्रजी शिक्षणामुळे इहवादी दृष्टी प्राप्त झाली. पाश्चिमात्य संस्कृतीमध्ये भौतिकवादाला अनन्य साधारण मूल्य असल्यामुळेच पाश्चात्य देशांमध्ये भौतिकशास्त्रांचा विकास होऊ शकला आणि परिणामतः ते देश

संपन्न व समृद्ध होऊ शकले ही गोष्ट अव्वल इंग्रजी अमदानीतच आमच्या लक्षात आली. इंग्रजांनी आमच्या देशात जी शिक्षण प्रणाली आणली तिने सामाजिक समता, सामाजिक न्याय व व्यक्तीस्वातंत्र्य या गोष्टीविषयीही आमच्या मनात नवीन जाणीवा निर्माण केल्या. स्त्री शूद्रांना सामाजिक विषमतेच्या बंदिवासात डांबून ठेवणाऱ्या भारतीय समाजाला समता व स्वातंत्र्याची जाणीव झाली.

ब्रिटिश राज्यसत्तेला भारतात सार्वत्रिक शिक्षणाची उपलब्धता करून देता आली नाही ही वस्तुस्थिती आहे. तशी तिची इच्छाही नव्हती. पण जे काही शालेय शिक्षण ब्रिटिशांनी या ठिकाणी उपलब्ध करून दिले ते उपयोगीच होते. ख्रिस्ती धर्मप्रचारकांनी या ठिकाणी चालविलेल्या शाळा ख्रिश्चन धर्मप्रचारकाच्या व धर्मांतराच्या हेतूने जरी काढलेल्या होत्या तरी त्यांच्या कार्या मागची प्रेरणा ही मानवतावादी होती. त्यांच्या कार्यापासून प्रेरणा घेऊन आमच्या समाज सुधारकांनी शिक्षण प्रसाराचे पवित्र कार्य हाती घेतले होते हे आम्हाला विसरता येणार नाही. त्याचा परिणाम केवळ साक्षरते पुरताच झाला नाही. त्याच्या आधाराने समाज सुधारणेची व सांस्कृतिक परिवर्तनाची मूळाक्षरेही आम्हाला गिरवता आली. आणि मग थोड्याच काळात समाज सुधारणेची भाषा आम्हाला अवगत झाली.

ब्रिटिश राज्यसत्तेने १८५७ साली कलकत्ता, मद्रास आणि मुंबई या तीन ठिकाणी विद्यापीठांची स्थापना केली. या विद्यापीठांचे शैक्षणिक कार्यदेखील या देशातील सामाजिक व राजकीय चळवळींना प्रोत्साहन देणारेच ठरले यात शंका नाही. ज्यांनी महाराष्ट्राच्या समाजमनात मानवतावादी प्रेरणा पेरल्या आणि ज्यांनी महाराष्ट्राच्या राजकीय मनाचा पींड घडविला त्या सर्व

विचारवंतांनी समाज सुधारकांनी व राजकीय नेत्यांनी इंग्रजी शिक्षणाचा लाभ घेतलेला होता. या देशावर राजकीय गुलामगिरी लादणाऱ्या इंग्रजांच्या साहित्यातून व तत्वज्ञानातून त्यांनी सामाजिक, राजकीय आणि आर्थिक स्वातंत्र्याच्या प्रेरणा शोधल्या ही गोष्ट आपल्याला अमान्य करता येत नाही. इंग्रजी भाषेच्या माध्यमातून आणि इंग्रजी शिक्षण प्रणालीतून त्यांना ह्या प्रेरणा शोधता आल्या. आणि म्हणूनच विष्णुशास्त्री चिपळूणकरांनी इंग्रजी भाषेला वाघिणीचे दूध म्हटले आहे. लोकहितवादी, महात्मा फुले, विष्णुबोवा ब्रह्मचारी, आचार्य बाळशास्त्री जांभेकर, न्यायमूर्ती रानडे, गोपाळ गणेश आगरकर, लोकमान्य बाळ गंगाधर टिळक, गोपाळ कृष्ण गोखले, पंडिता रमाबाई, दादाभाई नवरोजी आदींनी इंग्रजी शिक्षणातून आपल्या सामाजिक, राजकीय व आर्थिक कार्यासाठी आवश्यक असणारे विचारधन व प्रेरणा मिळविल्या. इंग्रजांना आपल्या राज्यकारभारासाठी इंग्रजी भाषा जाणणारा नोकर वर्ग तयार करावयाचा होता; पण त्यांनी येथे उपलब्ध करून दिलेल्या शिक्षणातून समाज सुधारकांची व राष्ट्रवाद्यांचीही पिढी महाराष्ट्रात जन्माला आली हे एक ऐतिहासिक सत्य आहे. याची जाणीव ब्रिटिशांना मुळीच नव्हती असे कसे म्हणता येईल? इंग्रजी शिक्षणाची नीति ठरविणाऱ्या लॉर्ड मेकॉलेला या गोष्टीची पूर्ण जाणीव होती याची मी आपल्याला आठवण करून देत आहे. भारतात इंग्रजी सत्ता चिरकाल टिकणार नाही; एक दिवस असा उजाडेल की त्या दिवशी एतद्देशियांच्या हातात सत्तासूत्रे देऊन इंग्रज राज्यकर्ते भारताचा किनारा सोडतील. हे विधान लॉर्ड मेकॉले साहेबांनी केले होते. ते कशाच्या आधारावर केले होते? भारतीयांना इंग्रजी साहित्यातून व तत्वज्ञानातून स्वातंत्र्याच्या प्रेरणा मिळणारच आणि ते स्वतःच्या स्वातंत्र्यासाठी लढा उभारणारच या गोष्टीची त्याला पुरेपूर जाणीव होती.

शिक्षणाला एक सामाजिक किंवा सांस्कृतिक आशय असतो हे मी आपल्याला मघाशी सांगितलं. इंग्रजी शिक्षणाबरोबर आपल्या देशात इंग्रजी भाषेच्या माध्यमाद्वारे पाश्चिमात्यांचे साहित्य, कला, धार्मिक, सामाजिक व राजकीय तत्वज्ञान आणि भौतिकशास्त्रांचे ज्ञान आपोआपच आले. आणि जेव्हा या सर्व गोष्टी या ठिकाणी आल्या तेव्हा आमच्या देशात कुठल्याही प्रकारची वैचारिक किंवा सांस्कृतिक पोकळी नव्हती. हे ही आपण लक्षात ठेवले पाहिजे. या ठिकाणचे सामाजिक जीवन परंपरावादी, स्थितिशील व विषमतेने पूर्णत: ग्रासलेले असले तरी येथे कसल्याही प्रकारची सांस्कृतिक पोकळी नव्हती. आमच्या जवळ धार्मिक, सामाजिक व राजकीय तत्वज्ञान होते. आमच्या जवळ विविध भाषा होत्या; साहित्यही होते. विविध कला या ठिकाणी विकसित झाल्या होत्या व त्यांच्या समृद्ध माध्यमातून भारतीयांच्या सांस्कृतिक जीवनाचा कलात्मक अविष्कार झाला होता. या समृद्ध संस्कृतीचा वारसाहक्क सर्वांना मिळालेला नव्हता ही गोष्ट नाकारता येत नाही. पण याचा अर्थ येथे सांस्कृतिक शून्यत्व होते असा होत नाही. पश्चिमेतून ज्ञान-विज्ञान, कला-साहित्य आणि धर्म तत्वज्ञानाचे नवीन वारे आमच्या देशात आल्यानंतर त्याचा येथील वैचारिक वातावरणाशी किंवा वाऱ्याशी आरंभी संघर्ष आणि तद्नंतर समन्वय होणे ही बाब अटळ होती. तेव्हां त्यांच्या संघर्षातून भारतात दुसरी एक अतिशय महत्वाची घटना घडली. वस्तुत: ती वैचारिक प्रबोधनाची घटना होती. भारताच्या आर्थिक, सामाजिक व राजकीय जीवनावर प्रखरपणे व प्रगल्भतेने परिणाम करणारी ती घटना होती. त्या घटनेने महाराष्ट्रात एक फार मोठे विचार मंथन घडवून आणले. त्या घटनेने या ठिकाणी वैचारिक प्रबोधनाची व सामाजिक परिवर्तनाची नांदी घातली. या वैचारिक प्रबोधनाने आमच्या विचारवंतांच्या धर्म व

समाजसुधारकांच्या हातात एक नवीनच " टॉर्च " दिला.

वैचारिक प्रबोधनाच्या प्रक्रियेतून सुधारणावादाचा प्रवाह महाराष्ट्राच्या समाज जीवनामध्ये निर्माण झाला. या देशात पूर्वी जे काही प्रबोधन घडले असेल ते केवळ धार्मिक आणि अध्यात्मिक स्वरूपाचे प्रबोधन होते. पण या प्रबोधनातून आम्हाला जडवादी अर्थात इहवादी दृष्टी मिळाली. त्यामुळे भौतिक जीवनाच्या गरजा ह्या अध्यात्मिक जीवनाच्या गरजांपेक्षा कमी महत्वाच्या नसतात ही गोष्ट आमच्या लक्षात आली. सामाजिक व व्यक्तीस्वातंत्र्याची संकल्पना आमच्या वैचारिक जीवनात निर्माण झाली. आम्ही आमच्या धर्मग्रंथांचा, धार्मिक व सामाजिक चालीरितींचा, कला-साहित्याचा, तत्वज्ञान व इतिहासाचा नव्याने विचार करायला सुरुवात केली. त्यांचा पुर्नविचार करून त्यांची मूल्यधारणा आमच्या विचारवंतांनी निश्चित केली. पोथी-पुराणातून आणि धार्मिक कर्मकांडातून बाहेर पडल्या शिवाय या देशाची प्रगती होणार नाही या निष्कर्षाप्रत आम्ही येऊन पोचलो. त्यामुळे आम्हाला सामाजिक वास्तवाचे भान झाले. सत्यसंशोधनाची निकड भासली. विज्ञानाची कास धरल्याशिवाय भौतिक जीवनाच्या समस्या सोडवता येणार नाहीत याची जाणीव प्रकर्षाने आमच्या मनात निर्माण झाली. समाज प्रबोधन हे राष्ट्राचे आत्मसंशोधन आणि आत्मपरिक्षण असते. आमच्या सामाजिक जीवनाला अंधारातून प्रकाशाकडे घेवून जाणारी ही वैचारिक यात्रा होती. आमच्या प्रतिमेने नवनवोन्मेषशालिनी होण्याचे स्वप्न याच यात्रेत पाहिले होते यात शंका नाही. थोडक्यात, या वैचारिक प्रबोधनामुळे भारतात एका अर्थाने प्रकाशयुगाचा आरंभ झाला. इंग्रज या देशात आले नसते तर अशा प्रकारचे प्रबोधन झाले असते किंवा नाही या बद्दल माझ्या मनात शंका आहे.

मित्रहो, इंग्रजी अमदानीच्या आरंभकाळी तिसरी एक तितकीच महत्वाची घटना आमच्या देशात घडली; आणि ती म्हणजे एका नव्या विधि व न्याय व्यवस्थेचे आगमन येथे झाले. आमच्या देशातील न्याय व्यवस्था धार्मिक व सामाजिक विषमतेवर आधारलेली होती. एक व्यक्ती, एक मूल्य ( **One man, one value** ) हे तत्व आमच्या विधी व्यवस्थेत व न्याय प्रणालीत व परंपरेत बसणारे नव्हते. ब्रिटिशांनी आमच्या देशात आमच्या इतिहासाला व समाजाला अपरिचित असलेले एक नवीन **Jurisprudence** या देशात आणले त्याचा येथील समाजाच्या दैनंदिन व्यवहारावर परिणाम होणे अपरिहार्य होते. इंग्रजी शिक्षणाचा लाभ सर्व जनतेला मिळणे शक्य नव्हते; वैचारिक प्रबोधनाचा सूर्य सगळ्यांच्याच घरावर उगवणे शक्य नव्हते; पण इंग्रजांच्या कायद्यांचा व न्यायव्यवस्थेचा फायदा मात्र सर्व जातीजमातीतील लोकांना सारख्याच प्रमाणात मिळणे क्रमप्राप्त होते.

ब्रिटिश अमदानीच्या काळात आमच्या देशात जी शासन प्रणाली व न्यायव्यवस्था आली तिची दोन प्रमुख वैशिष्टये होती. **Rule of law** आणि **Equality before the law** या दोन सिद्धांतांवर ती आधारलेली होती. "कायद्याचे राज्य" आणि "कायद्यापुढे समानता" या दोन तत्वांवर आधारलेले न्यायशास्त्र आणि विधिविज्ञान आमच्या परंपरेला अगदी नवीन होते. आमच्या देशातली न्यायव्यवस्था हिंदुधर्मशास्त्रावर आधारलेली होती. हिंदुधर्मशास्त्रज्ञांनी वर्णव्यवस्थेचा तथा जातिभेदाचा पुरस्कार सातत्याने केला. वर्णव्यवस्थेच्या विकृतीतून या देशात जातिव्यवस्था अस्तित्वात आली. आणि त्या जातीव्यवस्थेने भारतीय समाजाचे अतिशय मोठ्या प्रमाणावर विघटन केले. ती सामाजिक व आर्थिक विषमतेचे माहेर घर बनली हे सांगण्याची

आवश्यकता तरी आहे का ? आणि हे सर्व घडले धर्माच्या नावावर, धर्मशास्त्राचा हवाला देऊन आणि ईश्वराला साक्षी ठेवून ! या व्यवस्थेच्या सच्चेपणाला कुणीही आव्हान दिले नाही, ही एक आश्चर्याची गोष्ट आहे. एकाही हिंदूराजाने परंपरेने चालत आलेली ही कायदा पद्धती व न्यायव्यवस्था बदलण्याचा विचार केला नाही. वर्णव्यवस्थेवर आधारलेल्या समाजात सगळ्यांसाठी एकच कायदा असणे शक्य नव्हते. येथील जातिपंचायती पंचाच्या मुखात परमेश्वराचे शब्द शोधीत होत्या. हिंदूच्या सजाजधारणेसाठी मनुस्मृती अर्थात येथे होतीच. ती वाचल्यानंतर कशा प्रकारच्या भयावर विषमतेचे पालनपोषण या देशात झाले होते याची कल्पना आपल्याला येऊ शकेल. मुसलमानी राजवटींनी देखील हिंदूसाठी हीच व्यवस्था अनुसरली. आणि म्हणूनच या ठिकाणी समाजपरिवर्तनासाठी आवश्यक असणारे कायदे होऊ शकले नाहीत. पण इंग्रजी अमदानीने हे चित्र बदलले. आमच्या देशात त्यांनी सुधारणाप्रवण कायद्यांची निर्मिती केली. १८२९ सालीच कायद्याने सतीची चाल बंद करण्यात आली. १८४३ साली गुलामांचा व्यापार करण्याची प्रथा कायद्याने बंद करण्यात आली. विधवा विवाहाचा कायदा १८५६ साली पास करण्यात आला. १८५८ साली राणीचा जाहीरनामा प्रसिद्ध करण्यात आला. त्या जाहीरनाम्यामध्ये धर्मनिरपेक्षितेचे तत्व अंतर्भूत होते. धर्मस्वातंत्र्य आणि सर्वधर्मांना सारखी वागणूक देण्याचे आश्वासन देण्यात आले होते. १८६५ साली मिश्र विवाहाला मान्यता देणारा कायदा पास झाला. या कायद्याने जातिभेदाच्या मुळावरच प्रहार केला. इंग्रजांनी या देशात जी दंडसंहिता **(Criminal Code)** तयार केली ती तर अतिशय क्रांतीकारी स्वरूपाची होती. १८६० साली इंडियन पिनल कोड अमलात आले. खरे तर या कायद्याने आमच्या समाज जीवनात व आमच्या सामाजिक मानसिकतेत अमूलाग्र परिवर्तन घडवून

आणले. या दंड विधानाने येथील धर्मव्यवस्थेच्या व जातिव्यस्थेच्या उतरंडीवर फार मोठा आघात केला. येथील समाजव्यवस्थेच्या वेगवेगळ्या पायऱ्यांवर बसलेल्या लोकांना समपातळीवर त्याने उभे केले. या व अशा अनेक कायद्यांनी महाराष्ट्रातील समाज सुधारणेच्या कार्याला गती देण्याचेच कार्य केले.

ब्रिटिशांनी आमच्या देशात जे विधिविज्ञान (**Jurisprudence**) आणि राज्यप्रणाली (**Political System**) आणली त्या द्वारे भारतीयांना "राष्ट्र", "लोकशाही" आणि "राज्य घटना" या संकल्पनाही ज्ञात झाल्या, प्राप्त झाल्या. राष्ट्र म्हणजे केवळ देश नव्हे; धर्म, भाषा व वर्णाने एकत्रित बांधले गेलेले लोक म्हणजे राष्ट्र नव्हे; तर समान कायद्यांनी एका विशिष्ट राज्याशी किंवा प्रशासनाशी प्रतिबद्ध झालेले, निरनिराळ्या जातीपंथांचे, धर्म व भाषांचे लोक म्हणजे "राष्ट्र", हा विचार ब्रिटिशांनी आम्हाला दिला. वस्तुतः एका विशिष्ट भूभागातील अशा लोकांना केवळ समान कायद्यांनी बांधल्यामुळे "राष्ट्र" निर्माण होत नसते. त्यांना स्वतःचे राष्ट्र निर्माण करण्यासाठी राजकीय स्वातंत्र्याचीही आवश्यकता असते. अशा स्वातंत्र्याशिवाय त्यांच्या देशाला प्रभुसत्ता कशी मिळेल ! "स्वराज्या" शिवाय राष्ट्राची निर्मिती करता येत नाही. ब्रिटिशांनी आमच्यावर राजकीय गुलामगिरी लादली होती म्हणून भारताला "राष्ट्र" म्हणवून घेणे शक्य नव्हते. पण परकियांची सत्ता जेव्हा येथे नव्हती तेव्हाही संबंध भारताला राष्ट्राचे स्वरूप प्राप्त झाले नव्हते. ब्रिटिशांच्या काळात जेव्हा हा देश एकाच प्रशासनाशी जोडला गेला तेव्हाच 'राष्ट्र' या संकल्पनेची आम्हाला जाणीव झाली. राष्ट्रीय राज्याला (**National State**) "राज्य घटना" आवश्यक असते याची जाणीवही आजच्या विचारवंतांना ब्रिटिशांच्या काळात झाली. "सगळ्यांसाठी एकच कायदा" आणि "कायद्यासमोर सर्वांची

समानता" या तत्वावर आधारलेल्या इंग्रजाच्या विधिशास्त्राने आम्हाला लोकशाही राज्याची संकल्पना दिली यात शंकाच नाही. परकीय सत्तेने लादलेल्या कायद्यासमोर सर्व लोक समान असले तरी त्या राज्याला किंवा प्रशासनाला " लोकशाही " म्हणता येत नाही, ही गोष्ट ही तितकीच खरी आहे. लोकशाही ही त्या देशातील सर्व लोकांना राजकीय स्वातंत्र्य प्राप्त झाल्याशिवाय अस्तित्वात येऊ शकत नाही. लोकशाहीचा हा संपूर्ण विचार आम्हाला प्राप्त झाला तोही ब्रिटिशांच्या अमदानीत. ब्रिटिश राज्यसत्ता या देशात सुस्थिर झाल्या नंतर त्यांनी या ठिकाणी आपल्या बरोबर जी विद्या, जे तंत्रज्ञान आणि भौतिक जीवनाच्या विविध अंगांना स्पर्श करणारे जे विचार व तत्वज्ञान आणले होते. त्या सर्व गोष्टींच्या परिणाम व प्रभावामुळे महाराष्ट्रातही समाज परिवर्तनाची प्रक्रिया वेगाने सुरू झाली. त्या प्रक्रियेतून या देशात एक नवीन पर्व सुरू झाले. आणि या पर्वकाळात नवनवीन सामाजिक व राजकीय संस्था या ठिकाणी जन्माला आल्या. या ठिकाणी आमच्या लोकांना पूर्वी अपरिचित असलेली एक नवीन संस्थात्मक जीवन पद्धती ( **Institutional life pattern** ) निर्माण झाली. संस्था म्हणजे केवळ एखादी वास्तु नव्हे. एखादी विचारसरणी किंवा कार्यपद्धती स्वीकारून एखाद्या कार्याला जेव्हा आपण आरंभ करतो तेव्हा त्याला आपोआपच एक "संस्थात्मकता" प्राप्त होते. समाजजीवनाला त्यामुळे एक प्रकारचा पोत मिळतो. महाराष्ट्राच्या सामाजिक व राजकीय जीवनात एक नवीन संस्थात्मकता निर्माण झाली या गोष्टीकडे मी आपले लक्ष वेधू इच्छितो. महाराष्ट्रातील "काल" च्या राजकारणाचा व समाज कारणाचा विचार आपल्याला 'या संदर्भात करणे भाग आहे. आणि म्हणूनच ही ऐतिहासिक पार्श्वभूमी मी आपल्या समोर विषद केली आहे.

मित्रहो, महाराष्ट्रातील समाजकारणाची व राजकारणाची स्पंदने

ब्रिटिश अमदानीत ज्या काही महत्वाच्या ऐतिहासिक घटना घडल्या त्यात सापडतात. राजकारणासाठी तसेच समाजकारणासाठी आवश्यक असणारी विचारसंपदा आणि त्यांना गतिशील बनण्यासाठी लागणारी प्रेरकता इंग्रजी विद्येच्या उपलब्धीतून मिळाली याचा ऊहापोह मी आपल्या समोर थोडक्यात केला आहे. सामाजिक आणि राजकीय अशा दोन्ही प्रकारच्या स्वातंत्र्याची जाणीव इंग्रजी शिक्षण घेतलेल्या पहिल्याच पिढीला झाली. सामाजिक स्वातंत्र्यासाठी स्वकीय वरिष्ठ वर्गातील लोकांशी लढणे अनिवार्य होते; आणि राजकीय स्वातंत्र्यासाठी परकीय सत्तेशी अर्थात ब्रिटिशांशी लढणे आवश्यक होते. हे दोन्हीही लढे अंतिमतः एकमेकांना पूरक ठरणारे होते यात शंका नाही; पण एकाच वेळी आणि एकाच हद्दीवर ते लढणे शक्य नव्हते. या दोन्ही लढ्यांचे नेतृत्व एकाच विचारसरणीचा अवलंब करणाऱ्यांच्यामध्ये एकवटणे शक्य नव्हते. एकाच व्यक्तीला या दोन्ही लढ्यांचे सेनापतीपद सांभाळणे शक्य नव्हते पण असे असले तरी दोन्हीही लढे लढणे तितकेच आवश्यक आहेत याची जाणीव महाराष्ट्रातील समाजकारणात व राजकारणात गुंतलेल्या आमच्या विचारवंतांना झाली होती यात काही शंका नाही. वस्तुतः महाराष्ट्रातील राजकारणाचा आविष्कार राष्ट्र सभेच्या स्थापने नंतरच प्रकार्षाने झाला. समाजकारणाचा आरंभ त्यापूर्वीच झालेला होता. महाराष्ट्रातील राजकारण आणि समाजकारण एकाच पात्रातून प्रवाहित होऊ शकले नाही ही एक ऐतिहासिक वस्तुस्थिती असली तरी त्यांचे प्रवाह १९ व्या शतकाच्या शेवटपर्यंत एकमेकांच्या समांतर वाहत होते ही गोष्ट मात्र लक्षणीय आहे. ह्या दोन्ही प्रवाहामधील अंतर अधिक नव्हते ही गोष्टही आपण ध्यानात घेतली पाहिजे. एकमेकांना समांतर वाहणाऱ्या या दोन्हीही प्रवाहातील पाण्याला एकाच मातीचा रंग व वास प्राप्त झालेला होता. कारण महाराष्ट्रात एकाच

व्यासपीठावरून सामाजिक व राजकीय चळवळींचा विचार मांडला जात होता. सामाजिक आणि राजकीय स्वातंत्र्यांना बळकटी देण्यासाठी आर्थिक स्वातंत्र्यही आवश्यक आहे. हा विचार समाजसुधारकांना व राजकीय नेत्यांना पटलेला होता. स्वराज्य हे शेवटी सुराज्यासाठी असेल तर या देशातील आर्थिक आणि सामाजिक विषमताही घालवावी लागेल आणि त्यासाठी संघर्षही करावा लागेल याची जाणीव महाराष्ट्रातील बऱ्याच विचारवंतांना झाली होती यात शंका नाही. समाजकारण आणि राजकारण करण्यासाठी काही अंशी वेगळ्या प्रवृत्ती व प्रेरणा लागतात याचीही कल्पना त्यांना होती. त्या दृष्टीने आपल्या असे लक्षात येईल की महाराष्ट्रातील समाजकारणामागे मानवतावादी प्रेरणा होत्या, तर राजकारणामागे राष्ट्रवादी प्रेरणा होत्या, मानवतावादी प्रेरणा ह्या अधिक उदात्त असतात. तर राष्ट्रवादी प्रेरणा ह्या अधिक प्रभावी असतात. मानवतावाद हा नेहमीच सखोल व विशाल पात्रातून वाहणारी, राष्ट्राराष्ट्रातील सीमा रेषांना ओलांडून पुढे जाणारी नदी असते. या नदीतील पाणी संथ असते. या उलट राष्ट्रवाद हा प्रामुख्याने एकाच भूप्रदेशात आणि कांहीशा अरूंद पात्रातून वाहणारी नदी असते. आणि म्हणूनच तिचा वेग अधिक तीव्र असतो. महाराष्ट्रातील समाजकारणाचा व राजकारणाचा अभ्यास करीत असताना त्यांच्यातील ह्या फरकाचीही दखल आपल्याला घ्यावी लागते.

आधुनिक महाराष्ट्रामध्ये समाजसुधारणेचा किंवा समाज-परिवर्तनाचा प्रथमतः ज्यानी अगदी प्रकर्षाने विचार केला त्यात लोकहितवादी, बाळशास्त्री जांभेकर, विष्णुबोवा ब्रह्मचारी, महात्मा ज्योतिराव फुले, आगरकर आणि न्यायमूर्ती रानडे यांच्या नावांचा आवर्जून उल्लेख करावा लागेल. या व्यक्तींनी आमच्या सामाजिक अवनतीची कारणमीमांसा तर केलीच, पण

त्याचबरोबर त्यांनी ती दूर करण्याचे उपायही सुचविले. समाजोन्नतीचे मार्ग त्यांनी शोधले, धुंडाळले. या विचारवंतांनी तथा समाजसुधारकांनी मराठी मनात सामाजिक जाणिवा निर्माण करण्याचा फार मोठा प्रयत्न केला. त्यांच्या विचारांनी आंधळ्या श्रद्धांवर आघात केले. आमच्या रूढीप्रीय समाजाच्या पाठीवर त्यांनी कठोरतेने कोरडे ओढले. त्यांनी व्यक्त केलेले विचार आजही आपल्याला उपयुक्त ठरणारे आहेत. समाज पुरुषाला सातत्याने जागं ठेवण्याचं सामर्थ्य आजही त्यांच्या विचारात आपल्याला सापडेल. या सर्व विचारवंतांच्या व समाजधुरिणांच्या विचारांचा व कार्याचा तपशिलात जाऊन आढावा घेणे वेळेच्या अभावी शक्य नाही.

लोकहितवादींची " शतपत्रे " आपल्यापैकी बऱ्याच जणांनी वाचली असतील. सनातनी परंपरेच्या चिखलात खोलवर रूतून बसलेल्या समाजाचा गाडा वर काढण्याची व पुढे ढकलण्याची शक्ती त्यांच्या विचारांनी आम्हाला दिली. सामाजिक गुलामगिरी लादणाऱ्या आपल्याच घरातील शत्रूविरूद्ध त्यांनी क्रांतीकारी विचारांचे धनुष्य उचलले ब्राह्मणावर कसलाही मुलाहिजा न बाळगता त्यांनी प्रखर हल्ले केले. या ठिकाणच्या जातिव्यवस्थेच्या विरूद्ध त्यांनी अतिशय आक्रमक भूमिका घेतली. माणसानेच माणसावर लादलेल्या अमानुषतेविरूद्ध त्यांनी वैचारिक लढा पुकारला. सामाजिक गतिसिद्धांतांची त्यांनी आजच्या सुशिक्षित लोकांना ओळख करून दिली. मरगळलेल्या समाजपुरुषाला परिवर्तनाच्या वाटेवर चालण्याचे त्यांनी आवाहन केले.

लोकहितवादींनी तात्कालिन सामाजिक प्रश्नांवर भाष्य तर केलेच ; पण त्याच बरोबर राजकीय विचारांची दखल देखील त्यांनी घेतली. सामाजिक लोकशाहीचा विचार मांडित असतानाच

राजकीय लोकशाहीची वैचारिक मांडणीही त्यांनी केली. लोकशाही संकल्पनेची सामाजिक बाजू ही राजकीय बाजू एवढीच मोलाची व महत्वाची आहे याचा प्रत्यय लोकहितवादींचे निबंध वाचीत असताना आपल्याला येतो. समाजकारण आणि राजकारण हे एकमेकांपासून विभक्त करता येत नाहीत, हाच आशय लोकहितवादींच्या लिखाणातून व्यक्त होतो, हे आपण विसरता कामा नये. इंग्रजी सत्तेमुळे समाजसुधारणेची प्रक्रिया महाराष्ट्रात सुरू झाली याची डोळस जाणीव त्यांना होती. इंग्रज या देशात आले नसते आणि इंग्रजी विद्येचा लाभ एतद्देशियांना लाभला नसता तर समाज परिवर्तनाचं किंवा जनजागरणाचं युग भारतात निर्माण झालं नसतं याची पुरेपूर कल्पना लोकहितवादींना होती. इंग्रज राजवटीने महाराष्ट्रात अधिक शिक्षणप्रसार करावा आणि लोकोपयोगी कायदे पास करावेंत असा त्यांचा आग्रह होता. आश्चर्याची गोष्ट म्हणजे लोकहितवादींनी भारतीयांसाठी वेगळ्या संसदेची मागणी केली होती. इंग्रजी सत्तेला त्यांनी असे आवाहन केले होते की भारतीयांसाठी आवश्यक असणारे कायदे हे इंग्लंडच्या पार्लमेंटमध्ये पास न करता ते येथे पास करावेत. भारतासाठी वेगळी संसद असावी आणि त्या संसदेत भारतीय जनतेचं प्रतिनिधित्व भारतीयांनीच करावं, हा भविष्याचा वेध घेणारा विचार त्यांनी निर्भयपणे मांडला. वस्तुतः या विचारामागे त्यांची दूरदृष्टी तर होतीच ; पण तो व्यक्त करणे त्याकाळी धाडसाचेही होते. सर्वजाती-धर्मातील सुशिक्षित आणि चारित्र्यसंपन्न व्यक्तींना भारताच्या पार्लमेंटमध्ये जाण्याची संधी मिळाली पाहिजे असे त्यांना वाटत होते.

लोकहितवादींनी महाराष्ट्रात एक वैचारिक जागर घातला. येथील सामाजिक रोगांचे अचूक निदान त्यांनी केलं. त्या व्याधींवर त्यांनी उपचार सुचविले. सामाजिक आणि वैचारिक क्षेत्रातले

ते एक लोकविलक्षण धन्वंतरी होते. जातिभेदावर तर त्यांनी मूर्तिभंजकाच्या अभिनिवेशाने आक्रमण केले. हिंदुसमाजाच्या अवनतीला व विघटनाला सामाजिक विषमतेवर पोसलेला जातिभेद आणि त्या जातिभेदाला आचार-विचारांचे खतपाणी घालणारा ब्राह्मणवर्ग हा प्रामुख्याने जबाबदार आहे असे त्यांचे प्रामाणिक मत होते. आणि हे कटु सत्य त्यांनी निर्भिडपणे व कठोरपणे मांडले. त्यांच्या विवेचक बुद्धीला जे पटले ते त्यांनी असंदिग्ध शब्दात सांगितले. ब्राह्मण्याला आरोपीच्या पिंजऱ्यात उभे करून रामशास्त्रीबाण्याने त्यांनी त्याची समिक्षा केली. ब्राह्मण्य गुन्हेगार साबीत होणे अटळ होते.

महाराष्ट्रात सामाजिक इतिहासात सर्वात अधिक उत्तुंग व्यक्तिमत्व महात्मा जोतिराव फुल्यांच्या रूपाने आपल्या समोर उभे राहते. फुल्यांचं सबंध जीवन हे समाजक्रांतीचं प्रतीक किंवा रूपक आहे असं मी म्हणालो तर त्यात कसलीच अतिशयोक्ती होणार नाही. **Mahatma Phule's life is a metaphor of social revolution.** अलबर्ट कामूने वैचारिक बंडखोरीची जेवढी कांही ठळक लक्षणे किंवा वैशिष्टये सांगितली आहेत ती सर्व फुल्यांच्या व्यक्तिमत्वात, विचारसरणीत आणि कार्यप्रणालीत उत्कटतेने आविष्कृत झालेली आपल्याला दिसतील. **The Rebel** या त्याच्या ग्रंथात कामूने ध्येयवेड्या बंडखोराची जी व्याख्या केली आहे तिच्यात महात्मा फुले हे तंतोतंत बसतात. ज्या मूल्यांसाठी जगणे आवश्यक असते त्याच मूल्यांसाठी विशिष्ट अवस्थेत मरणेही आवश्यक असते, हे विचारसूत्र फुल्यांनी आपल्या मनात हयातभर सातत्याने बाळगले असले पाहिजे. आणि म्हणूनच त्यांनी आपल्या कृती आणि उक्तीमध्ये थोडी देखील विसंगती निर्माण होऊ दिली नाही. प्रतिकूल परिस्थितीशी त्यांनी कधीही तडजोड केली नाही. **His life was an absolute**

**affirmation of what he thought just and right.** कुठलीही प्रतिकूल परिस्थिती त्यांच्यावर आपल्या अटी लादू शकली नाही. अतिशय गुंतागुंतीच्या व प्रतिकूल प्रसंगांना अनेकदा तोंड देण्याची पाळी त्यांच्यावर आली. पण त्यांच्याशी त्यांनी कसलाही तह केला नाही. प्रतिकूल परिस्थितीने त्यांच्या समोर ठेवलेल्या कोणत्याही तहनाम्यावर त्यांनी स्वाक्षरी केली नाही. राजर्षी शाहू छत्रपती आणि डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचा अपवाद सोडला तर फुल्यांएवढा बंडखोर व विद्रोही माणूस महाराष्ट्राच्या सामाजिक इतिहासात सापडणे शक्य नाही.

महात्मा फुल्यांची तुलना कधी कधी बूकर टी. वॉशिंग्टनशी केली जाते. पण ती चुकीची तुलना आहे. बूकर टी. वॉशिंग्टनने तडजोडीचे धोरण व अनुनयाचे मार्ग स्वीकारले होते. श्वेत अमेरिकन समाजाशी व त्याने निर्माण केलेल्या प्रतिकूल परिस्थितीशी तडजोड करून आपल्या नीग्रो समाजाची प्रगती साधण्याचा बूकर टी. वॉशिंग्टनने प्रयत्न केला. गोऱ्या अमेरिकन समाजाविरुद्ध त्याला आक्रमक भूमिका घेता आली नाही. उलट फुले हे बंडखोर होते. येथील शूद्र आणि अतिशूद्रांना लाचारीची, अनुनयाची व तडजोडीची भूमिका घेण्याचा त्यांनी सल्ला दिला नाही. बूकर टी. वॉशिंग्टनने आपल्या नीग्रो समाजाला असा सल्ला दिला : **"Cast your bucket where you are."** उलट फुल्यांचं म्हणणं होतं **'Hitch your cart to the stars."** इमर्सनचं हे वाक्य मी मुद्दाम फुल्यांच्या तोंडी ठेवतो आहे. फुल्यांच्या धगधगत्या ध्येयवादाच्या व विचारसरणीचा अर्थ आणि आशय या शब्दात व्यक्त होऊ शकतो. महात्मा फुल्यांची तुलना एखाद्या ऐतिहासिक व्यक्तीशी करावयाचीच असेल तर ती अमेरिकन नीग्रोंचा दुसरा क्रांतीकारक नेता जॉन ब्राऊनशीच करावी लागेल. महात्मा फुले हे सर्वार्थांनी

क्रांतीकारक पुरुष होते. समाजकारणाचं, सामाजिक परिवर्तनाचं व सामाजिक क्रांतीचं व्याकरण आम्हाला फुल्यांपासूनच शिकावं लागेल. ते समाजकारणाचे व समाज क्रांतीचे पाणिनी होते. आमच्या समाजकारणातील कोणत्याही शब्दाचे व्याकरण चालवायचे असेल तर आपल्याला फुल्यांकडेच जावे लागेल.

महात्मा जोतिराव फुले हे आमच्या समोर आजही एका आव्हानाच्या रूपाने उभे आहेत. त्यांनी हाती धरलेले समाजक्रांतीचे शिवधनुष्य पेलण्याची शक्ती आमच्या हातात नाही हे प्रांजळपणे कबूल केले पाहिजे. समाज जीवनाच्या सर्वांगांना त्यांनी क्रांतीस्पर्श केला होता. चातुर्वर्ण्याच्या चौकटीवर तर त्यांनी घणाघाती प्रहार केले होते. वस्तुतः त्यांना हवे होते विचार व मूल्यपरिवर्तन ! त्या शिवाय समाज परिवर्तनाचा विचार करणे शक्य नव्हते. समाजातील खालच्या थरातील लोकांनी वरिष्ठ वर्गाची जीवनमूल्ये स्वीकारावीत व त्यांचे अनुकरण करावे असे त्यांना कधीही वाटले नव्हते. त्यांना कनिष्ठ वर्गातील लोकांचे " संस्कृतीकरण " (**Sanskritization**) करणे मान्य नव्हते. इतर समाजसुधारकांनी व विचारवंतांनी आपल्या पुरोगामी विचारांच्या पुरस्कारासाठी आणि मान्यतेसाठी धर्मग्रंथात आधार शोधण्याचे प्रयत्न केले. फुल्यांनी तशा प्रकारची बौद्धिक कसरत कधीही केली नाही. धर्मग्रंथांनी त्यांच्या विचारांना, मूल्यांना व कार्याला मान्यता द्यावी (**Sanction**) असे त्यांना कधीही वाटले नाही. त्यांना अभिप्रेत असलेल्या विचारांचा अर्थ विषद करण्यासाठी भूतकाळातले अन्वय त्यांना नको होते. त्यांची गरज फुल्यांना भासली नाही. कारण त्या अन्वयातून अर्थापेक्षा अनर्थच अधिक प्रमाणात हाती लागला असता. खरे तर आमचा भूतकाळ संपूर्णतः अंधारात सापडलेला होता. त्याच्या गाभाऱ्यात कधी काळी एखादी पणती मिणमिणलीही असेल; आणि तिच्या

एखाद्या प्रकाश किरणाने बाहेर येण्याचा अट्टाहास केलाही असेल, नाही असे नाही. पण अशा एखाद्या क्षीण प्रकाश किरणाला सूर्य मानण्याचा वैचारिक भाबडेपणा फुल्यांना मान्य नव्हता. तशा प्रकारचा एखादा किरण हाती पकडून जीवनात प्रकाशाची आरास मांडता येत नसते. फुल्यांचा संघर्ष हा बहुजनसमाजाला वर्णश्रेष्ठत्व किंवा जातीश्रेष्ठत्व प्राप्त करून देण्यासाठी नव्हता. तो त्याला मूल्यश्रेष्ठत्व प्राप्त करून देण्यासाठी होता. त्यासाठी त्यांनी भूतकाळाचा दरवाजा ठोठावला नाही. समाजाच्या खालच्या थरात ते स्वत: जन्मले व वाढले होते. पण त्यांचे मन कसल्याही न्यूनगंडाने पछाडले नव्हते. आशावादाने झपाटलेले मन त्यांना लाभले होते. माणसामाणसात कुठलाही भेद त्यांना मान्य नव्हता. आणि म्हणूनच हा विद्रोही मूर्तिभंजक मानवी स्वातंत्र्य व समतावादाचा सृजनशील शिल्पकार होऊ शकला. " गुलामगिरी " हा त्यांचा ग्रंथ त्यांच्या विद्रोही मनाचा जितका आविष्कार आहे तितकाच " सार्वजनिक सत्यधर्म " हा त्यांचा दुसरा ग्रंथ त्यांच्या सृजनशील तत्वज्ञानाचा साक्षात्कार आहे. महात्मा फुले हे आधुनिक महाराष्ट्रातील सर्जनशील समाजक्रांतीचे खरेखुरे " निर्मिक " होते, असे माझे प्रामाणिक मत आहे. फुल्यांच्या साहित्याची निर्मिती देखील समाज क्रांतीच्या उर्मीतून आणि प्रेरणेतून झालेली आहे, हा महात्मा आधुनिक महाराष्ट्राचा पहिला विद्रोही कवी आहे. या विद्रोही कवीच्या शब्दांनी स्पर्धा केली ती त्याच्याच क्रांतीकारी कर्तृत्वाशी ! त्यांने आपले साहित्य कर्तृत्वाने " अक्षर " केले.

महात्मा फुल्यांनी बहुजन समाजाला, उपेक्षित व पीडित जन-सामान्यांना मानवी अस्मिता प्राप्त करून देण्याचा प्रयत्न केला. या देशातील शोषित व दलित समाजाला विद्या मिळविण्याचा अधिकार असता तर जीवनातील अंधाराशी त्यांनी शतकानुशतके

नको असलेले नाते जोडलेच नसते. अविद्या ही आमच्या समाजाच्या आत्मघातकी अवनतीचे व विनाशाचे मूळ कारण आहे असे फुल्यांचे मत होते. या वस्तुस्थितीची मीमांसा त्यांनी अगदी पोटतिडकीने केली :

" विद्येविना मति गेली; मतिविना नीति गेली; नीतिविना गति गेली ! गतिविना वित्त गेले, वित्ताविना शूद्र खचले; इतके अनर्थ एका अविद्येने केले. " वस्तुतः या शब्दात फुल्यांनी त्यांच्या काळातील समाजाची विवेचक समीक्षाच केली आहे. समाजाच्या विदारक अवनतीची ही मीमांसा आहे. फुल्यांनी पददलितांच्या व बहुजन समाजाच्या व्याधीचे मूळ कारण शोधले; त्यांचे योग्य व अचुक निदान केले. अविद्या घालवायची असेल तर लोकांना विद्या द्यावी लागेल; त्यांचे अज्ञान घालवायचे असेल तर त्यांना ज्ञान उपलब्ध करून द्यावे लागेल; हा विचार त्यांनी मांडला. पण नुसता विचार मांडून ते स्वस्थ बसले नाहीत. कोरडे पांडित्य त्यांना मान्य नव्हते. विचाराला त्यांनी कृतीची जोड दिली. शिक्षणकार्याचा आरंभ त्यांनी केला. प्रस्थापित समाजाचा त्यांना विरोध होणार होताच. ज्ञानाच्या किल्या ब्राह्मणांच्या कंबरेला होत्या. त्या कशा हाती यायच्या ? त्या तयार करण्याचा स्वतंत्र प्रयत्न करणे हाच एकमेव मार्ग त्यांच्या समोर होता. आणि म्हणून त्यांनी त्या दिशेत वाटचाल आरंभिली. १८४८ साली मुलींची व १८५२ साली अस्पृश्यांची शाळा त्यांनी काढली. मुलींच्या शाळेत शिकवायला शिक्षिका मिळत नव्हत्या. महात्मा फुल्यांनी आपल्या पत्नी सावित्रीबाई फुले यांना शिक्षण दिले. सावित्रीबाईंनी मुलींना शिकविण्याचे पवित्र कार्य हाती घेतले. त्यांचा खूप छळ झाला. पण या क्रांतीकारक बाईने हाती घेतलेले कार्य सोडले नाही. फुल्यांनी शिक्षण प्रसाराच्या कार्याला हात घातला नसता तर महाराष्ट्रातील बहुजन समाज जागा होऊ शकला नसता.

अज्ञानाच्या अंधारातून त्याला बाहेर काढण्याचे काम फुल्यांनी केले. शिक्षणाचा लाभ समाजाच्या सर्वच थरातीच सर्वच लोकांना मिळाला पाहिजे असा त्यांचा आग्रह होता. शिक्षण प्रथम वरच्या वर्गाला मिळाले पाहिजे; तरच ते झिरपत झिरपत खालच्या वर्गांपर्यंत जाऊन पोहोचेल, असा कावेबाज युक्तीवाद पुढे आला. हा युक्तीवाद **Theory of Filteration** या गोंडस नावाने ओळखला जातो. फुल्यांनी या युक्तीवादावर घणाघाती हल्ला केला. आमच्या भारतीय समाजातल्या खालच्या वर्गातील लोकांना वरिष्ठ वर्गातील लोकांपासून काहीही मिळाले नाही याची जाणीव त्यांनी इंग्रज सरकारला करून दिली. तळागाळातील लोकांना शिक्षण मिळालेच पाहिजे असा त्यांनी आग्रह धरला. हंटर कमिशनला त्यांनी जे निवेदन सादर केले होते ते अतिशय महत्वाचे आहे.

म. फुले हे सामाजिक असंतोषाचे जनक होते. त्यांनी आपले कार्य शिक्षणापर्यंतच मर्यादित ठेवले नाही. लोकांना विद्या देऊन त्यांची गेलेली मति परत मिळवून देणे आवश्यक होते; मति मिळवून नीतिची पुन:प्राप्ती करणे हेही आवश्यक होते; नीतिबरोबर गति मिळणार हे जरी खरे असले तरी त्यासाठी प्रयत्न करणे आवश्यक होते; आणि समाजाला गति मिळाल्याशिवाय त्याच्या हाती वित्त येणे शक्य नव्हते. "खचलेल्या" बहुजनांना, दलितांना व शोषितांना जीवनात उभे करणे आवश्यक होते. आणि त्यासाठी समाजाचे समग्र परिवर्तन करणे अनिवार्य होते. फुल्यांना या गोष्टीची जाणीव होती. ती जाणीव बहुजन समाजाला करून देण्याचा त्यांनी प्रकर्षाने प्रयत्न केला. समाज परिवर्तनासाठी आवश्यक असणाऱ्या सुधारणांचा महात्मा फुल्यांनी पाठपुरावा केला. आणि म्हणूनच ते महाराष्ट्रातील सामाजिक क्रांतीचे अग्रणी होऊ शकले. मानवतावादाने प्रेरित झालेल्या या

महापुरुषाने " बालहत्या प्रतिबंधक गृह " या नावाची संस्था काढली. वाटचुकलेल्या विधवा स्त्रीयांना त्यांनी आधार दिला आणि त्यांच्या अर्भकांना या जगात जन्मण्याचा अधिकार प्राप्त करून दिला. केशवपनाच्या जाचातून अनेक ब्राह्मण विधवांना त्यानी सोडविले. सावकारी पाशात सापडलेल्या शेतकऱ्यांच्या दुःखाला त्यांनी मुखरित केले. शेतकऱ्यांच्या आणि कामगारांच्या चळवळी त्यांनी उभ्या केल्या. त्यांच्या संघटना बांधण्याचा त्यांनी प्रयत्न केला. महाराणी व्हिक्टोरियाचा पुत्र ड्यूक ऑफ कॅनॉट हा पुण्याला आला तेव्हां त्याच्या समोर शेतकऱ्यांच्या दुःखांची माहिती फुल्यांनी दिली. खरा भारत हा खेड्यात आहे हे त्यांनी इंग्रज सरकारला निक्षून सांगितले. खेडी सुधारल्याशिवाय, शेती सुधारल्याशिवाय हिंदुस्थानला भवितव्य नाही हा विचार त्यानी मांडला.

महात्मा फुले हे कृतीशील तत्वचिंतक होते. त्यांच्या जीवितकार्यामागील सर्व प्रेरणा ह्या मानवी स्वातंत्र्याच्या, समतेच्या व बंधुत्वाच्या प्रेरणा होत्या. मानवी स्वातंत्र्यासाठी, समतेसाठी न्याय आणि बंधुत्वासाठीं त्यांनी समर्पित भावनेने प्रतिकूल परिस्थितीशी आणि प्रस्थापित वर्गाशी अव्याहतपणे लढा दिला. टॉमस पेन या महान अमेरिकन बंडखोर विचारवंताच्या " मानवतेचे अधिकार " ( **Rights of Man** ) या ग्रंथाचा त्यांच्या मनावर फार मोठा प्रभाव पडला होता. त्यांनी आपले ध्येयस्वप्न ब्राँझच्या धातूत ढाळले होते. महाराष्ट्रातील इतर समकालिन विचारवंत आणि समाजसुधारक वरिष्ठ वर्गात जन्मले होते. त्यांनी आपल्या वरिष्ठ समाजातील प्रश्नांनाच केवळ हात घातला. एका विशिष्ट मर्यादेपलिकडे त्यांच्या दृष्टीला झेप घेता आली नाही. खालच्या समाजातील लोकांच्या सुखदुःखांना ते वाचा फोडू शकले नाहीत. एका मर्यादित वर्तूळाच्या बाहेर त्यांचे कार्य जाऊ शकले नाही.

बौद्धिक प्रबोधनाची ज्योत त्यांनी पेटविली आणि तेवत ठेवली यात शंका नाही. पण समाज क्रांतीची मशाल पेटविण्याची हिम्मत त्यांच्या अंतःकरणात नव्हती , आणि ती जळती मशाल हातात धरून पुढे चालण्याचे बळही त्यांच्या अंगात नव्हते. फुल्यांच्या क्रांतीकारी विचारांनी वणव्याचे रूप घेतले. त्या वणव्यात येथील पोथी-पुराणे, प्रथा-परंपरा, चातुर्वर्ण्य व जातीभेद यासारख्या गोष्टी सापडल्या व होरपळल्या. त्यांनी पेटविलेली समाजक्रांतीची मशाल महाराष्ट्रातील खेड्यापाड्यात जावी म्हणून त्यांनी १८७३ साली " सत्यशोधक समाजाची " स्थापना केली. सत्यान्वेषी प्रज्ञेच्या व क्रांतीप्रवण प्रतिभेच्या या महापुरुषाने दलित व पददलितांसाठी एक संघर्षशील तत्वज्ञान व व्यासपीठ निर्माण करून दिले. समाजाच्या खालच्या थरातील लोकांसाठी ज्या प्रखरतेने त्यांनी लढा दिला त्याच प्रखरतेने त्यांनी स्त्रियांच्या अधिकारांसाठी देखील संघर्ष केला.

मित्रांनो, महाराष्ट्रातील समाजक्रांतीच्या गंगोत्रीचा उगम फुल्यांच्या घरातील हौदातून झाला आहे हे आपणाला विसरता येणार नाही. पुण्यातील उच्चवर्णीयांच्या हौदातील पाणी त्यांच्या अंगावर अस्पृश्यांच्या पडलेल्या आणि न पडलेल्याही सावल्यांचा विटाळ धुण्यातच अधिक खर्च होत होते, हे आपल्याला सांगण्याची गरज नाही. फुल्यांनी मात्र आपला हौद अस्पृश्यांसाठी खुला ठेवला. आपल्या देशात या पाण्याचा एक मोठा आणि दुःखद इतिहास आहे. तो इतिहास मी आपल्या समोर कथन करू इच्छित नाही, तो सांगणे म्हणजे दलितांच्या मनावर झालेल्या खोल जखमांवर मिठाचे पाणी टाकण्यातलाच प्रकार होईल. या पाण्याच्या दुःखदायी कहाणीची आठवण झाली की मला श्री. दया पवारांच्या " पाणी कुठवर आलंगं बाई " या गीताची आठवण होते. गावागावातील पाणवठ्यावरचं पाणी दलितांच्या

गाडग्या-मडक्यांत व रांजणात पडू शकलं नाही हे आपल्याला सांगण्याची आवश्यकता आहेच का? महात्मा फुल्यांच्या मानवतावादाचा प्रथमतः जो साक्षात्कार महाराष्ट्रातील अस्पृश्यांना झाला तो त्यांच्या हौदातील पाण्यामुळेच. पण त्यामागे कसलीही उपकाराची भावना नव्हती. कर्तव्यपूर्तीचा आनंद मात्र फुल्यांच्या मनाने निश्चितच भोगला असेल.

जोतीराव फुल्यांचे कार्य एका विशिष्ट समाजापुरते किंवा जातीपुरते मर्यादित नव्हते. ते व्यापक व सर्वंकष स्वरूपाचे होते. ब्राह्मणवर्गावर त्यांनी कठोर भाषेत टीका केली. वस्तुतः ब्राह्मण्य हेच त्यांच्या टिकेचे प्रमुख उद्दिष्ट होते. पण ब्राह्मण वर्गाच्या प्रश्नांकडेही त्यांनी लक्ष दिले. केशवपन व बालविधवांचे प्रश्न त्यांनी हाती घेतले. अनैतिक मार्ग अवलंबून माता बनलेल्या स्त्रियांना व त्यांच्या अर्भकांना फुल्यांनी व त्यांच्या पत्नीने सांभाळले. त्या स्त्रिया प्रामुख्याने ब्राह्मण वर्गातील होत्या. आकाशाएवढे मोठे मन असल्याशिवाय अशा प्रकारचे कार्य कोणत्याही समाजसुधारकाला करता येत नाही हे सांगण्याची आवश्यकता नाही. अशाच एका ब्राह्मण विधवेचा मुलगा फुले दंपत्तीने दत्तक घेतला. या घटनेत फुल्यांच्या व्यक्तिमत्वातली सर्व उदात्तता साठलेली आहे. एखाद्या आशयगर्भ पौराणिक कथेलाही मागे टाकणारी ही घटना आहे. ती प्रत्यक्षतः फुल्यांच्या आयुष्यात व महाराष्ट्राच्या सामाजिक इतिहासात घडली म्हणून तरी तिला सत्य मानायचे. अन्यथा तिच्यावर कुणाचाही विश्वास बसला नसता. **It is indeed a historic myth !**

फुल्यांच्या क्रांतिकारक समाजसुधारणेचा विचार करीत असताना आपल्याला १९व्या शतकाच्या उत्तरार्धातील समाजप्रबोधनाचाही विचार करावा लागेल. एकोणीसाव्या शतकाच्या उत्तरार्धात

महाराष्ट्रातील सामाजिक चळवळीने चांगलाच जोर पकडला होता. हे मी आपल्या लक्षात आणून देऊ इच्छितो. सामाजिक सुधारणेच्या विचाराला व कार्याला बळकटी आणण्याचे कार्य ज्या ज्या विचारवंतांनी व समाजसुधारकांनी केले त्यात गोपाळ गणेश आगरकर आणि न्यायमूर्ती महादेव गोविंद रानडे यांचा क्रम फार वरचा आहे. हे आपल्या लक्षात आल्यावाचून राहणार नाही. आगरकरांनी आपल्या सुधारकी विचारांना पोलादी पाणी दिले होते. आणि म्हणूनच त्यांचे विचार आजही गंजलेले नाहीत. ते आजही सशक्त व सतेज आहेत. आगरकरांची निर्भिडता वाखाणण्यासारखी होती. समाज सुधारल्याशिवाय राजकीय स्वातंत्र्य स्थिर पायावर उभे राहू शकणार नाही. ही त्यांची प्रामाणिक धारणा होती. राजकीय सुधारणेपेक्षा सामाजिक सुधारणाही त्यांना अधिक अग्रक्रमाची व महत्वाची वाटली. राजकीय चळवळीला सामाजिक आशय मिळाल्याशिवाय तिला अर्थपूर्ण होता येणार नाही. असे त्यांना प्रामाणिकपणे वाटत होते. महाराष्ट्राच्या या थोर सुधारकाने बुद्धि प्रामाण्याचा अंगिकार केला व कुठलीही वैचारिक तडजोड मान्य केली नाही. आणि म्हणूनच ज्या काळात त्यांनी आपले विचार मांडले त्या काळात ते अतिशय वादग्रस्त ठरले. आगरकरांना अध्यात्मिक किंवा पारलौकिक जीवनाच्या तत्वचिंतनामध्ये मुळीच रस नव्हता. व्यक्ति आणि समाजाचे भौतिक जीवन सुखी व समृद्ध करणे हाच राजकारणाचा व समाजकारणाचा प्रमुख उद्देश असला पाहिजे अशी त्यांची ठाम भूमिका होती. मिल आणि स्पेन्सरच्या विचारांचा प्रभाव त्यांच्या मनावर आला होता.

न्यायमूर्ती रानड्यांचे व्यक्तिमत्व हे मवाळ व समन्वयवादी होते. समाजसुधारणेसाठी संघर्षाची भूमिका घेणे त्यांना मानवणारे नव्हते. सामाजिक अभिसरणाच्या प्रक्रियेला जाणीवपूर्वक अधिक

गतिशील बनविले पाहिजे असे त्यांना मनापासून वाटत होते. त्यासाठी लोकशिक्षणाची व संघटित प्रयत्नांची गरज असते. या विचाराचे प्रतिपादन निःसंदिग्ध शब्दात त्यांनी केले. रानड्यांच्या नेमस्त व उदारमतवादी विचारसरणीला आग्रही मार्ग मान्य होते; पण आक्रमक मार्ग मात्र तिला मंजूर नव्हते. उत्क्रांतीवादाचे ते खंदे पुरस्कर्ते होते. उत्क्रांती ही निसर्गाच्या नियमानुसार होते. आणि म्हणून समाजकारण देखील उत्क्रांतीच्या मार्गाने झाले पाहिजे अशी त्यांची धारणा होती. रानड्यांनी अध्यात्मिक व भौतिक या दोन्हीही गोष्टींवर सारखाच भर दिला. धर्मकारण, समाजकारण आणि राजकारण करणाऱ्या समकालीन व्यक्तींना व संस्थांना मार्गदर्शन करण्याचा व प्रेरणा देण्याचा त्यांनी प्रामाणिक प्रयत्न केला. अनेकविध सामजिक संस्थांच्या उभारणी-मागे ते प्रेरक शक्ती आणि मार्गदर्शक आधार बनून उभे राहिले. धर्मकारण, समाजकारण, राजकारण आणि अर्थकारण या सर्व आघाड्यांवरचा त्यांचा वैचारिक प्रवास अतिशय महत्वाचा आहे. महाराष्ट्राच्या समाजकारणाला व राजकारणाला न्यायमूर्ती रानड्यांनी इतिहास व अर्थशास्त्राच्या चिकित्सक विचारांची जोड दिली. इतिहासाबिषयी अनास्था आणि अर्थकारणाचे अज्ञान या दोन्ही गोष्टी आमच्या अवनतीला कारणीभूत ठरल्या आहेत हे त्यांनी ओळखले होते. पुढे दादाभाई नवरोजींनी आर्थिक प्रश्नांची शास्त्रीय तत्वांवर चिकित्सा करून शोषित भारताचे विदारक चित्र जगासमोर उभे कले. इंग्रजांनी या देशाचे जे भयानक स्वरूपाचे आर्थिक शोषण केले होते त्याची जाणीव दादाभाईंनी आम्हाला करून दिली. रानड्यांच्याही पूर्वी महा-राष्ट्रात विष्णुबोवा ब्रह्मचाऱ्यांनी आर्थिक प्रश्नांचा खल केला होता. पण महाराष्ट्रातील सर्व विचारवंतांचे आर्थिक प्रश्नांकडे प्रकर्षाने लक्ष वेधले ते न्यायमूर्ती रानडे यांनी. महाराष्ट्राच्या सांस्कृतिक प्रबोधनामध्ये रानड्यांचे फार मोठे योगदान आहे.

मराठी साहित्यालाही त्यांनी व्यासपीठ तयार करून दिले होते याची आपल्याला कल्पना असेलच. ज्या विचारांचा किंवा सुधारणांचा त्यांनी आयुष्यभर पाठपुरावा केला त्या प्रत्यक्षतः त्यांना अमलात आणता आल्या नाहीत ही गोष्ट खरी असली तरी त्यांचे विचार सामाजिक प्रबोधनाला चालना देणारेच होते.

न्यायमूर्ती रानडयांची प्रज्ञा प्रगल्भ आणि आणि विचार समतोल होते. त्यांनी विविध संस्थामध्ये दुवा साधण्याचा प्रयत्न केला. जे चांगले दिसेल त्याचे त्यांनी कौतुक केले. त्यांचा वैचारिक वारसा पुढे गोपाळ कृष्ण गोखले यांनी चालविला. रानडयांप्रमाणे नामदार गोखलेही नेमस्त व उदारमतवादी होते. समाजकारणाच्या प्रेरणा घेऊन त्यांनी राजकारणात पदार्पण केले होते. त्यांची वैचारिक प्रगल्भता त्यांच्या व्यक्तिमत्वाला सातत्याने उजाळा देत राहिली. त्यांचे राजकारण समाजाभिमुख होते. त्यांच्या राजकारणाने सामाजिक संदर्भ सोडले नाहीत, ही लक्षात घेण्यासारखी गोष्ट आहे. राजकारणाने सामाजिक संदर्भ सोडले तर त्याला सामान्य जनतेपर्यंत जाऊन पोहोचता येणार नाही या गोष्टीची नामदार गोखल्यांना चांगलीच कल्पना होती. इतर उदारमतवादी विचारवंताप्रमाणे गोखल्यांचाही भर लोकशिक्षणावर होता. एक आदर्श शिक्षक म्हणून नाव मिळविलेल्या या महापुरुषाने राजकीय क्षेत्रात इतर राजकारण्यांना एक आदर्शच घालून दिला. आजच्या लोक प्रतिनिधींनी, आमदार आणि खासदारांनी गोखल्यांचा आदर्श समोर ठेवला तर भारतातील राजकारणाला नैतिक मूल्यांचे अधिष्ठान मिळेल यात शंका नाही. **Servants of India Society** या संस्थेची स्थापना करून गोखल्यांनी राजकारणात सामाजिक आशय घेऊन उतरलेल्या मंडळींना एक आदर्श व प्रभावी असे व्यासपीठ तयार करून दिले. गोखल्यांच्या वैचारिक व राजकीय वारशाने गांधीजींच्या रूपाने आपला अर्थ

आणि आशय अभिव्यक्त केला, ही गोष्ट ध्यानात घेतली तर गोखल्यांच्या मोठेपणाचा प्रयत्न आपणास येऊ शकेल.

बंधुभगिनींनो, महाराष्ट्रात सामाजिक व राजकीय सुधारणांचे प्रयत्न १९ व्या शतकाच्या अखेरपर्यंत एकाच व्यासपीठावर होत होते. नेमस्त व उदारमतवाद्यांचा प्रभाव जोपर्यंत महाराष्ट्राच्या राजकारणावर होता तोपर्यंत राष्ट्रसभा व सामाजिक परिषद यांची अधिवेशने एकाच ठिकाणी व एकाच व्यासपीठावर भरत होती, याची माहिती आपल्यापैकी अनेकांना असेलच. १८८७ ते १८९५ पर्यंत राष्ट्रीय सभेच्या शामियान्याखालीच अखिल भारतीय सामाजिक परिषदा भरत होत्या. १८८५ साली नॅशनल कॉंग्रेसची स्थापना झाली. तिची मूळ प्रकृती व प्रवृत्ती ही सामाजिक व राजकीयदृष्टचा सुधारणावादी होती. महाराष्ट्रात मवाळ आणि जहालमतवादी विचारप्रवाह अस्तित्वात होतेच. पण १९०१ नंतर जहालवाद्यांचा प्रभाव अधिक वाढला. जहालवादी मतप्रणाली महाराष्ट्राच्या राजकारणात अधिक तीव्रतेने पुढे जाऊ लागली. ती मूलतःच ज्वालाग्राही असल्यामुळे लोकभावनांना ती पेटवू शकली. उदारमतवादी विचारसरणीचे आवाहन भावनेपेक्षा बुद्धीलाच अधिक होते. ती मागे पडली. देशाच्या स्वातंत्र्याचा विचार करणारे मवाळ आणि उदारमतवादी हे दोघेही एका अर्थाने राष्ट्रवादीच होते. पण त्यांचा राष्ट्रवाद सर्वस्वी धार्मिक किंवा सांस्कृतिक पुनरुज्जीवनावर आधारलेला नव्हता. जहालांचा राष्ट्रवाद मात्र बव्हंशी हिंदूत्वादी पुनरुज्जीवनावर अवलंबून होता. सर्वच जहालांना सांस्कृतिकदृष्टचा पुनरुज्जीवनवादी म्हणता येणार नाही; पण त्यातील बहुतेक लोक धार्मिकदृष्टचा पुनरुज्जीवनवादी होते हे मी आपल्याला सांगू इच्छितो. सामाजिक अभिसरणासाठी प्रयत्न करणाऱ्या विचारवंताचे व राजकीय स्वातंत्र्यासाठी संघर्ष करणाऱ्या राष्ट्रवाद्यांचे मार्ग एकमेकापासून

अलग होणे अपरिहार्य होते. त्यांची भिन्नता अटळ होती असे म्हटले तरी चालेल. एकमेकांना छेद देऊन पुढे जाणे ही देखील एक प्रकारची अपरिहार्यता होती. समाजसुधारणा आधी का राजकीय स्वातंत्र्य आधी ? हा वैचारिक वाद महाराष्ट्रात निर्माण करण्यामागे राष्ट्रवाद्यांची जी भूमिका होती ती निखळ डावपेचाची (**strategy**) भूमिका नव्हती. त्या भूमिकेतील भिन्नत्व सैद्धांतिक स्वरूपाचे होते. त्यामागे पुनरुज्जीवनवादी दृष्टीकोणही तितकाच प्रखर होता. महाराष्ट्रातील समाजकारणाच्या तसेच राजकारणाच्या क्षेत्रातील नेतृत्व हे प्रामुख्याने उच्चवर्गीयांकडेच होते. महात्मा फुल्यांचा व त्यांच्या सहकाऱ्यांचा अपवाद सोडला तर महाराष्ट्रातील समाजकारण आणि राजकारण हे उच्चवर्णीयांनी निर्माण केलेल्या वैचारिक आवर्तातच भरकटत राहिले होते. १८९० साली फुले वारले. त्यांनी आरंभिलेल्या सामाजिक कार्याची गती चार-दोन वर्षातच कमी झाली. सत्यशोधक समाजाच्या लक्षवेधक कार्याला फुल्यांच्या मृत्यूनंतर खिळच बसली. फुले हे महाराष्ट्रातील सामाजिक असंतोषाचे जनक होते असे मी मघाशी आपल्याला सांगितले आहेच. त्यांनी निर्माण केलेली सामाजिक असंतोषाची ठिणगी त्यांच्या मृत्यूनंतर राखेखाली सापडली. पुढे राजर्षी शाहूंनी तिच्यातून सामाजिक संघर्षाचा वणवा तयार केला. पण राष्ट्रीय चळवळीची लाट एवढी मोठी व तेजस्वी होती की तिनेच प्रामुख्याने काळाचे लक्ष आपल्याकडे वेधून घेतले. सामाजिक सुधारणेच्या कार्याला आंदोलनाचे स्वरूप लवकर प्राप्त होऊ शकले नाही. लोकहितवादी, रानडे आणि आगरकर या व्यक्तीही काळाच्या पडद्याआड गेल्या. सामाजिक परिवर्तनाचे कार्य गौण ठरले.

या उलट राजकारणाची गती झपाट्याने वाढली. राष्ट्रवादी विचारसरणी अर्थातच सामर्थ्यशाली बनली. राष्ट्रवादाला

भूतकाळातील धार्मिक किंवा वांशिक परंपरा शोधाव्या लागतात. तसा प्रयत्न महाराष्ट्रातही या काळात झाला. इतिहासाच्या एका विशिष्ट अवस्थेत अशा प्रयत्नांची अपरिहार्यता असते. हे अमान्य करता येत नाही. पण राष्ट्रवाद जेव्हा सांस्कृतिक किंवा सामाजिक अभिसरणाच्या प्रक्रियेत प्रतिगामी शक्ती म्हणून उभा राहतो तेव्हां त्याला अभिप्रेत असणाऱ्या स्वातंत्र्याचा अर्थ आणि आशयाला मर्यादा पडतात स्वातंत्र्याचा अर्थ आणि आशय सर्वस्पर्शी राहत नाही. तो जेव्हां समाज परिवर्तनाच्या कार्याच्या पाठीमागे प्रेरकशक्ती म्हणून उभा राहातो तेव्हां ज्या स्वातंत्र्याची अभिलाषा तो बाळगतो त्याच्या सर्व समावेशकत्वाच्या कक्षा तो रूंदावत असतो. पण महाराष्ट्रात दुर्दैवाने तसे घडले नाही. विष्णूशास्त्री चिपळूणकरांना जाज्वल्य देशभक्तीचा स्त्रोत भारताच्या प्राचीन धार्मिक व ऐतिहासिक परंपरांमध्ये सापडला. चिपळूणकरांच्या वक्तृत्वप्रचूर व पांडित्यपूर्ण भाषेने राष्ट्र भक्तीला भावनिक आणि वैचारिक वैभव प्राप्त करून दिले. सामाजिक परिवर्तनाचा त्यांनी फारसा विचार केला नाही. उलट समाज-सुधारकांच्या विरोधात ते उभे राहिले. बहुजन समाजाविषयी, त्यांच्या अनेकविध प्रश्नांविषयी त्यांनी आस्था दाखविली नाही. ज्ञानाच्या सर्व किल्ल्या ब्राह्मणांच्या कंबरेला बांधल्या गेल्या होत्या ही गोष्ट खरी आहे. त्या किल्ल्यांना कोणीही हात लावू नये याचीच जणू ते काळजी वाहत होते. त्यांच्या संकल्पनेतल्या राष्ट्रवादाला आणि राजकीय स्वातंत्र्याला काय अभिप्रेत होते कुणास ठाऊक. सामाजिक सुधारणांच्या बाबतीत त्यांनी सातत्याने नकाराचीच भूमिका घेतली.

लोकमान्य बाळ गंगाधर टिळकांनी राष्ट्रवादी विचारसरणीचे ऐश्वर्य वाढविले. तिची आशयगर्भता वाढविली. भारतीय जनतेच्या मनात त्यांनी स्वातंत्र्याची आकांक्षा निर्माण केली. राष्ट्रवादाच्या

कक्षा त्यांनी अधिक विस्तारित केल्या. स्वातंत्र्याची चळवळ त्यांनी सामान्य लोकांपर्यंत नेण्याचा नेत्रदीपक प्रयत्न केला. लोकांच्या मनात त्यांनी ब्रिटिश राज्यसत्तेविरूद्ध फार मोठा असंतोष निर्माण केला. त्यांनी महाराष्ट्राला भारतातील जहालवादी राजकीय विचाराचे व चळवळीचे शक्तीकेंद्र बनविले. " स्वराज्य हा माझा जन्मसिद्ध हक्क आहे आणि तो मी मिळविणारच " असे उत्सपूर्तपणे उदगारणाऱ्या लोकमान्यांनी भारतीयांना स्वातंत्र्याची नुसती घोषणाच दिली नाही, तर त्याची एक महान संकल्पनाही दिली. त्यांनी भारतीयांच्या हातात कर्मवादाचे तत्वज्ञान व राष्ट्रभक्तीचे शस्त्र दिले. लोकमान्यांनी केलेली ज्ञानसाधना म्हणजे त्यांच्या राष्ट्रसेवेचा आविष्कारच होता. त्यांनी केलेले संशोधन हे त्यांच्या ध्येयवादाची साक्ष देणारे आहे. " मराठा " आणि " केसरी " मध्ये त्यांनी केलेले लिखाण तर स्वातंत्र्य आंदोलनाचे प्रज्वलन होते. भारताचे राजकीय स्वातंत्र्य म्हणजे लोकमान्यांचा ध्यास ! आणि ते मिळविण्यासाठी कुठलीही किंमत देण्याची लोकमान्यांची तयारी होती. टिळकांची बुद्धिमता, टिळकांचे चारित्र्य, टिळकांची देशभक्ती, टिळकांचा आत्मविश्वास आणि टिळकांची निर्भयता- नव्हे टिळकांचे सबंध जीवन आणि कार्य हे अलौकिक स्वरूपाचेच होते.

पण टिळकयुगाचा आरंभ झाल्यानंतर येथील सामाजिक चळवळींना ओहोटी लागल्याचे दिसून येते. टिळकयुगात महाराष्ट्राचं सामाजिक व राजकीय मन एकसंध राहू शकलं नाही. महाराष्ट्राच्या वैचारिक जीवनात एक दुभंग **(dichotomy)** निर्माण झाला. तो आजही पूर्णतः नामशेष झालेला नाही. सामाजिक परिवर्तनाची प्रक्रिया मंद झाली. सामाजिक प्रबोधनाचे कार्य बाजूला पडले. महाराष्ट्रातील समाजकारण आणि राजकारण एकमेकांपासून अलग होणे किंवा

दूरजाणे याला त्या काळातील ऐतिहासिक अपरिहार्यता मानता येईल का ? या प्रश्नाचे उत्तर देणे हे म्हणावे तेवढे सोपे नाही. कारण हा अतिशय अवघड व गुंतागुंतीचा प्रश्न आहे. पण मला प्रामाणिकपणे असे वाटते की महाराष्ट्रातील राजकारणाला समाजकारणापासून पूर्णतः अलग करणे ही ऐतिहासिक अपरिहार्यता नव्हती. तसे करण्यामध्ये लोकमान्यांची धोरणात्मक व्यवहार्यता होती असे मानता येईल. पण महाराष्ट्राच्या सामाजिक व राजकीय जीवनात निर्माण झालेला हा दुभंग ऐतिहासिक अपरिहार्यतेचा परिणाम होता असे मला वाटत नाही. ती ऐतिहासिक अपरिहार्यता गांधीजींना का जाणवली नाही ? या प्रश्नाच्या उत्तराचा आधार घेतला तर ऐतिहासिक अपरिहार्यतेच्या प्रश्नाची गुंतागुंत सोडवता येईल.

स्वातंत्र्यप्राप्तीसाठी सर्व भारतीयांच्या ऐक्याची आवश्यकता होती ही गोष्ट उघड आहे. सामाजिक प्रश्नांवर कलह निर्माण होण्याची भीती होती; आणि म्हणून लोकमान्य टिळकांनी आधी राजकीय स्वातंत्र्य मिळविण्यासाठी सर्वस्व पणाला लावण्याची आवश्यकता लोकांच्या लक्षात आणून दिली. राजकीय चळवळीला गती देणाऱ्या अनेक घटना हिंदुस्थानात घडत होत्या त्या घटनांनी इंधनाचे काम केले. बंगालची फाळणी ही त्या दृष्टीने अतिशय ठळक घटना होती. राष्ट्रीय काँग्रेसपक्षाचे व्यासपीठ हे दिवसेदिवस अधिक प्रभावी व प्रातिनिधिक होत होते. बंगालच्या फाळणी नंतर लोकमान्यांना कारावासाची जी शिक्षा भोगावी लागली ती भारतीय राजकारणावर दूरगामी परिणाम करणारी ठरली. पहिल्या जागतिक महायुद्धाचाही राजकीय चळवळीवर परिणाम झाला. ती अधिक तीव्र बनली.

लोकमान्य टिळकांनी स्वीकारलेले धोरण व्यवहार्यतेला धरून

असले तरी त्यांनी सामाजिक प्रश्नांच्या संदर्भात घेतलेला पवित्रा मात्र तितकासा पोषक नव्हता ही वस्तुस्थिती आहे. समाजकारणात लोकमान्य हे परंपरावादीच राहिले. सामाजिक प्रश्नांच्या बाबतीत ते स्थितीवादीच होते स्त्री स्वातंत्र्यासाठी, अस्पृश्यता निवारणासाठी आणि जातीभेदाची तीव्रता कमी करण्यासाठी ते प्रयत्नशील राहिले असते तर महाराष्ट्रातील राजकारणाला सामाजिक प्रगल्भता व आशयगर्भता मिळू शकली असती. अस्पृश्यता निवारणाच्या कार्याला आपले जीवितकार्य मानणाऱ्या कर्मवीर विठ्ठल रामजी शिंदे यांच्या प्रयत्नाला त्यांनी पाठिंबा दिला असता तर बहुजनसमाजाच्या व दलितसमाजाच्या मनात राष्ट्रीय चळवळीपासून अलिप्त राहण्याचा विचार बळावला नसता. न्यायमूर्ती रानड्यांना महात्मा फुल्यांच्या कार्याचे महत्व व त्यांच्या व्यक्तीमत्वातला मोठेपणा जसा जाणवला तसा विष्णूशास्त्री चिपळूणकरांना व लोकमान्य टिळकांना जाणवला असता तर महाराष्ट्राला एक वेगळेच चित्र पहावयास मिळाले असते. कोल्हापूर संस्थानात राजर्षी शाहू छत्रपतींच्या संदर्भात जे वेदोक्त प्रकरण घडले त्यात टिळकांनी अलिप्तता बाळगली असती तर ब्राह्मण-ब्राह्मणेतर वादाला पुढे जे अनिष्ठ वळण लागले ते कदाचित लागले नसते. उलट राजकीय चळवळीला एक वेगळी दृष्टी लाभली असती. सामाजिक विघटनाच्या मार्गावरून ती गेली नसती असे मला वाटते.

टिळकयुगात महाराष्ट्राच्या सामाजिक व राजकीय जीवनात एक खोल व रुंद अशी दरी निर्माण झाली होती, हे आपल्या लक्षात आलेच असेल. पण या काळातही समाजकारणाला आपले वर्चस्व मानणाऱ्या दोन व्यक्ती उदयास आल्या. कर्मवीर विठ्ठल रामजी शिंदे आणि राजर्षी शाहू छत्रपती या त्या दोन व्यक्ती होत. शिंदे हे प्रार्थना समाजिस्ट होते. एक थोर समाज सुधारक,

संशोधक आणि विचारवंत म्हणून त्यांना आपण ओळखतो. जगातील विविध धर्मांचा अभ्यास केलेल्या या थोर पुरुषाने सर्वधर्मसमभावाची आयुष्यभर पूजा बांधली होती. ते विचारवंत आणि तत्वचिंतक तर होतेच ; पण त्याहीपेक्षा अधिक ते समाज सुधारक होते. भारतीय समाजातील अस्पृश्यतेची कारणं शोधण्याचा व ती घालवण्यासाठी त्यांनी केलेल्या प्रयत्नांचा विचार केला तर त्यांचे थोरपण आपल्या लक्षात येईल. अस्पृ-श्यतेच्या प्रश्नांचा त्यांच्या इतका सखोल अभ्यास केलेला संशोधक आजही क्वचितच सापडेल. " भारतीय अस्पृश्यतेचा प्रश्न " हा त्यांचा १९३३ साली प्रसिद्ध झालेला ग्रंथ आजही अतिशय मोलाचा आहे. अस्पृश्यता निवारणाच्या प्रश्नाला राष्ट्रीय प्रश्न म्हणून लागणारी मान्यता त्यांनी १९१७ साली कलकत्ता या ठिकाणी भरलेल्या नॅशनल काँग्रेसच्या अधिवेशनात प्राप्त करून घेतली. त्यासाठी त्यांना फार परिश्रम करावे लागले होते.

कर्मवीर शिंद्यांच्या मनावर गांधीजींच्या विचारांचा व कार्याचाही सखोल परिणाम झाला होता. बहुजन समाजाला राष्ट्रीय आंदो-लनात सामिल आणि सहभागी होण्याचे त्यांनी आवाहन केले होते. कुठल्याही जातीय प्रलोभनाला बळी न पडता त्यांनी राजकीय क्षेत्रातही त्यागाच्या व समर्पणाच्या भावनेने कार्य केले. समाज सुधारणेचे विचार व प्रेरणा घेवून राजकारणात कार्य करणाऱ्या या माणसाला अनेक यातना भोगाव्या लागल्या. अस्पृश्यांच्या व शेतकऱ्यांच्या प्रश्नांचा पाठपुरावा करणाऱ्या या व्यक्तीला खुद्द प्रार्थना समाजिस्टांकडूनही दुस्वास सोसावा लागला. आईच्या मायेने दलितांची सेवा करणाऱ्या या महापुरुषाला " दायी " म्हणून कमी लेखण्यात आले. अस्पृश्य समाजाची आई त्यांना कदाचित होता आलेही नसेल. पण सख्ख्या मावशीचे स्थान त्यांना द्यावेच लागेल. ते अमान्य करता येणार

नाही. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्यानंतर दलितांच्या नेतृत्वाची जी अवस्था झाली ती पाहिल्यानंतर "आई मरो अन् मावशी तरो", असे दु:खाने म्हणण्याची पाळी दलित समाजावर आली आहे.

कर्मवीर शिंदे हे सर्वांगीण सुधारणावादाचे प्रवक्ते होते. अस्पृश्यता निवारण्याच्या कार्यासाठी त्यांनी प्रयत्नांची पराकाष्ठा केली. मुरळीची चाल बंद करावी म्हणून त्यांनी प्रयत्न केले. शेतकऱ्याच्या प्रश्नालाही त्यांनी हात घातला. १९०६ साली स्थापिलेली त्यांची "डिप्रेस्ड क्लासेस मिशन" ही संस्था समाज सुधारणेच्या कामी कृतीशील राहिली. कर्मवीरांनी स्त्रीशिक्षणाच्या प्रश्नाकडेही अतिशय आस्थेने पाहिले. जीवनाच्या शेवटपर्यंत नंदादीपाप्रमाणे समाजकार्यात ते तेवत राहिले.

महाराष्ट्रातील समाजसुधारणेच्या कार्यात राजर्षी शाहू महाराजांनी जे कार्य केले ते प्रचंड स्वरूपाचे होते. त्यांच्या कर्तृत्वाचा गौरव करण्यासाठी शब्द अपुरे पडतात. हा राजा सर्वदृष्टीने प्रचंड व्यक्तिमत्वाचा होता. त्यांना महाराष्ट्राच्या सामाजिक इतिहासातल्या पौरुष्याचा नायगारा म्हणता येईल. त्यांचे जीवन म्हणजे सामाजिक क्रांतीचा स्फोटच ! **His life was an explosion of Maharashtra's revolutionary imagination.** क्रांतीकारकाला देखील कवी इतकीच प्रतिभा आवश्यक असते. शाहू महाराजांना ती लाभली होती. महाराष्ट्रातल्या सामाजिक इतिहासातले ते क्रॉमवेल होते. सामाजिक स्वातंत्र्यासाठी क्रॉमवेलच्या आवेशाने ते लढले. बहुजन समाजाला व दलितांना त्यांनी मानवी अधिकार व अस्मिता दिली. सामाजिक लोकशाहीचा **Magna Carta** त्यांनी जातिव्यवस्थेत भरडलेल्या आपल्या जनतेच्या हाती दिला. येथील

जातिव्यवस्थेने आमानुषीकरणाच्या खाईत शतकानुशतके सडत ठेवलेल्या मूक व बहिष्कृत लोकांना त्यांनी "माणूसपण" मिळवून दिले. वेदोक्त प्रकरणाने तर महाराजांच्या स्वत्वावर आणि अस्मितेवर घाला घातला होता. त्यांना शूद्र ठरविणाऱ्या ब्राह्मण्याने या प्रकरणात किळसवाण्या क्षूद्रत्वाचे प्रदर्शन केले. राजर्षींनी डिवचलेल्या सिंहासारखी आक्रमक वृत्ती या प्रकरणात दाखविली. परिणामतः एका फार मोठ्या सामाजिक संघर्षाने महाराष्ट्रात पेट घेतला. पंचगंगेचे पाणी विद्रोहाने पेटले. राजर्षी शाहू महाराजांच्या रूपाने महात्मा फुल्यांच्या नंतर समाजाच्या खालच्या थरातील सर्व जातींना एक अतिशय विमोचक व आश्वासक शक्ती प्राप्त झाली होती. ती शक्ती जेवढी विद्रोही होती तेवढीच विधायकही होती. राजर्षी शाहू महाराजांनी बहुजन समाजाला व पददलितांना स्वाभिमान दिला.

राजर्षी शाहू महाराजांनी समाज सुधारणेच्या कार्यात गुंतवून घेतलेल्या व्यक्तींना व संस्थांना आधार दिला. आर्यसमाजाच्या धार्मिक व सामाजिक कार्याला त्यांनी कोल्हापूर संस्थानात पाया मिळवून दिला. सत्य शोधक चळवळीला तर त्यांच्या प्रेरणेने उधानच आले. जेव्हा ती विकृतीच्या भोवऱ्यात सापडली तेव्हा त्यांनी तिच्याकडे ताटस्थ्याने पाहिले. सत्य शोधक चळवळीला पुढे पुढे " ब्राह्मण समाज " व " ब्राह्मण्य " यातला फरक नीटसा आकलन झाला नाही. भास्करराव जाधवांसारखी एखादीदुसरी व्यक्ती सोडली तर बाकीच्यांना सत्यशोधक समाजाच्या तत्वज्ञानाचा आशय कळू शकला नाही. शाहू महाराजांच्या मनात ब्राह्मणांविषयी तिळमात्रही द्वेष नव्हता. उलट ब्राह्मण समाजानेच त्यांच्यावर आग पाखडली. कारण त्याच्या परंपरागत हितसंबंधाना महाराजांच्या सुधारणावादी राज्यकारभारामुळे धक्का पोहोचला होता.

राजर्षी शाहू महाराजांनी आपली सर्व सत्ता शोषितांच्या व पददलितांच्या पाठीमागे उभी केली. सर्वंकष समाज परिवर्तन हा त्यांच्या राज्यकारभाराचा केंद्रबिंदू होता. सामाजिक लोकशाहीचा त्यांनी पाया घातला. त्यांनी आपल्या संस्थानातील सर्व जातीतील लोकांना शिक्षणाची संधी उपलब्ध करुन दिली. विविध जातीतील विद्यार्थ्यांसाठी त्यांनी वसतिगृहे बांधून दिली. कोल्हापूर शहर हे त्यांनी शिक्षणाचे व वसतिगृहांचे केंद्र बनविले. शिक्षणाच्या अभावामुळे बहुसंख्य लोक सामाजिक व आर्थिक विषमतेमध्ये पिढ्यान्‌पिढ्यापासून भरडले गेले होते. या वस्तुस्थितीची त्यांना जाणीव होती. म्हणून त्यांनी शिक्षणासाठी आपला खजिना रिकामा करायचे ठरविले होते. पण शिक्षणाची संधी उपलब्ध करूनच ते केवळ थांबले नाहीत; त्यांनी मागासलेल्या सर्व जातीजमातीतील शिकलेल्या लोकांना नोकऱ्याही उपलब्ध करून दिल्या. नोकरीमध्ये मागासलेल्या जातींसाठी ५० टक्के जागा राखून ठेवल्या. गेल्या तीसबत्तीस वर्षांच्या स्वातंत्र्याच्या काळात लोकसत्ताक भारतीय शासनाला जे करता आलं नाही ते ह्या निधड्या छातीच्या, निर्भय वृत्तीच्या व भविष्यवेधी दृष्टीच्या राजाने करून दाखविले होते हे आपण लक्षात घेणे आवश्यक आहे. नियतीलाही वेसण घालण्याची ताकद या पुरुषसिंहामध्ये होती हे इतिहासाला तरी विसरता येणार नाही.

राजर्षी शाहू महाराजांनी अस्पृश्यता निर्मूलनासाठी स्तिमित करणारे प्रयत्न केले. अस्पृश्यांच्या मुक्तीलढ्यात त्यांनी एका फार मोठ्या सेनानीची भूमिका पार पाडली. ठिकठिकाणी त्यांनी महार परिषदा घेण्यासाठी दलितांना प्रेरणा दिली. काही परिषदांच्या अध्यक्षस्थानी ते स्वतः विराजमान झाले, छत्रपती शिवाजी महाराजांच्या हिंदवी स्वराज्याच्या संकलपनेला सामाजिक आशय देण्यांचा त्यांनी यशस्वी प्रयत्न केला. शिवाजी

महाराजांना भारतीय राष्ट्रवादाचे प्रेरणा स्त्रोत व स्थान मानणाऱ्या मंडळींना आजही हा सामाजिक आशय कळलेला नाही, ही दुर्दैवाचीच गोष्ट नाही का ?

राजर्षी शाहू छत्रपती हे भारताच्या इतिहासातील **Justinian** होते. चातुर्वर्ण्यावर आधारलेल्या प्राचीन व परंपरागत हिंदू कायद्याला कोणत्याही हिंदू राजाने बदलण्याचा प्रयत्न केला नाही ही ऐतिहासिक वस्तुस्थिती आहे. उलट त्याचे पावित्र्य टिकवण्याचाच या देशातील राजांनी व राज्यकर्त्यांनी प्रयत्न केले. त्याला वैचारिक आव्हान देण्याचे सामर्थ्य भारतातील शासन कर्त्यांजवळ नव्हते म्हटले तरी चालेल. पण राजर्षी शाहू महाराज याला अपवाद आहेत. ब्रिटिशांच्या अमदानीतील वारे त्यांच्याही संस्थानात आधुनिकतेचे तत्वज्ञान घेवून वाहत होते ही गोष्ट खरी आहे. पण इंग्रजांना जे जमले नाही ते राजर्षी शाहू महाराजांनी करून दाखविले. त्यांनी अस्पृश्यता निर्मूलनाचा कायदा केला, अंतरजातीय विवाहांना कायद्याने मान्यता दिली ; कुलकर्णी वतने तसेच महार वतने त्यांनी कायद्याने नामशेष केली. सामाजिक सुधारणा घडवून आणणाऱ्या या कायद्यांबरोबरच त्यांनी लोकांची आर्थिक सुबत्ता वाढविण्यासाठी अनेक योजना आखल्या व कार्यान्वित केल्या. शेती विकासासाठी त्यांनी राधानगरी धरण बांधले. व्यापार उद्योग वाढविण्यासाठी त्यांनी बाजार पेठांची सोय जनतेला उपलब्ध करून दिली. आपल्या संस्थानात त्यांनी उद्योजकता वाढविण्यासाठी सोयी उपलब्ध करून दिल्या. सहकाराचे तत्वज्ञान आर्थिक क्षेत्रात राबविण्यासाठी त्यांनी उत्तेजन दिले. या सर्व गोष्टींकडे त्यांनी जातीने लक्ष दिले. कोल्हापूर शहराला त्यांनी कला-संस्कृतीचे एक पर्यायी व प्रभावी केंद्र बनविले. अनेक कलाकरांना त्यांनी राज्याश्रय दिला.



RAO CHAVA... UMB...

राजर्षी शाहू महाराजांनी जे क्रांतीकारी कार्य केले ते भारतातील इतर कुठल्याही समकालिन संस्थानिकाला करता आले नाही, ही वस्तुस्थिती आहे, बडोदा संस्थानच्या सयाजीराव गायकवाडांनी सामाजिक परिवर्तनाच्या प्रक्रियेसाठी महत्वाचे विधायक कार्य केले हे आपल्याला माहित आहेच. पण राजर्षी शाहू महाराजांचे क्रांतीकारकत्व त्यांच्या जवळ नव्हते. राजर्षी शाहू छत्रपतींनी आपल्या मनगटावर क्रांतीचे कडे घातले होते आणि गळ्यात क्रांतीचा ताईत बांधला होता. त्यांच्या मनगटातील शक्ती व हृदयातील क्रांतीकारक उर्मी अवर्णणीय अशीच होती, आणि म्हणूनच सर्व जातींच्या लोकांचे नेतृत्व त्यांना करता आले. त्यांनी मराठा परिषदा ज्या जोमाने भरविल्या त्याच व तितक्याच जोमाने महार परिषदाही भरविल्या. दलितांचे नेतृत्व करीत करीतच आंबेडकरांना ते पुढे आणण्याचा प्रयत्न करीत होते. आंबेडकरांच्या डोळ्यात त्यांना समाज क्रांतीचे स्फुल्लिग दिसते. पददलितांना आंबेडकरांच्या रूपाने नेता मिळाला म्हणून त्यांना मनस्वी आनंद वाटला होता. १९२२ साली महाराजांचा अकाली अंत झाला. त्यांचे अकाली निधन झाले नसते तर कादाचित ब्राह्मणेतरांच्या चळवळीपासून दलितांची चळवळ पुढे वेगळी झाली नसती असे मला वाटते आंबेडकरांना त्यांनी जरूर साथ दिली असती. जेधे-जवळकरांनी महाडच्या सत्याग्रहाच्या वेळी जी भूमिका घेतली होती ती महाराजांनी घेतली नसती. राजर्षी शाहूंच्या मृत्यू नंतर सत्यशोधक चळवळीच्या नेतृत्वाचा ब्रेक तुटला होता. फुले-शाहूंच्या मार्गापासून ती थोडीशी दूर गेली. कर्मवीर विठ्ठल रामजी शिंदेही ह्या धकाधकीत जाऊ शकले नाहीत.

मित्रहो, टिळकांच्या मृत्यूनंतर देशातील राजकारणाची धुरा गांधीजींच्या हातात गेली हे आपल्याला माहित आहेच. महाराष्ट्रा-

नेही गांधीजींचे नेतृत्व स्वीकारले. गांधीजींच्या नेतृत्वाने स्वातंत्र्य लढ्याला एक व्यापक असा आशय प्राप्त करून दिला. त्याला एक वेगळेच तेज प्राप्त झाले. गोखल्यांना गुरुस्थानी मानणाऱ्या गांधीजींचे नेतृत्व जहालवादी नव्हते. एका अर्थाने ते मूलग्रामी मात्र अवश्य होते. त्यांच्या नेतृत्वाची प्रवृती सात्विक होती आणि प्रकृती अध्यात्मिक होती. गांधीजींनी राजकारणाचा विचार समाजकारणाच्या संदर्भात केला हे विशेष महत्वाचे आहे. आणि म्हणून त्यांना समाजकारण व राजकारण एकत्रित आणता आले. राजकारणाला तसेच समाजकारणाला नैतिक मूल्यांचे आधिष्ठान त्यांनी प्राप्त करून दिले. आणि म्हणूनच भारताचे स्वातंत्र्य आंदोलन एक प्रगल्भ असा मानवतावादी आशय घेवून जगाच्या समोर उभे राहिले. समाज जीवनाच्या सर्व अंगोपांगांना स्पर्शून ते पुढे गेले. गांधीजींचे नेतृत्व हे खऱ्या अर्थाने एका महान प्रेषिताचे नेतृत्व होते. आणि म्हणूनच हिंदुस्थानच्या स्वातंत्र्याची चळवळ ही केवळ राजकीय स्वातंत्र्याची चळवळ न राहता ती सांस्कृतिक विमोचनाची व उन्नयनाची सर्वंकष चळवळ बनली. गांधीजींनी कितीतरी प्रश्नांना हात घातला ! राष्ट्रीय काँग्रेस पक्ष हा त्यांनी लोकांच्या दारात नेवून उभा केला. स्वातंत्र्य आंदोलनाला सुधारणावादाचा पाया देण्यासाठी त्यांनी आपले सर्वस्व वेचले स्वातंत्र्याच्या प्रेरणांबरोबर त्यांनी जनमानसात सामाजिक जाणीवाही निर्माण केल्या. राजकीय स्वातंत्र्य आधी का सामाजिक स्वातंत्र्य आधी ? या प्रश्नाचा काथ्याकूट त्यांनी केला नाही. समाजजीवनाच्या सर्वांगांना स्वावलंबी व विकसित करणारे स्वातंत्र्य हे अशा वेगवेगळ्या कप्प्यात कोंडता येत नाही आणि विभागताही येत नाही. वस्तुतः स्वातंत्र्याचा विचार हा जीवनाच्या पूर्णांकाचा विचार असतो. तो अपूर्णांक विचार असू शकत नाही. गाधीजीनी राजकीय स्वातंत्र्याला साधनरूप मानले; त्यांच्या कार्याचे अंतीम

उद्दिष्ट व साध्य व्यक्ती व समाजाचे स्वावलंबन व सर्वांगीण विकास हेच होते. आणि शेवटी असा विकास कोणासाठी असतो? समाजातला जो शेवटचा माणूस आहे त्याच्यासाठीच तो असतो, नव्हे असला पाहिजे. "सर्वोदय" बनाम "अंत्योदय" हेच गांधीजींच्या जीवितकार्याचे प्रमुख उद्दिष्ट होते. त्यांनी मांडलेली सर्वोदयाची संकल्पना ही स्वातंत्र्य, समता व बंधुत्वाला आपल्या पोटात सामावून घेते हे वेगळे सांगण्याची कांहीच आवश्यकता नाही.

महात्मा गांधींच्या विचारांचा व कार्याचा प्रभाव सबंध देशातील राजकारणावर, समाजकारणावर आणि अर्थकारणावर पडणे अगदी अपरिहार्य होते. तो प्रभाव त्या काळातील कोणत्याही पर्यायी विचारसरणीला किंवा वादाला कमी करता आला नाही. अनाकलनीय शक्तीच्या रूपाने गांधीजी भारतीय जनतेसमोर उभे राहिले. ही शक्ती भारताला राजकीय, सामाजिक आणि आर्थिकदृष्टया परावलंबी व गुलाम बनविणाऱ्या दृश्य आणि अदृश्य पाशवी शक्तींच्या विरोधात उभी राहिली. भारतीय जनतेचे नीतीधैर्य आणि आत्मविश्वास त्यामुळे वाढला. दलित व पीडित लोकांकडे वळल्याशिवाय या ठिकाणच्या समाजाची पुनर्रचना करता येणार नाही याची त्यांना कल्पना होती. भारतातील असंख्य खेड्यांकडे गांधीजी वळले ते याचसाठी; अस्पृश्यतेचा कलंक धुण्याचा संकल्प सोडून दलितोद्धाराचे कार्य त्यांनी हाती घेतले ते याचसाठी; आणि शतकानुशतके अतिशूद्रापेक्षांही अधिक उपेक्षित वागणूक मिळालेल्या भारतीय स्त्रियांच्या दुःखाला त्यांनी वाचा फोडली तेही याच साठी. स्वावलंबन म्हणजे स्वातंत्र्य आणि ते मिळविण्याच्या विविध वाटा दाखवित असते शिक्षण ! आणि म्हणूनच महात्मा गांधींनी शैक्षणिक प्रश्नांचा गांभिर्याने विचार केला, शिक्षणाची संधी स्त्रियांनाही मिळाली पाहिजे असा त्यांचा आग्रह होता.

महाराष्ट्रात यापूर्वी महात्मा फुले यांनी स्त्रियांच्या शिक्षणाचा पाया घातला होता. सावित्रीबाई फुल्यांनी त्यासाठी आपले जीवन सर्मपित केले होते. कर्मवीर विठ्ठल रामजी शिंदे यांनीही या दिशेत कार्य आरंभिले होते. महर्षी कर्व्यांनी तर स्त्रीशिक्षणाच्या कार्याला आपले जीवित कार्य मानले होते. पंडिता रमाबाईलाही आपण या संदर्भात विसरू शकणार नाही. पण गांधीजींनी भारतीय स्त्रीला प्रत्यक्षत: स्वातंत्र्य लढ्यातच उभे केले. एका नवीन शक्तीचा आविष्कार स्वातंत्र्य लढ्यात त्यांनी घडवून आणला. पुरुषांच्या खांद्याला खांदा लावून भारतीय स्त्री स्वातंत्र्य संग्रामात आत्मविश्वासाने, त्याग व सेवेच्या भावनेने उभी राहिली. गांधीजींच्या नेतृत्वाने महाराष्ट्रातील राजकारणावर, समाज-कारणावर आणि अर्थकारणावर सखोल परिणामकता निर्माण केली.

महाराष्ट्रात गांधीयुगाची प्रभा पसरत असताच येथील सामाजिक व राजकीय जीवनात डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या रूपाने एक वेगळे सामर्थ्य उभे राहात होते. त्या सामर्थ्याचा प्रत्यय पुढे गांधीजींना देखील आला. आणि त्या सामर्थ्याचा आविष्कार विवेचक बुद्धिमत्तेतून, धवल चारित्र्यातून आणि धगधगत्या ध्येयवादातून झाला होता हे मी आपणास सांगू इच्छितो. त्या सामर्थ्यातून महाराष्ट्रातील आणि पर्यायाने सबंध देशातील दलितांचे नेतृत्व निर्माण झाले हे वेगळे सांगण्याची आवश्यता नाही. हे सामर्थ्य पुढे येताच महाराष्ट्रातील अस्पृश्यांच्या जीवनाला रूपेरी कडा प्राप्त झाली. त्यांच्यात आशावाद निर्माण झाला; स्वत:च्या अस्मितेची जाणीव त्यांना झाली; आणि स्वत:च्या जीवनातले "स्वत्व" संघर्षाशिवाय आपल्याला प्राप्त होऊ शकणार नाही या गोष्टीचे भान त्यांना अगदी प्रकर्षाने

झाले. ' **Educate, agitate and organise** ' हा संदेश त्यांनी दलित भारताला दिला.

डॉ. आंबेडकरांनी प्रथमतः सामाजिक प्रश्नांना हात घातला हिंदु समाजाची चातुर्वर्ण्य व जातिव्यवस्थेवर आधारलेली कालबाह्य मूल्यसरणी बदलल्याशिवाय आणि व्यक्तिस्वातंत्र्य, आर्थिक समानता व सामाजिक न्यायाच्या पायावर त्याची पुनर्बांधणी केल्याशिवाय येथील शोषित व पीडित लोकांना आपली उन्नती करून घेता येणार नाही याची त्यांना तीव्र जाणीव होती. ती जाणीव उराशी बाळगूनच त्यांनी आपल्या जीवित कार्याची सुरुवात केली. डॉ. आंबेडकरांनी एकीकडे येथील धार्मिक, सामाजिक व आर्थिक विषमतेच्या कारणांचा शोध घेण्याचा प्रयत्न केला. तर दुसरीकडे त्या विषमतेच्या विरुद्ध प्रत्यक्ष सामाजिक लढे उभे केले. १९२० साली "मूकनायक" हे पाक्षिक त्यांनी सुरू केले. राजर्षी शाहू महाराजांनी त्यांना या कामी अर्थसाह्य तर दिलेच पण त्याच बरोबर मानसिक आधारही दिला. डॉ. आंबेडकरांनी या नियतकालिकाच्या पहिल्याच अंकात विषमतेवर आधारलेल्या हिंदुसमाजाची वास्तव प्रतिमा वाचकांसमोर ठेवली. आणि ती अशी : "हिंदुसमाज हा एक मनोरा आहे. व एक एक जात म्हणजे त्याचा एक एक मजला आहे. या मनोऱ्याला शिडी नाही. एका मजल्यावरून दुसऱ्या मजल्यावर जाण्याची सोय नाही; मार्ग नाही. ज्या मजल्यात जन्म होतो त्याच मजल्यात मरावे लागते. ब्राह्मण जात ही सगळ्यात वरच्या मजल्यावर राहते आणि अतिशूद्र सगळ्यात खालच्या मजल्यावर राहतात हे सांगण्याची आवश्यकता नाही." आंबेडकरांनी असे हे वास्तवचित्र जगासमोर उभे केले. इतकेच नव्हे कर हयातभर या समाजाने पोसलेल्या विषमतेची कठोरतेने ते मीमांसा करीत राहिले. प्रथमतः त्यांनी या बंद व अंधाऱ्या मनोऱ्याला समतेच्या तत्वज्ञानाची शिडी देण्याचा प्रयत्न

केला. त्याच्या एका मजल्यावरून दुसऱ्या मजल्यावर जाण्यासाठी मार्ग तयार करता येईल का याचा त्यांनी विचार केला. ह्या मनोऱ्याची रचना थोडीशी बदलता येईल का याचा त्यांनी प्रयत्न आरंभिला.

डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी " वर्ण " किंवा " जात " ह्या संकल्पनेची, संस्थेची आणि ऐतिहासिक वास्तवाची व्युत्पत्ती शोधली. त्या संस्थेच्या सांस्कृतिक व्यूहरचेनेचा अभ्यास त्यांनी केला. श्रमविभागणीच्या नावावर आपल्या अस्तित्वाच्या, उपयुक्ततेच्या व अपरिहार्यतेच्या विचारावर भर देणाऱ्या जातिव्यवस्थेने हिंदुसमाजाचीच विषम विभागणी केली आहे, हे पटविण्याची खरं तर काहीच आवश्यकता नव्हती. ती एक दारूण वास्तवता होती.या जातिव्यस्थेमुळे विघटित झालेल्या हिंदुसमाजाला स्थितिशीलतेच्या बंधनातून मुक्त होणे शक्य नव्हते. तिच्यामुळे राष्ट्र म्हणून जगासमोर उभे राहण्याची ताकद हिंदुस्थानला मिळणे शक्य नव्हते. हिंदुसमाज म्हणजेच एक **myth** आहे ही गोष्ट आंबेडकरांच्या लक्षात आली. आणि हिंदुसमाज जर एक **myth** असेल तर हिंदुस्थान हा देश एक **reality** म्हणून जगासमोर कसा उभा राहील? हिंदुसमाजातील प्रत्येक वर्ण, त्या त्या वर्णातील प्रत्येक जात आणि त्या त्या जातीतील प्रत्येक पोटजात ही **reality** असल्यामुळे हिंदूना एकसंध असा " समाज " बनवता आला नाही, "राष्ट्र"ही बनवता आले नाही. अनेक जातींच्या **realities** मधून हिंदुसमाज नावाचे **myth** तयार झाले. हिंदुस्थानला राष्ट्र या नावाचे " वास्तव " बनण्यासाठी हिंदुसमाजाला " वास्तव " म्हणूनच जगासमोर उभे राहणे आवश्यक होते. पण ते घडले नाही याला आमचा इतिहास साक्ष आहे. हा इतिहास बाबासाहेबांना माहित नव्हता असे म्हणता येणार नाही. " वर्ण " किंवा " जात " नावाची विषमतेचा

पुरस्कार करणारी गोष्ट नष्ट केली तर हिंदुसमाजाची पुनर्रचना करता येईल हा आशावाद त्यांनीही उरी बाळगलेलाच होता. पण त्यांच्या पदरात निराशाच पडू लागली. हिंदुसमाजात " जात " ही स्वायत्त संस्था आहे. तिचे स्वयंभूत्व हिंदुधर्मशास्त्रांनीच मानून केलेले आहे. आणि धर्मशास्त्राला कोण बदलणार ? धर्मशास्त्र म्हणजे काही राज्यघटना नाही. कोणत्याही धर्मशास्त्रात ते बदलण्याचे कलम नाही ; **amendment clause** त्यात नाही. ज्यांना मान्य नाही त्यांनी तो धर्म सोडणे हा एकच पर्याय अशा लोकांसमोर होता. अनेकांनी तो सोडलाही. अस्पृश्यांच्या समोरही हाच मार्ग होता. पण आंबेडकरांना हा समाज बदलता येईल असे वाटत होते. आणि म्हणूनच त्यांनी या समाजाचे वास्तवरूप लोकांसमोर ठेवले ; त्याने जोपासलेल्या विषमतेची ते कठोरपणे मीमांसा करीत राहिले. १९३५ पर्यंत फार मोठ्या उमेदीने त्याची पुनर्रचना करण्याची पराकाष्ठा त्यांनी केली. १९२४ साली " बहिष्कृत हितकारिणी सभा " या नावाची संस्था त्यांनी स्थापन केली. तिच्या व्यासपीठावरून सुधारणावादाचा त्यांनी अगदी हिरिरीने पुरस्कार केला.

बहिष्कृत जातींच्या अधिकारांसाठी आंबेडकरपूर्व कालखंडात गोपाळबावा लवंगकर आणि शिवराम जानबा कांबळे या नेत्यानी सामाजिक न्यायासाठी लढे दिले होतेच. हिंदू समाजावरचा अस्पृश्यतेचा कलंक धुण्याचा प्रयत्न गांधी आणि सावरकरांनी चालू ठेवला होताच. पण आंबेडकरांच्या प्रयत्नांतील प्रखरत्व आणि विचारातील मूलगामित्व त्यांच्या प्रयत्नांमध्ये सापडणे शक्य नव्हते. श्री. सी. के. बोले यांच्या सारख्या लोकप्रतिनिधींनीही अस्पृश्यता कायद्याच्या आधारे नामशेष करण्याचा प्रयत्य चाल-विला होता. अस्पृश्यता निर्मूलनाचा ठरावही बोल्यांच्या प्रयत्नाने मुंबई प्रांतिक विधिमंडळात पास झाला होता. या ठरावामुळे

अस्पृश्यता निर्मूलनासाठी आवश्यक असणारे वातावरण तयार झाले होते. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या त्यामुळे अपेक्षा वाढल्या होत्या. १९२७ साली त्यांनी महाडला सत्याग्रह घडवून आणला. तेथील चवदार पाण्याच्या तळ्याचा तो सत्याग्रह होता. येथील धर्ममार्तंडांना त्यांनी भूकंपावर बसविले. त्याच वर्षी मनुस्मृतीची होळीही केली. अशा प्रकारे त्यांनी सामाजिक असंतोषाचा ज्वालमुखी महाराष्ट्रात पेटविला. हिंदुसमाजाचे विधीशास्त्रच त्यांनी जाळून टाकले. अस्पृश्य समाजाच्या मानसिक विमोचनासाठी हे आवश्यक होतेच हे सांगण्याची आवश्यकता नाही. त्यांनी आपल्या "बहिष्कृत भारतातून" हिंदुसमाजावर वैचारिक हल्ले सुरू केले, अस्पृश्यांना सवर्णाप्रमाणे मंदिरामध्ये मुक्त प्रवेश मिळावा म्हणूनही त्यांनी सत्याग्रह केले. नाशिकच्या काळाराम मंदिराचा सत्याग्रह दलितांच्या मुक्तीसंग्रामातील एक अतिशय महत्वाची ऐतिहासिक घटना आहे. सवर्ण समाजाइतकाच अस्पृश्य जातींचा हिंदुधर्मावर अधिकार आहे हे आंबेडकरांनी अनेक परीने जनतेला सांगितले. हिंदुत्व ही स्पृश्यांची जितकी मालमत्ता आहे तितकीच ती अस्पृश्यांची आहे हे त्यांनी पुन:पुन्हा निक्षून सांगितले. अस्पृश्यांच्या आंदोलनामागची त्यांची हीच भूमिका व दृष्टी होती.

१९३० पर्यंत आंबेडकरांनी निखळ सामाजिक चळवळींचा पुरस्कार केला. त्यानंतर ते राजकारणाकडे वळले. दलितांचे हितसंबंध राखण्यासाठी सामाजिक लढ्यांबरोबर राजकीय अधिकार पदरात पाडून घेणे आवश्यक होते. सायमन कमिशनच्या अहवालावर विचार करण्यासाठी ज्या दोन गोलमेज परिषदा इंग्लंडमध्ये झाल्या त्यात आंबेडकरांनी अस्पृश्यांसाठी स्वतंत्र मतदार संघाची मागणी केली. गांधीजींचा या मागणीला विरोध होता. ब्रिटिशांनी दिलेला जातीय निवाडा गांधीजींना मान्य नव्हता.

हिंदुस्थानचे त्यामुळे राजकीयदृष्टया विघटन होईल अशी त्यांना भीती वाटत होती. हरिजनांना स्वतंत्र मतदार संघ देण्यात आला तर हिंदुसमाजही विघटित होईल असे त्यांना वाटत होते. या निवाडया विरुद्ध त्यांनी प्राणांतिक उपोषण केले. गांधींच्या प्राणापेक्षा अस्पृश्यांचे अधिकार आंबेडकांना अधिक महत्वाचे वाटत होते. पण शेवटी त्यांनी तडजोड मान्य केली. संयुक्त मतदार संघात अस्पृश्यांना राखीव जागा द्याव्यात अशी ती तडजोड होती.

१९३५ साली आंबेडकरांनी धर्मांतराची घोषणा केली. हिंदुसमाज अस्पृश्यांना समानतेची वागणूक देणार नाही अशी त्यांची धारणा झालेली होती. त्यांची ही घोषणा महाराष्ट्रातील समाजकारणावर आणि राजकारणावर दूरगामी परिणाम करणारी होती, हे वेगळे सांगण्याची आवश्यकता नाही. आंबेडकरांनी अशा प्रकारची घोषणा करायला नको होती असे अनेकांना वाटले. या घोषणेमुळे संबंध देशात हल्लकल्लोळही माजला. आंबेडकरांनी आपल्या अनुयायांसहित इस्लाम धर्माची दीक्षा घ्यावी म्हणून प्रयत्न झाले. ख्रिश्चनांनीही त्यांना चुचकारण्याचा प्रयत्न केला. धर्मांतराची ही घोषणा भारताच्या राजकीय भवितव्यावर परिणाम करणारी होती यात शंकाच नाही.

१९३५ साली भारताच्या राजकीय भवितव्यावर अतिशय दूरगामी परिणाम करणारी दुसरी एक घटना घडली. आणि ती म्हणजे ब्रिटिश पार्लमेंटने पास केलेला घटना कायदा. भारतीयांच्या हातात मर्यादित राजकीय सत्ता उपलब्ध करून देणारा हा कायदा होता. वस्तुतः १९२० च्या आगेमागेच मॉटेग्यू-चेंम्सफोर्ड सुधारणेचा फायदा भारतीयांच्या पदरात पडू लागला होता. या सुधारणेने महाराष्ट्रातील सामाजिक चळवळींना राजकीय आशय

दिला होता. जातीय तत्वांवर वेगवेगळ्या मतदार संघांच्या निर्मितीची प्रक्रिया त्या सुक्षारणेने सुरू केली होती. त्या प्रक्रियेला एक वेगळेच स्वरूप या ठिकाणी प्राप्त झाले. त्याचा बरावाईट परिणाम महाराष्ट्रातील राजकारणावर तसाच समाजकारणावरही झाला. **The Government of India Act 1935** ने तो परिणाम अधिक गहिरा व विस्तारित केला. वेगवेगळ्या जातीतील लोकांना पुढे येण्याची संधी मिळाली. त्याच बरोबर राजकीय स्वातंत्र्य आता फार दूर नाही याची जाणीव या घटना कायद्याने व त्याच्या अमंलबजावणीने भारतीयांच्या मनात निर्माण केली. या घटना कायद्याला भारताच्या राजकीय स्वातंत्र्याचा खलिता म्हणता येईल. या कायद्याने एका मर्यादित अर्थाने भारतीयांच्या हातात राज्यकारभाराची सूत्रे दिली. संसदीय लोकशाहीचा पाया या कायद्याने घातला. त्याने प्राप्त करून दिलेल्या मर्यादित राजकीय अधिकारांनी भारतीयांच्या मनात "पूर्ण" स्वराज्याची आकांक्षा निर्माण केली. आणि म्हणून १९३५ नंतर स्वातंत्र्याचे आंदोलन अधिक तीव्र बनले.

मित्रहो, १९३५ च्या नंतरच्या महाराष्ट्रातील राजकारणाचा व समाजकारणाचा आढावा मी उद्याच्या व्याख्यानात करणार आहे.

नगराध्यक्ष श्री. पी. डी. पाटीलसाहेब आणि उपस्थित बंधु-भगिनींनो,

कालच्या व्याख्यानात मी महाराष्ट्रातील "काल" च्या समाज-कारणाचा व राजकारणाचा थोडक्यात मागोवा घेण्याचा प्रयत्न केला. आजच्या व्याख्यानात मी "आज" च्या व "उद्या" च्या समाजकारणाचा व राजकारणाचा विचार करणार आहे. १९३५ पर्यंतच्या राजकारणाला व समाजकारणाला मी महाराष्ट्रातील "काल" चे समाजकारण व राजकारण म्हटले आहे. त्याचे कारण असे की १९३५ साली आमच्या समाजकारणाचा व

राजकारणाचा एक अतिशय महत्वाचा ऐतिहासिक टप्पा पूर्ण झाला. या साली जातीय तत्वावर मतदारसंघ निर्मितीची प्रक्रिया पूर्ण झाली. १९३५ च्या घटना कायद्याने भारतातील विविध जातीधर्मातील लोकांना काही राजकीय अधिकार प्रदान केले; आणि त्या अधिकारांच्या बरोबर भारतीय समाजाच्या विघट-टनाची नांदीही त्याने घातली. आर्थिक व सामाजिकदृष्टया मागासलेल्या जातींना अशा अधिकारांची आवश्यकता निश्चितच होती. पण त्यांना मिळालेल्या अधिकारांच्या आवरणाखाली फुटीरतेची बीजेही दडली होती. १९३५ नंतरच्या राजकारणाला व समाजकारणाला जे स्वरूप प्राप्त झाले ते कमीअधिक प्रमाणात आजतागायत कायम राहिलेले आहे. म्हणूनच मी १९३५ नंतर-च्या महाराष्ट्रातील समाजकारण व राजकारणाला "आज" चे राजकारण व समाजकारण असे म्हटले आहे. जातीयतत्वावर काही राजकीय अधिकार देणाऱ्या ब्रिटिशांच्या धोरणाने आमच्या सामाजिक जीवनावर अतिशय दूरगामी परिणाम केले हे सांगण्याची आवश्यकता नाही. या देशातील मुसलमानांनी द्विराष्ट्र सिद्धांताची व्याख्या करण्याचा खटाटोप याचे सुमारास आरंभिला हे आपणास माहित असेलच. पुढे त्याची परिणती पाकिस्तानच्या निर्मितीत झाली हे आपल्याला सांगण्याची आवश्यकता नाही.

पण एक गोष्ट आपण प्रामुख्याने लक्षात ठेवली पाहिजे; आणि ती ही की महात्मा गांधीच्या नेतृत्वाखाली स्वातंत्र्य आंदोलनाला तीव्रता प्राप्त झाली. १९३५ चा घटना कायदा देखील बऱ्याच मोठ्या प्रमाणात त्याची तीव्रचा वाढविण्यास उपकारक ठरला. गांधीजींच्या नेतृत्वाखाली येथील राजकारण व समाजकारण एकमेकांच्या जवळ आले आणि एकात्मतेच्या मार्गावर चालू लागले. टिळकयुगात ते एकमेकांना छेद देत होते. गांधीजींनी

राजकारणाला सामाजिक आशयगर्भता प्राप्त करून दिली. समाज जागृतीशिवाय राजकीय स्वातंत्र्याची चळवळ प्रबळ व प्रभावी होणार नाही याची डोळस जाणीव गांधीजींनी भारतीय जनतेला करून दिली. समाजाच्या सर्व थरातील—प्रामुख्याने खालच्या थरातील—लोकांचे प्रश्न हाती घेतल्याशिवाय राष्ट्रीय चळवळीसाठी त्यांचे सक्रिय सहकार्य मिळणार नाही, त्यांना त्या चळवळीत सहभागी करून घेता येणार नाही आणि त्यांच्या सहकार्य व सहभागाशिवाय ती खऱ्या अर्थाने राष्ट्रव्यापी स्वरूप धारण करणार नाही — या सर्वच गोष्टींची जाणीव गांधीजींना होती.

कर्मवीर विठ्ठल रामजी शिंदे यांच्या सारख्या समाज सुधारकांची देखील हीच धारणा होती. समाज सुधारणेचा वेग वाढवणे आवश्यक होते, अगत्याचे होते. त्याशिवाय सामाजिक अभिसरणाची व प्रबोधनाची प्रक्रिया तीव्र होणे शक्य नव्हते. महाराष्ट्रात राजर्षी शाहू महाराजांच्या कार्याने समाज क्रांतीचा एक नवीन अध्याय सुरू झाला होता. या ठिकाणची ब्राह्मणेतरांची चळवळ सामाजिक स्वातंत्र्याच्या व समतेच्या दिशेत अग्रेसर झाली होती. सत्यशोधक समाजाचे कार्य ग्रामीण भागात पसरत होते. बहुजन समाजाची मानसिकता घडविण्याचा एक फार मोठा प्रयत्न या चळवळीने केला. पण दुर्दैवाने वेशीबाहेरील अस्पृश्य व पददलितांच्या भावनेला स्पर्श करण्याचे सामर्थ्य या चळवळी मध्ये नव्हते. फुल्यांच्या क्रांतीकारी विचारांचा व कार्याचा वसा आणि वारसा तिने सांगितला खरा पण त्या महापुरूषाची "दृष्टी" तिला लाभली नाही. फुल्यांनी अस्पृश्यांसाठी त्या प्रकारे आपल्या घरातील पाण्याचा हौद मोकळा केला त्या प्रकारे त्यांच्या अनुयायांनी गावातील पाणवठे अस्पृश्यांसाठी खुले असावेत हा विचारही मांडला नाही. राजर्षी शाहूंच्या विचारात

व कृतीत ती झेप होती पंचगंगेचे पाणी त्यानी पेटविले ते याच जळत्या ध्येयवादाने. आपले क्षत्रीयत्व सिद्ध करण्याच्या प्रयत्नातच केवळ धन्यता मानली. चातुर्वर्ण्याची चौकट तोडण्याचे धाडस सत्यशोधक चळवळीला राखता आले नाही. महात्मा फुल्यांचा दृष्टीकोण त्या चळवळीला समजू शकला नाही. फुल्यांच्या विशाल दृष्टी त्यांच्या अनुयायांच्या डोळ्यांना लाभली असती तर महाराष्ट्रातील राजकारण व समाजकारण रचनात्मक संघर्षाच्या वाटेवरून चालले असते. सामाजिक विघटनाच्या भोवऱ्यात ते सापडले नसते. फुल्यांचा लढा अतिशय व्यापक व मूल्यवेधक पायावर उभा होता. ती व्यापकता राजर्षी शाहूच्या नंतर महाराष्ट्रातील सामाजिक लढ्याला लाभू शकली नाही. उलट त्याच्यातील सर्वंकषता ओसरली. ती टिकविण्यासाठी महर्षी शिंद्यांनी सातत्याने प्रयत्न केले. पण त्या खडतर वाटेवर चालणारे ते एकटे मुसाफिर ठरले. या वाटेवर समाज सुधारकांचा काफिला त्यांना दिसला नाही. गांधीजींच्या नेतृत्वाने त्यासाठी लागणारी आवश्यक ती प्रेरणा दिली. आंबेडकरांनी तर अतिशय आक्रमक भूमिकेतून दलित संघर्ष महाराष्ट्रात उभा केला.

वस्तुत: ब्रिटिशांनी जातीय तत्वाच्या आधारावर भारतीयांना मर्यादित अर्थाने राजकीय सत्तेत सहभागी करण्याचे धोरण अवलंबिले. परिणामत: सामाजिक व राजकीय सुधारणांची सरमिसळ या ठिकाणी झाली. या धोरणामुळे सामाजिक प्रश्नांना एक वेगळेच "डायमेंशन" मिळाले. महाराष्ट्राच्या समाज जीवनात एकीकडे जातीय तणाव निर्माण झाले तर दुसरीकडे विविध जातीधर्मातील लोकांना राजकीय "जाग" आली. १९३५ चा घटना कायदा त्या दृष्टीने अतिशय महत्वाचा ठरला. १९३७ साली विधिमंडळाच्या निवडणूका झाल्या. संसदीय स्वरूपाची राज्यपद्धती तेव्हा पासून भारतात अस्तित्वात आली. भारताला

स्वातंत्र्य मिळाल्यानंतर आपण जी राज्यघटना तयार केली ती संसदीय लोकशाहीच्या पायावरच आधारलेली आहे. वास्तविक भारताला स्वातंत्र्य मिळण्यापूर्वीच येथे गांधीजींच्या नेतृत्वाखाली अनेक विषयांवर चर्चा होत होती. वादविवाद होत होते. राजकीय स्वातंत्र्य प्राप्त झाल्यानंतर येथील लोकशाहीचे स्वरूप काय असावे ? देशाच्या अर्थकारणाची दिशा कोणती असावी ? देशाच्या बौद्धिक विकासासाठी कोणत्या शैक्षणिक पद्धतीचा अवलंब करावा ? या ठिकाणी कशा प्रकारची न्यायपद्धती व कायदे सामाजिक आणि सांस्कृतिक उन्नतीसाठी उपयोगी पडतील ? – अशा अनेकविध प्रश्नांचा बौद्धिक खल आमच्या देशात होत होता. महाराष्ट्रात तर तो अतिअधिकच होत होता. एकीकडे हिंदुत्ववाद्यांचे विचार जनमानसात रुजविण्याचे प्रयत्न होत होते तर दुसरीकडे साम्यवादी रिचारांचा प्रसार होत होता. जागतिक घडामोडींचाही आमच्या सामाजिक व राजकीय विचारसरणीवर परिणाम होत होता. महाराष्ट्राचे सामाजिक व राजकीय जीवन अनेक विचारांच्या प्रभावाखाली येत होते. पण देशाचे राजकीय स्वातंत्र्य हा आमच्या राष्ट्रीय जीवनातला ध्रुवतारा होता. त्याच्याकडे पाहूनच जीवनातील सर्व क्षेत्रात आम्ही वाटचाल करीत होतो. गांधीजींना ह्या गोष्टीचे फार मोठे श्रेय द्यावे लागेल. त्यांनी राष्ट्रीय आंदोलनाला एक अवर्णनीय तेजस्विता प्राप्त करून दिली होती. त्यांच्या सर्वसमावेशी, सर्वस्पर्शी आणि सर्वंकष नेतृत्वाने राष्ट्रीय लढ्याला, स्वातंत्र्याच्या संकल्पनेला एक अतिशय प्रगल्भ व समृद्ध असा सामाजिक आशय दिला हे आपल्याला विसरता येणार नाही. राजकीय स्वातंत्र्यासाठी संघर्ष करणारे त्यांचे नेतृत्व स्वराज्य प्राप्त झाल्यानंतर त्याचे सुराज्य कसे करता येईल याचे चिंतन करीत होते, चिंताही वाहत होते, हे आपण लक्षात घेतले पाहिजे. आमचे सामाजिक, आर्थिक व राजकीय प्रश्न सोडवू शकेल अशा

वैचारिक कामधेनूच्या शोधात सबंध देश गुंतला होता. देशाला स्वातंत्र्य मिळाल्याबरोबर आम्हाला ती कामधेनू सापडू शकेल असा भाबडा आशावादही अनेकांनी उरी बाळगला होता. पण ती सापडली नाही ही शोकांतिका आहे. १९४७ साली देश स्वतंत्र झाला व एका वेगळ्या वास्तवाशी आमची गाठ पडली. भारताला स्वातंत्र्य प्राप्त झाल्यानंतर आमची अस्मिता निश्चितच मोहरली. पण राष्ट्र वृक्षावरचा स्वातंत्र्याचा मोहोर गळूही लागला. गांधीजीसारख्या नेत्यालाच जातीवादाचा बळी व्हावे लागले. गांधी हत्तेनंतर महाराष्ट्राच्या समाज जीवनाला तर एक फार मोठी भेग पडली. जातीय विद्वेषाचा डोंबच या ठिकाणी उसळला. ब्राह्मण-ब्राह्मणेतरांना एकात्मतेच्या दिशा सापडूच शकल्या नाहीत. महाराष्ट्राचे राजकारण खऱ्या अर्थाने समजून घ्यायचे असेल तर येथील सामाजिक प्रश्नांचा, सामाजिक अंतःकलहाचा, सामाजिक संघर्षाचा व त्यातून निर्माण झालेल्या सामाजिक तणावांचा अभ्यास करणे फारच आवश्यक आहे.

मित्रहो, ज्यावेळी गांधीजींच्या आदर्शवादी नेतृत्वाचा प्रभाव महाराष्ट्राच्या राजकीय व सामाजिक जीवनावर पडत होता त्याच वेळी डॉ. आंबेडकरांचे वास्तववादी विचार संघर्षमय समाजजीवनाचे सर्जन करण्यात गुंतले होते; आणि त्याच बरोबर ते सामाजिक स्वातंत्र्याच्या संकल्पनेचा आविष्कार करीत होते. या गोष्टीचा उल्लेख मी कालच्या भाषणात केलाच आहे. आंबेडकरांचे मन भ्रमनिरास करणाऱ्या कोणत्याही स्वप्नवादात फार काळ अडकून पडले नाही. स्वातंत्र्यप्राप्ती नंतर जे भेसूर वास्तव आमच्या समोर "आ" वासून उभे राहिले त्याची कल्पना बाबासाहेबांना होती. आंबेडकरांचा पींड कुठल्याही स्वप्नरंजनात अडकणारा नव्हता. त्यांचे मन कुठल्याही युटोपिया-च्या **(utopia)** प्रदेशात भटकणारे नव्हते. या देशाला

**Promised Land** बनविण्यासाठी त्यांनी आपल्या आयुष्याच्या शेवट पर्यंत प्रयत्न केले, यात शंका नाही. पण स्वप्नरंजनात ते कधीही बंदिस्त झाले नाहीत. वास्तविक हिंदुधर्माने व संस्कृतीने भारतीय दलितांना व पददलितांना स्वप्ने पाहण्याची संधी कधीही दिली नाही. त्यांचे जीवन म्हणजे पिढयान्‌पिढयांचे एक प्रदीर्घ दारूण- दुःस्वप्नच ! ज्यांच्यावर अस्पृश्यता लादली गेली त्यांच्या पदरात दुःस्वप्नाशिवाय दुसरे काय पडणार होते ? ज्यांचे माणुसपणच नाकारण्यात आले त्यांच्या वाटयाला अमानुषते शिवाय दुसरे काहीही येणे शक्य नव्हते. " हा माझा देश आहे ", आणि " ही माझी संस्कृती आहे " अशा प्रकारची भाषा– अभिमानाने आणि आत्मविश्वासाने वापरण्याची संधी या देशातील पददळितांना मिळू शकली नाही ही एक ऐतिहासिक वस्तुस्थिती आहे. हिंदु समाज हा एक बंद समाज आहे. **It is indeed a closed society**. आणि या बंद समाजाच्या तळातल्या अंधारी कप्प्यात अस्पृश्यांना राहावे लागले. त्या अंधारी कप्प्यात जाण्यासाठी थोडयाबहुत प्रकाश किरणांना लहानसा झरोखा सापडलाही असेल. पण तो अंधारी कप्पा सोडून दुसऱ्या चांगल्या कप्प्यात आजही दलितांना जाता आलेले नाही, ही देखील एक वस्तुस्थिती आहे. आहे त्या ठिकाणीच दलितांचे पुनर्वसन करण्याचे थातूरमातूर प्रयत्न होत आहेत.

या बंद समाजाला खुल्या समाजाचे रूप देण्याचा क्रांतीकारी प्रयत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी आरंभिला होता. प्रॉमिथिअस प्रमाणे त्यांनीही क्रांतीकारी विचारांचा शोध घेतला, स्वातंत्र्याचे स्फुलिंग जिथे सापडतील तिथून आणण्याचा प्रयत्न केला. खरेतर डॉ. बाबासाहेब आंबेडकर हे प्रॉमिथिअसच्याच शोधात होते. भारतीय इतिहासाच्या पृष्ठांवर एखाद्या तरी प्रॉमिथिअसची सावली पडलेली सापडते का याचा शोध त्यांनी

घेतला. पंख कापलेल्या काही प्रॉमिथिअसच्या प्रतिमा त्यांना भारताच्या इतिहासात आढळल्या देशील. बुद्ध, कबीर आणि फुल्यांच्या क्रांतीकारी विचारात मात्र त्यांना प्रॉमिथिअसच्या स्पष्ट व पूर्ण प्रतिमा सापडल्या. आणि एका सुरम्य सकाळी प्रॉमिथिअसच्या शोधात एकाकी निघालेला हा कृतीशील विचारवंत स्वतःच या शतकातला एक महान क्रांतीकारी प्रॉमिथिअस बनून भारतीय समाजासमोर निखारे उधळीत उभा ठाकला. धर्मांतराची घोषणा ही एका प्रॉमिथिअसचीच झेप होती हे मी आपणास सांगू इच्छितो. महात्मा गांधी हे भारतीय अस्पृश्यांचे नेतृत्व करीत होते. त्यांचे दालित्य त्यांना घालवायचे होते यात शंका नाही. पण ते एका विशिष्ठ मर्यादेपलिकडे जाऊ शकले नाहीत. या गोष्टीची विस्तारपूर्वक चर्चा वेळेअभावी मी या ठिकाणी करू शकणार नाही. आंबेडकरांनी मात्र दलित व बहिष्कृत भारताला एक पर्यायी नेतृत्व दिले. वास्तविक आंबेडकरांनी दिलेल्या या "पर्यायी" नेतृत्वाला पुढे कुठलाही 'पर्याय' उरला नाही. त्यांच्या नेतृत्वाने गांधीजींच्या नेतृत्वालाच आव्हान दिले. सबंध हिंदुसमाजा समोरच आंबेडकर हे एक आव्हान बनून उभे राहिले.

१९३५ साली बाबासाहेबांनी धर्मांतराची घोषणा केली. पण प्रत्यक्ष धर्मांतर मात्र त्यांनी १९५६ साली केले. धर्मांतर करण्या-साठी त्यांनी वीस-एकवीस वर्षांचा विलंब का लावला? इतर धर्मांचा अभ्यास करण्यासाठी त्यांना एवढ्या कालावधीची आवश्यकता होती म्हणून त्यांनी हा विलंबा लावला का? बुद्धांच्या तत्वज्ञानाने त्यांना त्याचवेळी झपाटले होते हे आपण लक्षात घेतले पाहिजे. १९३५ साली जरी त्यांनी धर्मांतर केले असते तरी लाखो अस्पृस्यांनी त्यांना साथ दिली असती. त्यांच्या बरोबर त्यांनीही तितक्याच उत्कट श्रद्धेने धर्मांतर केले असते.

पण बाबासाहेबांनी धर्मांतराची घोषणा करूनही अनेक वर्षांच्या कालावधीपर्यंत धर्मांतर केले नाही. या मागची कारणमीमांसा आपण शोधली पाहिजे.

डॉ. आंबेडकरांनी केलेली धर्मांतराची घोषणा ही एका अर्थाने "पूर्ण" घोषणा नव्हती. हिंदुधर्म सोडण्याची सूचना देणारी ती घोषणा होती; पण दुसऱ्या कोणत्या धर्माचा ते स्वीकार करणार याचा निर्देश करणारी ती घोषणा नव्हती. आणि म्हणून ती "अपूर्ण" घोषणा होती. धर्मांतराची ती घोषणा दुसऱ्या धर्म-दीक्षेची घोषणा नव्हती. धर्मांतराचा हा प्रश्न बाबासाहेबांच्या केवळ वैयक्तिक श्रद्धेची बाब नव्हती. तशी ती असती तर अशा प्रकारची घोषणा करून बाबासाहेबांनी वीस-एकवीस वर्षांचा कालावधी घालवला नसता. धर्मांतराची ही घोषणा अस्पृश्यांच्या सामुहिक सामाजिक कृतीची (**collective social action**) घोषणा होती, हे आपण समजून घेणे आवश्यक आहे. हिंदुधर्म मानणाऱ्या लोकांची विवेकबुद्धी (**conscience**) बाबासाहेबांनी या घोषणेद्वारे ऐरणीवर ठेवली. वस्तुतः त्यांनी हिंदुधर्मच ऐरणी-वर ठेवला. सामाजिक स्वातंत्र्य व समतेच्या क्रांतीकारी तत्वज्ञानाच्या अग्नित तापवून हिंदुधर्माला इच्छित आकार देण्याचा त्यांचा हा निर्वाणीचा प्रयत्न होता. धर्मांतराची घोषणा ही त्यांनी अवलंबिलेली **shock therapy** होती असे मला वाटते. या घोषणेनंतर डॉ. आंबेडकर हे एकीकडे हिंदुसमाजाच्या प्रतिक्रियांची व प्रतिसादाची नोंद घेत होते; तर दुसरीकडे ते दलितांच्या सामाजिक व राजकीय मुक्ती लढ्याचे विद्रोहजनक नेतृत्व करीत होते. देशातील शोषितांना एकाच व्यासपीठावर आणण्यासाठी त्यांनी १९३६ साली "स्वतंत्र मजूर पक्षाची" स्थापना केली. निवडणुकीच्या राजकारणातही ते उतले. १९३७ साली मुंबई प्रांताच्या विधिसभेमध्ये ते निवडून गेले. देशातील

उपेक्षित मजुरांचे व सामान्य शेतकऱ्यांचे प्रश्न सोडविण्याचा त्यांचा निर्धार होता. स्वतंत्र मजूर पक्षाच्या ध्वजाखाली त्यांना संघटित करण्याचा त्यांचा प्रयत्न होता. कायद्याच्या व न्याय व्यवस्थेच्या सामर्थ्यावर त्यांचा विश्वास होता. म्हणूनच त्यांनी सामान्य लोकांच्या सामाजिक व आर्थिक जीवनाच्या परिवर्तनासाठी आवश्यक असणारे कायदे व्हावेत यासाठी जीवापाड प्रयत्न केले. आर्थिक शोषणाला बळी पडलेल्या लोकांसाठी आवश्यक असणारा संघर्ष सातत्याने कायम ठेवून, सामाजिक व धार्मिक दृष्टचा भरडल्या गेलेल्या अस्पृश्य जातीतील लोकांनी लढा उभा करावा म्हणून त्यांनी फार मोठे प्रयत्न केले. १९४२ साली त्यांनी **All India Scheduled Castes Federation** ची स्थापना केली. या संघटनेद्वारे अस्पृश्यांच्या आर्थिक व सामाजिक प्रश्नांची जाणीव त्यांनी सबंध देशाला करून दिली. दलितांच्या न्याय हक्कांसाठी ते सतत लढत राहिले.

भारताला स्वातंत्र्य मिळाल्यानंतर जेव्हा घटना परिषदेची संरचना करण्यात आली तेव्हा मसुदा समितीचे अध्यक्ष म्हणून बाबासाहेबांवर फार मोठी जबाबदारी टाकण्यात आली. संसदीय लोकशाहीची उद्दिष्टचे दृष्टीसमोर ठेवून भारतीय राज्यघटनेचे परिपूर्ण शिल्प घडविण्याचा त्यांनी प्रयत्न केला. एखाद्या देशाची राज्यघटना ही कोणत्याही एकाच माणसाची निर्मिती असू शकत नाही. त्या देशातील विविध लोकांच्या आशाआकांक्षांचा व विचारसरणींचा विचार करून, त्यांचे भवितव्य व पर्यायाने राष्ट्र म्हणून त्या देशाचे भवितव्य घडविण्याचे उद्दिष्ट लक्षात घेवून, एकमताने किंवा बहुमताने घेतलेल्या निर्णयांचा ती परिपाक असते. आंबेडकरांना भारतीय राज्य घटनेत स्वतः त्यांना अभिप्रेत असलेले सर्वच्यासर्व विचार अंतर्भूत करता येणे शक्य नव्हते, ही गोष्ट उघड आहे. तसे ते शक्य असते तर त्यांना

हिंदु कोड बिल आपल्या मनाप्रमाणे पारित करून घेता आले असते. ही वस्तुस्थिती लक्षात घेवूनही असे म्हटले पाहिजे की भारतीय राज्यघटनेच्या मसुदानिर्मितीच्या कार्यातला त्यांचा वाटा व सहभाग अतिशय महत्वाचा आहे. घटना परिषदेच्या आरंभी केलेले त्यांचे भाषण आणि शेवटचे भाषण आपण काळजीपूर्वक वाचले तर आपल्याला असे दिसून येईल की त्यांच्या विचाराचा आवाका फार मोठा होता. संसदीय लोकशाहीला केवळ राजकीय स्वातंत्र्याच्या आवर्तात ते ठेवू इच्छित नव्हते. राजकीय लोकशाहील ाजोपर्यंत सामाजिक स्वातंत्र्याची व समतेची अर्थगर्भता प्राप्त होत नाही तो पर्यंत ती आर्थिक समतेचा व उन्नतीचा पुरस्कार करणाऱ्या, त्यासाठी प्रयत्नशील व कृतीशील असणाऱ्या राज्ययंत्रणेला व राज्यकारभाराला जन्म देऊ शकत नाही. आंबेडकरांना सामाजिक लोकशाही हवी होती. पण हे काम देशाच्या राज्यघटनेत सामाजिक व आर्थिक न्याय व समानतेची अभिव्यक्ती करणाऱ्या कलमांचा अंतर्भाव केल्याने केवळ होऊ शकत नाही. राज्यकर्त्यांच्या प्रत्यक्ष कार्य प्रणालीतून राजकीय लोकशाहीला साजाजिक लोकशाहीची आशयगर्भता प्राप्त होत असते. कोणत्याही देशाच्या राज्यघटने मध्ये त्या देशाला अभिप्रेत असलेली तत्वप्रणालीही असतेच. पण तिचा पूर्ण अविष्कार देशातील लोकप्रतिनिधींच्या व राज्यकर्त्यांच्या कार्य प्रणालीतून झाला पाहिजे. पण आजच्या लोकप्रतिनिधींच्या व राज्यकर्त्यांच्या कार्यप्रणालीद्वारे सामाजिक लोकशाहीच्या तत्त्व प्रणालीची अभिव्यक्ती आवश्यक त्या प्रमाणात झालेली नाही. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांना ज्या गोष्टीची भीती वाटत होती, नेमकी तीच गोष्ट आमच्या देशात घडली आणि घडत आहे. लोकशाही म्हणजे केवळ निवडणुका; लोकशाही म्हणजे निव्वळ पक्षीय राजकारण; लोकशाही म्हणजे फक्त बहुसंख्यांकांचे राज्य; – असाच काहीसा अर्थ जनमानसात रुजला. आणि निवडणुकीच्या राजकारणाने

आंबेडकरासारख्या महान व्यक्तीची देखील अवहेलना केली, हे मी आपल्याला सांगण्याची आवश्यकता नाही. जनमानसात खोलवर रूजलेला लोकशाहीचा हा चुकीचा अर्थ उखडून काढण्याचा प्रामाणिक प्रयत्न कोणत्याही राजकीय पक्षाने या देशात केला नाही. ही दुर्दैवाची गोष्ट आहे.

धर्मांतराची घोषणा केल्यानंतर आंबेडकरांनी हिंदुधर्मावर कठोर हल्ले करण्याचे काम चालूच ठेवले. **Annihilation of Caste** या त्यांच्या पुस्तकात त्यांनी विषमतेचा पुरस्कार करणाऱ्या हिंदुधर्मावर व हिंदूंच्या रूढीप्रियतेवर कठोर हल्ला चढविला आहे. श्रमविभागणीच्या आवश्यकतेची पूर्ती करण्यासाठी अस्तित्वात आलेल्या चातुर्वर्ण्याने पुढे श्रमिकांचीच विभागणी केली आणि शूद्रांना अमानुष विषमतेच्या खाईत निर्घृणतेने लोटून दिले. आंबेडकरांचे हिंदुधर्माचे विश्लेषण अतिशय वास्तववादी आहे, हे कोणालाही नाकारता येणे शक्य नाही. गांधीजींची हरिजनांविषयीची भूमिका आंबेडकरांना मान्य नव्हती. गांधीजींचा भूतदयावाद त्यांना मान्य नव्हता. गांधीजींनी कर्मसिद्धान्ताचा पुरस्कार केला; वर्णव्यवस्थेचा पुरस्कार केला. आंबेडकरांना अर्थात हे सर्व मान्य नव्हते. आणि म्हणून गांधीजींच्या विरूद्ध त्यांनी वैचारिक भूमिका घेतली. भारतात आजपर्यंत अनेक संत-महात्मे होऊन गेले; पण त्यांना माणसामाणसात खरी सामाजिक समता निर्माण करता आली नाही, या गोष्टीची आंबेडकरांना खंत होती. गांधीजींनी ग्रामस्वराज्याचा पुरस्कार केला; पण ग्रामीण जीवनाच्या अमूलाग्र सामाजिक पुनर्रचनेसाठी तेथील जातिव्यवस्थेच्या विरूद्ध त्यांनी भूमिका घेतली नाही. परंपरेने चालत आलेला गावगाडा तसाच पुढे ओढीत नेण्याला आंबेडकरांचा विरोध होता. अस्पृश्यांनी व खालच्या जातीतील इतर लोकांनी पारंपारिक व्यवसाय सोडून दिल्याशिवाय ग्रामीण

जीवनात परिवर्तन घडवून आणता येणार नाही असे आंबेडकरांचे ठाम मत होते. **" Mr. Gandhi and the Emancipation of the Untouchables"**आणि**"What the Congress and Gahdni Have Done to the Untouchables"** या त्यांच्या ग्रंथात आंबेडकरांनी गांधीजींच्या दृष्टीकोणावर कठोरपणे टीका केली आहे. अस्पृश्यतेच्या प्रश्नाकडे पाहण्याच्या या दोन व्यक्तींच्या दृष्टीकोणात मूलभूत फरक होता, याची सविस्तर चर्चा वेळे अभावी मी आपल्या समोर करू शकणार नाही.

पण एक गोष्ट आपण लक्षात ठेवली पाहिजे. दलितांच्या विषयी गांधीजींनी जे कार्य केले त्याचे मोल लक्षात घेणे आवश्यक आहे. गांधीजींवर अप्रामाणिकपणाचा आरोप या संदर्भात केला जातो. तो चुकीचा आहे. त्याच बरोबर आंबेडकरांची विद्रोही विचारसरणीही आपण लक्षात घेतली पाहिजे. **Only the wearer knows where the shoe pinches** अशी एक इंग्रजीत म्हण आहे. " जावे त्याच्या वंशा तेव्हा कळे " असे आपण दुःखितांच्या दुःखाची तीव्रता पूर्णतः कळत नाही तेव्हा म्हणतो. विद्रोही भाषा वापरणारे आंबेडकर द्वेष्टे होते असे म्हणणाऱ्यांनी हे लक्षात घेतले पाहिजे. आंबेडकर हे भारतीय अस्पृश्यांचे खरे-खुरे मोजेस होते. गांधीजी आणि आंबेडकर या दोघांनाही आपण समजून घेणे आवश्यक आहे. गांधीजींना ढोंगी म्हणणे हे आंबेड-करांना द्वेष्टे म्हणण्या इतकेच चुकीचे आहे.

सांगायचे तात्पर्य असे की धर्मांतराची घोषणा केल्यानंतर तर आंबेडकराची हिंदूधर्मावरची टीका अधिक धारदार आणि अधिक मर्मग्राही बनली. पण अलगतेच्या भावनेला किंवा फुटीरवादी प्रवृतीला त्यांनी खतपाणी घातले नाही. या देशाला फुटिरतेचा

तसा शाप लागलेला आहेच. अणि म्हणूनच भारताला अनेक शतकापर्यंत "राष्ट्रपण" लाभले नाही. " **India is a broken reed** " असे या देशाचे वर्णन करण्यात येत होते. ते का? हिंदुस्थान हा देश " ब्रोकन रीड " का झाला या प्रश्नाचे उत्तर शोधण्याचा प्रयत्न अनेक भारतीय विचारवंतांनी व नेत्यानी केला. आंबेडकरांनी देखील तो आपल्या परिने केला. या प्रश्नाचे उत्तर शोधण्यासाठी त्यांनी खूप परिश्रम केले. या प्रश्नाने त्यांनाही अस्वस्थ केले होते. ज्या परिस्थितीने हा प्रश्न निर्माण केला त्या परिस्थितीने त्याचे व सबंध अस्पृश्य समाजाचे जीवन दुःखी व यातनामय केले होते. ती परिस्थिती निर्माण केली जातिभेदाने; ती परिस्थिती निर्माण केली होती येथील धार्मिक व सामाजिक विषमतेने. आंबेडकरांना सापडलेले या प्रश्नाचे उत्तर म्हणजे जातिभेद! कुठली " ब्रोकन रीड " ही आपल्याला " सिंपनी " ( **Symphony** ) देऊ शकत नाही. स्वतःचा " स्वर " हरवून बसलेल्या गळ्याला " संगीत " निर्माण करता येत नाही. हे सांगण्याची आवश्यकता नाही. आणि म्हणूनच आम्हाला आजही राष्ट्रीय एकतेचा, सामाजिक एकात्मतेचा आणि भावनिक एकात्मतेचा लालित्यमय मधूर "सूर" सापडत नाही. आंबेडकरानी फुटीरवादाचा पाठ आपल्या अनुयाना शिकविला असता तर या देशाचे काय झाले असते याची कल्पनाही करता येणार नाही. दलितासाठी त्यांनी वेगळ्या मतदार संघाची मागणी जरूर केली. दलितासाठी त्यांनी नोकऱ्यामध्ये राखीव जागा जरूर मागितल्या, दलितांच्या मुला-मुलींच्या शिक्षणासाठी त्यांनी वेगळ्या सवलती जरूर मागितल्या; पण दलितासाठी वेगळ्या राष्ट्राचा सिद्धांत मात्र त्यानी कधीही मांडला नाही आणि दलितांच्यासाठी वेगळ्या राष्ट्राची त्यांनी मगणी कधीही केली नाही; त्यासाठी संघर्ष कधी त्यांनी उभारला नाही. बॅरिस्टर जीनांचे अनुकरण त्यांनी केले असते तर ? तर ··· तर ···? या प्रश्नाचे उत्तर तसे फार

सोपे आहे. मित्रांनो, या प्रश्नाचे उत्तर तसे फार अवघडही आहे. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी उलट एकात्म भारतीय समाजाचे शिल्प घडविण्याचा प्रयत्न केला. राज्यघटनेनंतर हिंदू कोड बिलाचा त्यांनी पाठपुरावा केला. १९५५ साली पारित झालेले हिंदू कोड बिल हे त्यांना पूर्णतः अभिप्रेत असलेले कोड बिल नाही, हे आपण लक्षात ठेवले पाहिजे. आपल्या देशाच्या सर्वोच्च कायद्याला आपण "राज्यघटना" असे म्हणतोच; पण आंबेडकरांना अभिप्रेत असलेल्या हिंदू कोड बिलाला या देशाची "समाजघटना" असे मी एक वेगळ्या अर्थाने म्हणेन. हिंदू कोड बिलाद्वारे हिंदुसमाजाला –– हिंदुधर्मातील विविध संप्रदायातील स्त्रीपुरुषांना –– समतेच्या पायावर डॉ. आंबेडकर उभे करू उच्छित होते. या प्रयत्नात सक्रीयपणे गुंतलेल्या या प्रज्ञावंत नेत्याचा वैचारिक प्रवास अव्याहतपणे चालूच होता. १९५१ साली "भारतीय बौधजन संघा" ची त्यांनी स्थापना केली. त्याचवर्षी "बौद्ध उपासनापथ" लिहिले. १९५४ साली रंगून येथे भरलेल्या जागतिक बौद्ध परिषदेत त्यांनी भाग घेतला. १९५५ साली "भारतीय बौद्ध महासभे" ची स्थापना त्यांनी केली. "बुद्ध आणि त्याचा धम्म" या महान ग्रंथाची रचनाही ते याच काळात करीत होते. या सर्व गोष्टी व घटना बौद्ध धर्माच्या स्वीकाराची नांदी तयार करीत होत्या असे म्हणावे लागेल. पण हिंदू कोड बिलाची निर्मितीही याच काळातली घटना आहे. भारतीय जीवनातला मुख्य प्रवाह (**mainstream**) असणाऱ्या हिंदुसमाजाची पुनर्रचना झाली तर सामाजिक लोकशाही या देशात निश्चितच अस्तित्वात येईल; आणि इतर धर्मातील लोकही अशा प्रयत्नात सहभागी होतील, असे त्यांना वाटत होते. बाबासाहेबांनी शैक्षणिक क्षेत्रातही सामाजिक लोकशाहीच्या मूल्यांची वाढ व जोपासना करण्याच्या हेतूने कार्य केले, हे आपण लक्षात घेणे आवश्यक आहे. रिपब्लिकन पक्षाच्या स्थापनेमागे

देखील त्यांचा मुख्य हेतू संसदीय लोकशाहीला सामाजिक स्वातंत्र्याच्या, समतेच्या व बंधुभावाच्या संकल्पनेची व कार्यसिद्धीची समृद्धी देण्याचा होता, हेही आपण लक्षात ठेवले पाहिजे. राजकारणात बाबासाहेबांनी तडजोडी का स्वीकारल्या नाहीत या प्रश्नाचे उत्तर त्यांच्या या विचारनिष्ठेत व मूल्यप्रतिबद्धतेत सापडेल. राजकारण तत्वचूतीच्या तडजोडी त्यांनी स्वीकारल्या असत्या तर आयुष्या अखेरपर्यंत ते सत्तेच्या अंबारीत बसून सबंध देशात विहार करू शकले असते. पण त्यांना ते मान्य नव्हते. त्यांना ते नको होते. सत्तेचा मोह त्यांना नव्हता. त्यांना पाहावयाचा होता सामाजिक व आर्थिक स्वातंत्र्य व समत्तेचा तेजस्वी सूर्य ! पण विषमतेच्या काळ्याकुट्ट ढगांनी पूर्णपणे आच्छादिलेल्या आकाशात तो कसा उगवणार? तो कसा दिसणार ? त्याची किरणे दलितांच्या व पददलितांच्या झोपड्यांवर कधी व कशी पडणार ? हिंदुसमाज बदलण्याची लक्षणे त्यांना दिसली नाहीत आणि म्हणून त्यांनी आपल्या लाखो अनुयायांबरोर १९५६ साली बौद्ध धर्माची दीक्षा घेतली. देशभर या घटनेच्या बऱ्यावाईट प्रतिक्रिया उमटल्या. महाराष्ट्रातला महार समाज पूर्णतः हिंदू धर्म सोडून गेला. देशाच्या इतर भागातील अस्पृश्यांनीही धर्मांतर केले. महाराष्ट्राच्या राजकारणावर व समाजकारणावर या घटनेचा सखोल परिणाम झाला हे वेगळे सांगण्याची आवश्यकता नाही. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचे ६ डिसेंबर १९५६ या दिवशी महापरिनिर्वाण झाले. आणखी काही वर्षे ते जगू शकले असते तर या देशातील राजकारणावर त्यांच्या महान व्यक्तीमत्वाचा वचक राहिला असता. देशाला ते भाग्य लाभले नाही.

मित्रहो, महाराष्ट्राच्या राजकारणात व समाजकारणात धर्मांतराची ही घटना अतिशय दूरगामी परिणाम करणारी घटना आहे हे

विसरून चालणार नाही. दलितांच्या पायातील गुलामीच्या बेडया तोडणारी ही घटना आहे. दलितांना अस्मिता प्राप्त करून देणारी, त्यांचे "स्वत्व" जागे करणारी, त्यांना स्वतःच्या जीवनाचे "स्वामित्व" बहाल करणारी आणि त्यांच्या सबंध अंधारग्रस्त जीवनाला "स्वयंप्रकाशीत" करणारी ही घटना आहे. दलितांच्या "माणूसपणा" चा प्रतिशोध घेणारी, त्यांच्या उज्वल "उद्या" कडे झेपावणारी, सामाजिक स्वातंत्र्याचा व समतेचा उद्घोष करणारी, मानवी अधिकाराचा जयघोष करणारी, आणि माणसाला या विश्वाचा केंद्रबिंदू मानून त्याच्या जीवनाचे सर्जन करणाऱ्या तत्वज्ञानाचा स्वीकार करणारी ती घटना आहे. आणि म्हणूनच देशातील आणि प्रामुख्याने महाराष्ट्रातील दलितांना एक नवीन मूल्य श्रीमंत मानसिकता या घटनेने दिलेली आहे, हे वेगळे सांगण्याची आवश्यकता नाही. ही घटना म्हणजे आधुनिक महाराष्ट्राच्या इतिहासातले एक महत्वाचे **watershed** मानले जाणार आहे; हे मी आपल्याला सांगू इच्छितो.

मित्रानो, देश स्वतंत्र झाल्यानंतर महाराष्ट्राच्या समाजजीवनाला प्रभावित करणाऱ्या ज्या काही घडामोडी झाल्या, ज्या काही घटना घडल्या त्यापैकी काही ठळक घडामोडींचा वा घटनांचा मी उल्लेख करणार आहे. स्थूलपणे कुळकायदा, ग्रामीण भागात शिक्षणाचा प्रसार, दलितांचे धर्मांतर, संयुक्त महाराष्ट्राची निर्मिती, लोकशाही विकेंद्रिकरणाचा प्रयोग आणि सहकारी चळवळीचा आरंभ या सहा घटना माझ्या मते अतिशय महत्वाच्या आहेत. या घटनांनी महाराष्ट्राच्या राजकीय, सामाजिक आणि आर्थिक जीवनाला परिवर्तनाच्या नवीन दिशा व वेगळ्या वाटा दिल्या आहेत यात वादच नाही. आजच्या महाराष्ट्राला "डिफाइन" करणाऱ्या ह्या घटना आहेत असे मला वाटते.

**These are the defining factors in contemporary social life of Maharashtra.**

ग्रामीण महाराष्ट्रातील लोकांना आर्थिक न्याय मिळवून देण्याच्या दृष्टीने कुळकायदा आणि जमीनधारणेचा कायदा अस्तित्वात आणणे आवश्यक होते. " कसेल त्याची जमीन " हे घोषवाक्य स्वातंत्र्य आंदोलनाच्या काळात देखील आम्ही कंठरवाने उच्चारित होतो. थोडया बहुत फरकाने पश्चिम महाराष्ट्र, विदर्भ व मराठवाडा या तिन्हीही विभागांमध्ये अंमलात आला. सामाजिक व आर्थिक परिवर्तनाच्या दिशेतील हे एका दृष्टीने क्रांतीकारक पाऊल होते. जमीनमालकी संबंधीची परंपरेने चालत आलेली जी संकल्पना जनमानसात रूजलेली होती तिलाच या कायद्याने धक्का दिला, प्रामुख्याने ग्रामीण महाराष्ट्राला कुळकाद्याने एक नवीन मानसिकता दिली यात वादच नाही, " कसेल त्याची जमीन " या तत्वावर आधारलेल्या शासनाच्या धोरणाने आर्थिक स्वातंत्र्यासाठी आवश्यक असणारी मनोभूमिका तयार केली. देशाला राजकीय स्वातंत्र्य मिळताच नवनिर्मितीचे चैतन्ययुक्त वारे वाहू लागले. आमच्या स्वातंत्र्याला सुराज्याचे डोहाळे लागले. त्यामुळे सामाजिक व आर्थिक पुनर्रचनेच्या दिसेत वाटचाल सुरू झाली हे वेगळे सांगण्याची आवश्यकता नाही. जमीन धारणेच्या कायद्याने अतिरिक्त जमीन भूमिहीनांच्या पदरात टाकण्याची सोय निर्माण केली. महाराष्ट्रात अतिरिक्त जमीन अधिक नव्हती. थोडीशी जमीन भूमिहीन लोकांच्या व दलितांच्या पदरात पडली. पण त्यामुळे आर्थिक प्रश्न पूर्णतः सुटणे शक्य नव्हते. या कायद्याने नवीन जाणीव मात्र जनमानसात निर्मिली हे मला येथे अभिप्रेत आहे.

सामाजिक आणि आर्थिक पुनर्रचनेचा एक भाग म्हणून महाराष्ट्रात

झालेल्या शिक्षण प्रसाराकडे आपण पाहिले पाहिजे. या संदर्भात शिक्षण प्रसाराला मी महत्व देतो. सामाजिक परिवर्तनाच्या दृष्टीने शिक्षणाला प्राथमिकता द्यावीच लागेल. शिक्षण ही समाजाला नवीन दृष्टी देणारी आणि त्याला पुढे घेवून जाणारी प्रभावी शक्ती असते. त्या शक्तीची पूजा बांधण्याचा अधिकार आणि अवसर आमच्या समाजव्यवस्थेतील सर्व जातींच्या लोकांना पूर्णत: नव्हती ही वस्तुस्थिती आहे. पण स्वातंत्र्य प्राप्तीनंतर शिक्षणाची संधी ग्रामीण भागातील जनतेलाही मिळाली. महाराष्ट्रातील सर्वसामान्य लोकांपर्यंत जाऊन ती पोचावी म्हणून स्वातंत्र्य प्राप्ती पूर्वीही काही ध्येयवादी मंडळींनी प्रयत्न आरंभिले होते. ज्या ज्या व्यक्तींनी अशा एकारचे प्रयत्न ग्रामीण महाराष्ट्रात केले त्यात कर्मवीर भाऊराव पाटलांचा क्रम अगदी वरचा आहे. आणि म्हणूनच त्यांची आठवण मी आपल्याला करून देऊ इच्छितो. सामाजिक परिवर्तनाच्या दृष्टीने कर्मवीर आण्णांचे कार्य क्रांतीकारी स्वरूपाचे होते.

" समाज परिवर्तनासाठी शिक्षण " हे कर्मवीर भाऊराव पाटलांच्या शैक्षणिक तत्वज्ञानातील एक महत्वाचे सूत्र होते. या सूत्राचे सातत्याने ध्यान ठेवून शिक्षण प्रसारासाठी त्यांनी समर्पणाच्या भावनेने आयुष्यभर प्रयत्न केले. आधुनिक महा-राष्ट्राच्या सामाजिक क्षेत्रातले ते भगीरथ होते. असे मी म्हणालो तर त्यात कसलीही अतिशयोक्ती होणार नाही. रयत शिक्षण संस्थेची स्थापना त्यांनी अतिशय व्यापक अशा सामाजिक तत्वज्ञानाच्या आधारे केली. आणि म्हणून त्यांच्या शैक्षणिक कार्याला सामाजिक परिवर्तनाचे प्रभावी माध्यम बनता आले. महाराष्ट्राच्या ग्रामीण जीवनात कर्मवीरांनी ज्ञानाचा वटवृक्ष लावला व वाढविला. तो जो डेरेदारपणे वाढला व डंवरला त्याचे कारण असे की त्याच्या मुळ्या भोवतालच्या जमीनीत सर्वबाजुंनी

अगदी खोलवर गेल्या. एखाद्या वृक्षाच्या मुळ्या सर्व बाजूंनी व खोलवर गेल्या की त्याची उंची अधिक वाढते, त्याच्या फांद्या सर्व बाजूंनी चांगल्या प्रकारे वाढतात. कर्मवीर आण्णांनी लावलेल्या ज्ञानांच्या वटवृक्षाच्या मुळ्या सर्व जातींच्या जीवनात वाढल्या. इतकेच नव्हे तर त्याच्या फांद्यांना पारंब्या फुटून त्याही बहुजन समाजाच्या जीवनात खोलवर गेल्या. त्यांच्या शैक्षिणक कार्याला जी आशयगर्भता मिळाली ती अतिशय महत्वाची गोष्ट आहे. कुठल्याही संकुचित जातीय अस्मितेला प्रोत्साहन न देता, कुठल्याही जातीय अभिनिवेशाला न कुरवाळता, आण्णांनी रयत शिक्षण संस्थेची जोपासना केली. या शिक्षण संस्थेचा व्याप लक्षात घेतला तर आपण स्तिमित होऊन जाऊ. स्वातंत्र्योत्तर काळात महाराष्ट्रात बहुजन समाजाचे जे नेतृत्व उदयाला आले त्याच्यामागे कर्मवीर भाऊराव पाटलांचे परिश्रम उभे आहेत हे आपण कृतज्ञपूर्वक मान्य करणे आवश्यक आहे. कर्मवीरांनी बहुजन समाजाला शिक्षणा बरोबर स्वावलंबनाची व सामाजिक जाणीवांची प्रेरणा दिली. " कमवा व शिका " ही प्रेरणा त्यांचीच. त्यांच्या संस्थेत अनेकांनी खडी फोडून, शेतीत काम करून शिक्षण घेतले. महाराष्ट्राच्या शैक्षणिक इतिहासात तो एक अभिनव प्रयोग होता. ज्ञानाला कामधेनू मानण्याची महाराष्ट्रात जुनी परंपरा आहे. शिक्षणामुळे आमचे सर्वच प्रश्न सुटतील असे समजणे चुकीचे ठरेल. महाराष्ट्रातील शिक्षण प्रसारामुळे आमचे सामाजिक व आर्थिक प्रश्न सुटू शकलेले नाहीत. असे असले तरी शिक्षण हे मूल्यपरिवर्तनाचे एक प्रभावी साधन आहे हे मान्य करावेच लागेल. कर्मवीर भाऊराव पाटलांनी ही बाब लक्षात घेवून शिक्षण प्रसाराचे प्रचंड कार्य महाराष्ट्रात उभे केले. आणि म्हणून त्यांच्या सहवासात राहून शिकलेल्या विद्यार्थ्यांनी सभोवतालच्या समाजाशी असणारी नाळ तोडली नाही. राजकीय लोकशाहीला सामाजिक आशय देण्याच्या कार्यात त्यांचा महत्वाचा वाटा आहे.

ग्रामीण भागात शिक्षण प्रसाराचे कार्य त्यांनी एका " क्रूसेडर " (crusader) च्या भूमिकेतून केले. म्हणूनच त्याला एका अभियानाचे स्वरूप प्राप्त झाले होते. त्यांचे व्यक्तिमत्व करारी व विचार क्रांतीकारी होते. महात्मा फुले आणि राजर्षी शाहू महाराज ही त्यांची कुलदैवते होती. महात्मा गांधींच्या विचारांशीही त्यांनी भावनिक नाते जोडले होते. शिक्षणावर त्यांनी श्रमसंस्कार केले. शिक्षणशास्त्रच त्यांनी निढळाच्या घामात भिजविले. कर्मवीर भाऊराव पाटील यांचे शैक्षणिक कार्य हे सामाजिक समता व समभावाचे वक्तृत्वपूर्ण प्रकटन होते असे माझे प्रामाणिक मत आहे. अशा प्रकारचे शिक्षणच व्यक्तीचे व समाजाचे भाग्य घडवू शकते हे आपण लक्षात ठेवले पाहिजे. या प्रसंगी मला यशवंतरावजींच्या एका आशययुक्त वाक्याची आठवण होते. मागच्या आक्टोबरमध्ये आमच्या राजर्षी शाहू महाविद्यालयाच्या नवीन वास्तूचा कोनशिला समारंभ त्यांच्या शुभ हस्ते संपन्न झाला. त्या प्रसंगी त्यांनी माझ्या विद्यार्थ्यांसमोर केलेल्या भाषणातील ते विशिष्ठ वाक्य मला या ठिकाणी आठवते. ते म्हणाले ; " शिक्षण हे एखादा माणूस जन्मण्यापूर्वीच त्याची कुंडली मांडित असते. " फार गहिरा आशय त्यांनी या वाक्यातून व्यक्त केला आहे. ज्या प्रकारचे शिक्षण आपण एखाद्या व्यक्तीला देऊ त्या प्रकारचे भाग्य त्याला लाभते. कर्मवीर आण्णांनी सामाजिक मूल्यसंपन्न शिक्षणाद्वारे ग्रामीण महाराष्ट्राची, बहुजन समाजाची कुंडली मांडली आहे हे आपण लक्षात ठेवले पाहिजे. शिक्षणाला त्यांनी दिलेला सामाजिक आशय आपण दुर्लक्षिला तर महाराष्ट्रात सामाजिक परिवर्तनाचे कार्य चांगल्या प्रकारे होऊ शकणार नाही.

कर्मवीर भाऊराव पाटलासारखा ध्येयवाद उरी बाळगून विदर्भात डॉ. पंजाबराव देशमुखांनी शिक्षण प्रसाराचे कार्य केले. सामाजिक

परिवर्तनाचे माध्यम म्हणून त्यांनी शिक्षणाकडे पाहिले. व्यावसायिक शिक्षणाचे महत्वही पंजाबरावांनी ओळखले होते. शिवाजी शिक्षण संस्थेचा कार्यभार लक्षात घेतला तर पंजाबराव देशमुखांनी केलेल्या शैक्षणिक कार्याचे महत्व आपल्याला कळेल.

शिक्षण प्रसाराला आपले जीवितकार्य मानून समर्पणाच्या भावनेने काम करणारे फारच कमी लोक आपल्याला सापडतील. मामासाहेब जगदाळे यांचा अपवाद सोडला तर आज अशा व्यक्ती क्वचितच आपल्याला महाराष्ट्रात आढळतील.

मराठवाड्याला मात्र कर्मवीर भाऊराव पाटलासारखा किंवा डॉ. पंजाबराव देशमुखासारखा शिक्षण महर्षी मिळू शकला नाही. निजामी राजवटीच्या पंजात सातशे वर्षापर्यंत सापडलेल्या मराठवाड्याचा सांस्कृतीक विकास फारसा होऊ शकला नाही. राष्ट्रीय भावना जनमानसात रुजविण्यासाठी स्वामी रामानंद तीर्थांनी उस्मानाबाद जिल्ह्यातील हिप्परगा या गावी शाळा काढून शिक्षण प्रसाराची नांदी घातली [illegible] आहे. पण हैद्राबाद संस्थान स्वतंत्र होईपर्यंत शिक्षण प्रसाराच्या कार्याला गती मिळू शकली नाही ही वस्तुस्थिती आहे. हैद्राबाद संस्थान स्वतंत्र होण्यापूर्वी शिक्षण प्रसाराचा जो काही प्रयत्न मराठवाड्यात झाला तो नगण्य स्वरूपाचा होता. महाराष्ट्रात मराठवाडा विलिन झाल्यानंतर मात्र सर्वच स्तरावरील शिक्षण भूमितिक वेगाने वाढले. मराठवाड्याचा शैक्षणिक पसारा आज बऱ्याच मोठ्या प्रमाणात वाढलेला आपल्याला दिसेल.

महाराष्ट्र शासनाचे शैक्षणिक धोरणही पूर्वीपासून शिक्षण प्रसाराला प्रोत्साहन देणारे राहिले आहे. विशेषतः आर्थिकदृष्टया मागासलेल्या वर्गाला शैक्षणिक शूल्काची पूर्ण सवलत शासनाने

देण्याचे धोरण अवलंबिल्यापासून शिक्षण प्रसाराला खूप वाव मिळाला. मागास वर्गाला शिष्यवृत्या देण्याचे धोरण अवलंबिल्या-मुळे दलितांना सामाजिक न्याय तर मिळालाच पण शिक्षणाचा फायदाही चांगल्या प्रकारे त्यांना घेता आला. दलित वर्गामध्ये शिक्षणामुळे जागृती निर्माण झाली. महाराष्ट्रात झालेल्या शिक्षण प्रसारामुळे प्रत्यक्षतः किंवा अप्रत्यक्षतः आमच्या राजकीय, सामाजिक व आर्थिक जीवनावर परिणाम झाला हे नाकबूल करता येत नाही.

डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या बरोबर त्यांच्या लाखो अनुयायांनी केलेल्या धर्मांतराविषयी मी मघाशी बोललोच आहे. ददितांचे धर्मांतर प्रामुख्याने महार समाजाचे धर्मांतर हे राजकीय व सामाजिक या दोन्हीही दृष्टीने दूरवरचे परिणाम करणारे होते यात शंका नाही.

मित्रहो, संयुक्त महाराष्ट्राच्या निर्मितीमुळे विविध विभागात किंवा राज्यात विभागलेलेल्या किंवा विखुरलेल्या मराठी भाषिक लोकांना एकत्रित येता आले. संयुक्त महाराष्ट्राची निर्मिती ही मराठी भाषिकांच्या जीवनात स्वप्नपूर्तीचा आनंद देणारी गोष्ट होती. त्यासाठी संघर्षही करावा लागला. त्यासाठी कटुताही निर्माण झाली. संयुक्त महाराष्ट्राच्या लढ्याचा काळ हा यशवंतरावांच्या नेतृत्वाच्या कसोटीचा काळ होता. द्विभाषिक मुंबई राज्याचे मुख्यमंत्री या नात्याने त्यांनी अतिशय संयत व संतुलित मनाने या प्रश्नाला तोंड दिले. काकासाहेब गाडगीळ, आचार्य प्र. के. अत्रे, एस्. एम्. जोशी, सेनापती बापट, भाई माधवराव बागल, ना. ग. गोरे, क्रांतिसिंह नाना पाटील, दाजीबा देसाई, उद्धवराव पाटील आदी व्यक्तींचे संयुक्त महाराष्ट्राच्या निर्मितीमध्ये महत्वाचे योगदान आहे. मराठी भाषिकांच्या एकात्म

भावनेला उजाळा देणारी ही घटना होती. " माझी मराठी, मराठाच मीही " अशा प्रकारची भावनिक एकता व भाषिक अस्मिता या घटनेने महाराष्ट्रीय जनतेच्या मनात निर्माण केली होती.

संयुक्त महाराष्ट्राच्या निर्मितीनंतर येथील राजकीय, सामाजिक व आर्थिक जीवनाला नव्या दिशा दाखविणाऱ्या ज्या इतर घटना घडल्या त्यामध्ये सत्तेचे विकेंद्रिकरण व सहकारी चळवळ या दोन घटनांचाही उल्लेख करणे आवश्यक आहे. स्वातंत्र्य प्राप्ती-नंतर बहुजन समाजाच्या हातात सत्ता आली. शिक्षणाचा प्रसारही ग्रामीण भागात होऊ लागला. सत्तेचे विकेंद्रिकरण होताच ग्रामीण नेतृत्वाला अधिक संधी प्राप्त झाली. विकेंद्रिकरणाचा प्रयोग हा लोकशाहीच्या कक्षा रुंदावण्याचा आणि त्याची क्षितीजे विस्तार-ण्याचा प्रयोग होता. या प्रयोगाने महाराष्ट्रातील ग्रामीण जनतेला पुढे जाण्याची संधी तर दिलीच पण त्याचबरोबर तिच्या समोर त्याने काही आव्हानेही उभी केली. लोकशाहीमध्ये लोकांच्या प्रश्नांची उकल आणि सोडवणूक ही त्या त्या स्तरांवर होणे आवश्यक असते. त्या त्या स्तरांवर नेतृत्व निर्माण झाले तर लोकविकासाची कामे अधिक वेगाने सुटतील हा या विकेंद्रित लोकशाहीच्या मागचा हेतू असतो. तो कार्यान्वित करण्याचे धोरण महाराष्ट्र शासनाने राबविण्याचा निर्णय घेतला जिल्हा परिषदा त्यामुळे अस्तित्वात आल्या. लोकजीवनाला स्पर्श करणारी ही घटना होती असे माझे मत आहे.

सहकारी चळवळीचा अवलंब केल्यानंतर आजच्या विकेंद्रित लोकशाहीला ग्रामीण भागात एक वेगळीच गतिमानता प्राप्त झाली. आमच्या मिश्र अर्थव्यवस्थेमध्ये सहकारी चळवळीला एक विशेष व स्वायत्त स्थान प्राप्त झालेले आहे. सहकारी चळवळ

ही एक नवीन जीवन मार्ग निर्माण करणारी चळवळ आहे. परस्पर सहकार्यातून स्वावलंबनाकडे घेऊन जाणे हे तिचे प्रमुख उद्दिष्ट आहे. जिल्हा सहकारी बँकांनी आणि जिल्हा सहकारी भूविकास बँकानी शेती बिकासासाठी कर्ज पुरवठा केल्यामुळे ग्रामीण भागात आर्थिक व पर्यायाने सामाजिक परिवर्तनाच्या कार्याला गती मिळू लागली. जलसिंचनाच्या व वीज पुरवठ्याच्या सुविधा उपलब्ध झाल्यामुळे व वाढल्यामुळे उसासारखे व्यापारी पीक शेतकऱ्यांना घेता आले. त्यामुळे सहकारी साखर कारखान्यांची उभारणी ग्रामीण महाराष्ट्रात करता आली. आणि आज सहकारी साखर कारखानदारी आमच्या ग्रामीण अर्थव्यवस्थेचे एक व्यवच्छेदक लक्षण बनली आहे. वस्तुतः आज सहकारी साखर कारखाने हे महाराष्ट्राच्या राजकारणामध्ये सत्तास्थानांचे कार्य करीत आहेत. दबाव गटांचे कार्य करण्याच्या कामी ते गुंतलेले आढळतात. सत्तास्पर्धेच्या कामी त्यांचा उपयोग होऊ लागलेला आहे. कारखानदारी ही काय चीज असते याचा प्रत्यय ग्रामीण महाराष्ट्राला साखर कारखान्यांच्या उभारणीने पहिल्यांदाच आणून दिला ही गोष्ट आपण लक्षात घेतली पाहिजे.

महाराष्ट्रामध्ये या ज्या घटना किंवा घडामोडी घडल्या त्या लक्षात घेतल्या तर शासनाने " सुधारकी " भूमिका अवलंबिली आहे असे म्हणावे लागेल. लोककल्याणवादी राजकीय तत्वज्ञानाचा स्वीकार भारतीय राज्य घटनेने केल्यामुळे ही भूमिका शासनाला पार पा[illegible]श्यक आहेच.

पण मित्रहो, स्वातंत्र्य प्राप्ती नंतर देशात जे काही भलेबुरे घडले व घडत आहे त्याला महाराष्ट्र तरी कसा अपवाद असू शकेल! भल्याबरोबर तसे बरेच बुरेही घडले आहे आणि घडत आहे हे सांगण्याची गरज मात्र आहे. आज आपला देश एका अतिशय

विदारक व चिंताजनक परिस्थितीतून जात आहे. त्या विदारक व चिंताजनक परिस्थितीला कोण जबाबदार आहे? ती परिस्थिती कुणी निर्माण केली? सत्ताधारी नेत्यांनी? राजकीय पक्षांनी? की लोकांनीच? आम्ही स्वीकारलेल्या लोकशाहीच्या अंगभूत दोषातून तर ती परिस्थिती निर्माण झाली नाही ना? या प्रश्नांची उत्तरं शोधली पाहिजेत. ज्या लोकशाहीचा आम्ही मोठ्या अपेक्षेने अंगीकार केला तिला विकृत स्वरूप मात्र निश्चितच प्राप्त झालेले आहे. स्वतःच्या अंगभूत दोषातून ती एवढी विकृत कशी बनू शकेल? लोकशाही राज्यव्यवस्था चालवण्यासाठी देखील शेवटी सत्तेचाच वापर करावा लागतो. राजकीय सत्ता ही वारांगने सारखी असते. लोकशाहीच्या शील व शालिनतेला डाग लावण्याचा ती प्रयत्न करीत असते, हेही नाकबूल करण्यात अर्थ नाही. सत्तेच्या मोहपाशात अडकून आपले शीऽ सांभाळण्याचा प्रयत्न तिला सातत्याने करता आला तर ती सामान्य लोकांच्या मनात स्वतःच्या पृथ्गात्म व्यक्तिमत्वाची प्रतिमा निर्माण करू शकते. पण लोकशाहीचा मार्ग हा देखील घसरणीवरचा मार्ग आहे. तिला घसरणीवर च. ावे लागते. पापणी विचलित झाली की पाय घसरतो. जगातील इतर लोकशाही राष्ट्रांमध्ये हा प्रकार घडलेला आहे. लोकशाही राज्यव्यवस्थेमध्ये निश्चितच काही अंगभूत दोष आपल्याला सापडतात. कदाचित यामुळेच इ. एम. फॉस्टर नावाच्या एका सुप्रसिद्ध इंग्रज लेख लोकशाहीचा तीन ऐवजी दोनदाच जयजयकार (**cheers**) केला आहे. तीन जयजयकारास ती पात्र नाही, असे ह्या विचारवंताचे प्रामाणिक मत आहे. निर्दोष, बलशाही व सर्वोत्तम अशा राज्यव्यवस्थेला हा विचारवंत " प्रिय प्रजासत्ताक " (**Beloved Republic**) या नावाने संबोधतो. पण लोकशाही ही "प्रिय प्रजासत्ताक" होऊ शकत नाही. स्वभावतःच तिच्या अंगी काही दोष व दुर्बलता आपल्याला दिसते. तरी पण ती इतर राज्यव्यवस्थेपेक्षा अधिक

चांगली व स्वीकारार्ह आहे. तिचे हे गुणदोष लक्षात घेवून चर्चील असं म्हणाला होता की, "लोकशाही ही निकृष्ट राज्यव्यवस्था आहे ; पण तिच्या पेक्षा अधिक उत्कृष्ट शासनव्यवस्था अद्यापी आपल्याला सापडू शकलेली नाही." लोकशाही शासनव्यवस्था व्यक्ती स्वातंत्र्याचा पुरस्कार करते आणि सर्वसामान्य लोकांना सत्तेत सहभागी होण्याची संधी प्राप्त करून देते. समाजजीवनातील विविधतेचा ती आविष्कार करते. तिच्यावर टीका करण्याचे स्वातंत्र्यही ती लोकांना देते. ह्या सर्व गोष्टी इतर शासन व्यवस्थेला मंजूर नाहीत. म्हणून लोकशाही शासनव्यवस्था चांगली व स्वीकारार्ह आहे. "प्रिय प्रजासत्ताक" राज्याच्या आदर्श संकल्पनेला जे अभिप्रेत आहे ते कदाचित तिच्याद्वारे अभिव्यक्त होत नसेल. तिच्या अंगभूत दोषांमुळे कदाचित तिच्या हातून काही प्रमाद घडतही असतील. **" So two cheers for Democracy : one because it admits variety and two because it permits criticism. Two cheers are quite enough : there is no occasion to give three. Only Love the Beloved Republic deserves that. "** फॉस्टरचे हे शब्द अतिशय अर्थपूर्ण आहेत.

परंतु आमच्या लोकशाहीला आज जे अतिशय भ्रष्ट व विकृत स्वरूप प्राप्त झाले आहे ते केवळ तिच्या अंगभूत दोषांमुळे किंवा स्वाभाविक दुर्बलतेमुळे नव्हे. सत्तापिपासू, स्वार्थांध व भ्रष्ट राजकारणामुळे ते स्वरूप तिला प्राप्त झाले आहे. आणि म्हणून भारतीय लोकशाही **two cheers** साठी देखील पात्र राहिलेली नाही. **One cheer for you, Democracy** असे मी म्हणेन. तिची विक्री विकृती अशीच चालू राहिली तर एकाही जयजयकारासाठी पात्र राहणार नाही. तिला अभिशापित

करण्याचे प्रयत्न थाबवले पाहिजेत.

स्वातंत्र्यप्राप्ती नंतरचा दशक-दीड दशकाचा कालावधी सोडला तर बाकीचा काळ केवळ सत्तास्पर्धेच्या आंधळ्या राजकारणासाठी खर्च झालेला आहे. परिणामतः आमच्या राजकारणाला विधायक व सर्जनशील स्वरूप प्राप्त होऊ शकले नाही. लोकशाही म्हणजे केवळ राज्ययंत्रणा नाही; ती एक प्रकारची सर्वंकष समाजव्यवस्थाही आहे. आणि म्हणून आपल्याला अभिप्रेत असलेल्या लोकशाही समाजव्यवस्थेची संकल्पना भारतीय राज्यघटनेत विषद करण्यात आलेली आहे. व्यक्तीस्वातंत्र्य, सामाजिक न्याय, आर्थिक समता आणि धर्मनिरपेक्षिता या चार उदात्त तत्वांवर लोकशाही जीवन व्यवस्था उभी करण्याचा संकल्प भारतीयांनी घटनेद्वारे सोडलेला आहे. याचा अर्थच असा की आमच्या घटनाकारांनी लोकशाही जीवन मार्गाचा किंवा समाजव्यवस्थेचा विचार व विवेकपूर्वक स्वीकार केलेला आहे. पण भारतीय लोकशाहीला आमच्या राज्यघटनेला अभिप्रेत असलेल्या मूल्यावर उभे करण्याचा जाणीवपूर्वक प्रयत्न झाला नाही. तिला एका विशिष्ठ समाज व्यवस्थेचे किंवा जीवनमार्गाचे स्वरूप देण्याचा पुरेसा प्रयत्न करण्यात आला नाही. आजच्या राजकारणाला या व्यवस्थेच्या दिशेत विशेष अशी वाटचाल करता आली नाही. ही वस्तुस्थिती आहे. म्हणूनच त्याला निवडणुकांच्या पलिकडे जाता आलेले नाही. अर्थपूर्ण राजकारणाला सामाजिक अभिसरणाचाही विचार करावा लागतो. नव्हे, सामाजिक आशयाशिवाय त्याला अर्थपूर्ण होताच येत नाही. पण या गोष्टीचे भान आमच्या देशातील कोणत्याही राजकीय पक्षाने ठेवले नाही. आजची बिकट परिस्थिती त्यामुळे निर्माण झाली आहे हे नाकबूल करण्यात अर्थ नाही. सत्ताधारी पक्षावर या गोष्टीची जबाबदारी अधिक प्रमाणात पडते; पण विरोधी पक्षांच्या खांद्यावर कसल्याही

जबाबदारीचे ओझे नसते असा दावा करता येणार नाही. जबाबदारीच्या जाणिवेतून केल्या जाणाऱ्या राजकारणाचा पोत वेगळा असतो. याचा वाणही वेगळा असतो. अशा प्रकारच्या राजकारणाला सामाजिक व सांस्कृतिक आशय प्राप्त झाल्याशिवाय राहात नाही. सामाजिक आशयाच्या अभिव्यक्तीतून राजकारणाला अर्थपूर्णत्व मिळविता येते. आमच्या राजकारणाला ते मिळविता आले नाही, हे सत्य आहे. राजकारणाला सामाजिक समतेचा आशय प्राप्त करून द्यावयाचा असेल तर विवेकपूर्ण जाणिवांची व जाणीवपूर्वक प्रयत्नांची पराकाष्ठा करावी लागते. तशा प्रकारचे प्रयत्न आमच्या हातून झाले नाहीत. परिणामतः लोकशाही समाज व्यस्थेच्या उद्दिष्टांच्या विरोधात या देशातील राजकारण उभे राहिले. आम्हाला अभिप्रेत असलेल्या मूल्यांवर आधारित अशी लोकशाही समाजव्यवस्था ही वस्तुतः परंपरेने चालत आलेल्या आमच्या समाज व्यवस्थेपेक्षा वेगळी आहे. तिचे निराळेपण आम्ही लक्षात घेतलेच नाही. तिची मूल्यधारणा निराळी आहे. ज्या मूल्यांच्या आधारावर आमची जातिव्यवस्था उभी आहे त्या मूल्यांना छेद देणारी मूल्ये लोकशाही समाजव्यवस्थेला अभिप्रेत आहेत. व्यक्तीस्वातंत्र्य, सामाजिक न्याय, आर्थिक समता व धर्मनिरपेक्षिता या मूल्यांवर लोकशाही समाजव्यवस्था अवलंबून आहे. आणि म्हणूनच तिला धर्मांधता जातिभेद किंवा कोणत्याही प्रकारची विषमता मंजूर नाही. पण लोकशाही समाज व्यवस्थेला ज्या गोष्टी मंजूर नाहीत त्याच गोष्टींचा आधार घेऊन तिला राबविले जात आहे, ही मात्र दारूण शोकांतिका आहे. जातीभेद हाच मुळी आमच्या समाजाची पोलादी चौकट (**Steel frame**) आहे. ती तोडल्याशिवाय समतामूल्याधिष्ठित समाजव्यवस्था निर्माण करता येणार नाही. पण या गोष्टीचे भान आमच्या राजकारणाला राहिलेच नाही. या विचाराचा आम्ही जाणीवपूर्वक स्वातंत्र्योत्तर काळात समाजकारणाची स्वीकार केलाच नाही

प्रक्रिया जवळ जवळ थंड पडलेली आहे. समाजकारण म्हणजे **No-man's Land** असं म्हणण्याची पाळी आज आमच्यावर आलेली आहे.

सामाजिक जाणिवा मनात बाळगून महाराष्ट्रातील राजकारणाच्या क्षेत्रात काम करणाऱ्या नेत्यांची व कार्यकर्त्यांची संख्या फारच कमी आहे. एस्. एम्. जोशी, ना. ग. गोरे आणि इतर काही व्यक्ती सोडल्या तर या संदर्भात फारसा विचार आणि कार्य कोणी करीत नाही. सत्तास्थानावर असलेल्या सर्वच नेत्यांना सामाजिक आशयाचे महत्व कळले नाही असे कसे म्हणता येईल? पण या गोष्टीचे महत्व न कळलेल्या सत्ताधाऱ्यांची संख्या जास्त होती, आहे. त्यांच्या विचारांना सामाजिक जाणिवांची प्रगल्भता मिळू शकली नाही. आणि म्हणूनच आमची लोकशाही आशयशून्य राजकारणाच्या दलदलित खोलवर रुतून बसली. निवडणुकांच्याद्वारे सत्ता काबीज करणे एवढा एकच उद्देश राजकारणासमोर असेल तर जातीयवादाला प्रोत्साहन दिल्याशिवाय दुसरा कुठलाही पर्याय उरत नाही, हे उघड आहे. राजकारण म्हणजे सत्तासंपादन असेच एक समीकरण आमच्या देशाच्या राजकीय जीवनात आता रूढ झाले आहे. अशा अवस्थेत ह्या समीकरणाचा पाठपुरावा केला जात आहे. या समीकरणाचा आधार न घेता वेगळ्या पद्धतीने लोकशाहीचे गणित मांडण्याचा कोणीही प्रयत्न करीत नाही ही खेदाची बाब आहे. आणि म्हणून या देशात जी काही प्रगती झाली तिचा वाटा सामान्य लोकांच्या पदरात पडू शकला नाही. महाराष्ट्रात सत्तेचे विकेंद्रिकरण झाले; पण त्या विकेंद्रित सत्तेमध्ये दुर्बल समाजघटकांना सहभाग मिळाला नाही. महाराष्ट्रात सहकारी चळवळीचा आवाका वाढला; पण तिलाही एका विशिष्ट अशा मर्यादेपलिकडे जाता आले नाही. निवडणुकीच्या राजकारणात जे वरचढ ठरले

त्यांनाच सहकाराच्या क्षेत्रात आपले पाय रोवता आले. ग्रामीण भागात नव श्रीमंतांचा एक वर्ग निर्माण झालेला दिसतो आहे. साखर कारखान्यांचा फायदा काही मोजक्या लोकांच्याच पदरात पडला. लहान शेतकरी व शेतमजुरांचे हात मात्र कोरडेच राहिले. दारिद्र्य रेषेच्या वर त्यांना येण्याची संधी मिळू शकली नाही. ज्यांना कसलीच मालमत्ता नाही, त्यांना पत नाही; आणि ज्यांना पत नाही त्यांना अशा प्रकारच्या कोणत्याही उत्पादन व्यवस्थेत स्थान नाही. ज्यांच्याकडे उत्पादनाची साधनं आहेत त्यांच्याच खिशात पैसा जाणार. ज्यांच्या जवळ केवळ दोन हात आणि दोन पाय या शिवाय दुसरे काहीच नाही त्यांच्या पदरात स्वतःच्या घामाशिवाय दुसरे काहीही पडू शकले नाही, ही वस्तुस्थिती अमान्य करता येत नाही. आणि म्हणून ग्रामीण भागाचं नष्टचर्य संपवू इच्छिणारी सहकारी चळवळ शेतमजुरांच्या व दलितांच्या दारापर्यंत जाऊ शकली नाही. सहकारी चळवळ ही एक पर्यायी अर्थव्यवस्था या नात्याने आमच्या समोर उभी आहे. भ्रष्टाचाराने ती आज सडलेली दिसते. राजकारणाच्या हातातील सत्ता संपादनाचं शस्त्र न बनता समाज परिवर्तनाचं साधन तिला बनता आलं असतं तर महाराष्ट्रात आज एक वेगळंच चित्र दिसलं असतं उत्पादन व्यवस्थेत सर्वांना स्थान दिल्याशिवाद आर्थिक व सामाजिक परिवर्तनाची अपेक्षा करणं चुकीचं ठरेल सामान्य माणसाचं नागरिकत्व हीच त्याची पत असा विचार केल्याशिवाय या देशात मूलगामी असं आर्थिक व सामाजिक परिवर्तन घडवून आणता येणार नाही. उद्याच्या राजकारणाला या विचाराचा पाठपुरावा करावा लागणार आहे.

मागच्या दशकापासून सबंध देशातील राजकारणाला एक अतिशय अनिष्ट दिशा प्राप्त झालेली आहे. लोकशाहीला विडंबनाचे स्वरूप त्यामुळे प्राप्त झालेले आहे. सत्तास्पर्धेच्या रिंगणात

अडकलेल्या राजकारणी लोकांपासून देशहिताच्या विचारांची व कार्याची बूज कशी राखली जाणार ? अशा अवस्थेत देशहितापेक्षा पक्षहित अधिक मानले जाते. आणि आज तर अशी अवस्था निर्माण झालेली आहे की पक्षनिष्ठा नावाची चीज नामशेष होत चाललेली आहे. मूल्यनिष्ठा संपली की देशनिष्ठा, समाजनिष्ठा व पक्षनिष्ठा या सर्वच निष्ठा संपतात. मूल्यहीन समाज जीवनात प्रामाणिकपणाला जागा मिळू शकत नाही. आणि म्हणूनच गांधीजींच्या समाधी जवळ घेतलेल्या देशहिताच्या शपथा ह्या खोट्या ठरतात. लोकांच्या भावनेला साद घालण्यासाठी अशा शपथांचा उपभोग होत असेलही, नाही असे नाही. पण स्वतःची, लोकांची व पर्यायाने देशाची केलेली अशा प्रकारची फसवणूक लोकांच्या लक्षात आल्यावाचून राहात नाही. लोकसेवेसाठी पक्षनिष्ठा न सोडण्याचा संकल्प व निर्धार किती फसवा असतो याचा दुःखदायी अनुभवही आता लोकांच्या पदरात भरपूर प्रमाणात पडलेला आहे पंढरपूरच्या शेजारी उभे राहून एखादा राजकीय पुढारी लोकांना आश्वासन देतो की मी माझा पक्ष कधीही आणि कोणत्याही परिस्थितीमध्ये सोडणार नाही; अठ्ठावीस युगांपासून उभा असलेला विठोबा आपल्या पायाखालची वीट सोडून दुसरीकडे एखादेवेळी कदाचित जाईल, पण मी माझा पक्ष सोडून दुसरीकडे कुठेही जाणार नाही. किती सखोल आहे ही पक्षनिष्ठा! पण ही भाषा वापरणारा स्वार्थांध राजकीय पुढारी चार–दोन दिवसांच्या आतच पक्षांतराची घोषणा करतो. देशहितासाठीच त्याला हे करावे लागते असा त्याचा दावा असतो. पक्षनिष्ठे पेक्षा देशहिताला अधिक प्राधान्य दिले पाहिजे आणि म्हणून मला हा पक्षांतराचा निर्णय घ्यावा लागला, असे तो कुठलीही चाड न बाळगता लोकांना सांगतो. शेवटी ज्या राजकीय पक्षाला जनता जनार्दनाने निवडून दिले आहे त्या पक्षाचा स्वीकार करणे म्हणजे जनताजनार्दनाच्या इच्छेचा आदर करणे होय, अशा शब्दात

आपल्या कृत्याचे तो समर्थन करतो. अशा पुढाऱ्यांच्या अनुयायांनी काय करावे ? त्याच्या पक्षातील सामान्य कार्यकर्त्यांनी कोणती भूमिका घ्यावी ? तेही शेवटी आपल्या नेत्यांच्या पावलावर पाय ठेवून त्यांच्या मागे जातात. किंवा हतबल होऊन दुःखाचे सुस्कारे टाकतात. दुसरे करणार तरी काय ?

मित्रहो, अशा परिस्थितीमध्ये लोकांचा राजकारणावर, राजकीय पक्षांवर व राजकीय पुढाऱ्यांवर किती काळ विश्वास राहील हा प्रश्नच आहे. अशा प्रकारचे राजकारण बघून सामान्य लोक मात्र भांबावले आहेत, गोंधळले आहेत. सत्तेवर आलेला पक्ष जेव्हा लोकांच्या अपेक्षा पूर्ण करू शकत नाही तेव्हा साहाजिकच दुसऱ्या एखाद्या तुल्यबल पर्यायी पक्षाची अपेक्षा लोक बाळगतात. आणी-बाणी संपते न संपते तोच जनता पक्षाचा जन्म झाला आणि तो सत्तेवर आला त्याचे हेच कारण आहे. पण पुढे त्याचे काय झाले याची दुःखद आणि तितकीच हास्यास्पद कहानी मी आपल्या समोर बयान करू इच्छित नाही. ती आपल्याला पूर्णतः माहित आहेच. एखादा पक्ष सामर्थ्यशाली पर्यायी पक्ष म्हणून टिकू शकला नाही तर नाकारलेल्या पक्षालाच पुन्हा पाठिंबा देण्याशिवाय लोकांसमोर कसलाही मार्ग उरत नाही. आणि मग देशात नकारात्मक राजकारणाला आरंभ होतो. अशा प्रकारच्या राजकारणाचा एक अनिवार्य भाग म्हणून वैचारिक साम्य व बांधीलकी नसलेल्या पक्षांच्या आघाड्या निर्माण होतात. अशा आघाड्या मर्यादित उद्देशपूर्ती करू शकतील; पण तुल्यबल पर्यायी पक्ष म्हणून त्या टिकू शकत नाहीत. भारतीय राजकारणात ही एक फार मोठी शोकांतिका निर्माण झाली आहे. महाराष्ट्रात यापेक्षा वेगळे चित्र दिसत नाही. भाराभर पक्षांच्या अस्तित्वामुळे लोकशाही प्रक्रियेला बळकटी येणे शक्य नाही. अखिल भारतीय स्तरावर काम करणारे जवळपास सर्वच राजकीय पक्ष दुभंगलेले

आहेत. जवळपास प्रत्येक प्रमुख राजकीय पक्षाला दुभंगण्याचा (**dichotomy**) शाप लागलेला आहे. किमान दोन तुकडे न झालेला एकही प्रमुख राजकीय पक्ष आपल्याला दाखवता येणार नाही. पक्षविघटनाची ही प्रक्रिया गेल्या दोन दशकांपासून अस्तित्वात आलेली आहे. वैचारिक मतभेदांपेक्षा इतर क्षुल्लक कारणेच त्या विघटन प्रक्रियेला अधिक प्रमाणात जबाबदार आहेत. नेत्यांच्या वैयक्तिक मतभेदातून बरेच पक्ष वेगवेगळ्या गटात विभागले गेल्याचे आपणास दिसतात. त्यामुळे एक प्रकारचा राजकीय शक्तीपात या देशात फार मोठ्या प्रमाणात होत असल्याचे दृश्य आपण पाहात आहोत. महाराष्ट्र याला कसा अपवाद असू शकेल?

राजकीय अस्थिरता हा आमच्या राज्यकारणाचा स्थायीभाव बनलेला आहे. विटांच्या किंवा वाळूच्या ढिगाऱ्याला वास्तू मानता येत नाही. तद्वत माणसांच्या जमावाला पक्ष मानता येणार नाही. पण ढिगाऱ्यातली प्रत्येक वीट किंवा प्रत्येक वाळूचा कण मीच वास्तू आहे असा दावा करू लागला तर काय अवस्था निर्माण होईल? त्याच प्रमाणे एखाद्या राजकीय पक्षातला प्रत्येक कार्यकर्ता मीच नेता आहे असा दावा करू लागला तर त्या पक्षाची काय अवस्था होईल? ती अवस्था आपल्या समोर उभी आहेच ना! वास्तूरचनेच्या विशिष्ठ प्रक्रिये शिवाय कसलीही वास्तू उभी करता येणे शक्य नसते. तसेच पक्षबांधणीच्या विशिष्ठ प्रक्रिये शिवाय कोणताही राजकीय पक्ष उभा करता येत नसतो. लोकांच्या लोंढ्याला पक्ष मानता येत नाही. अशा पक्षाला बहुमताने निवडून दिल्यानंतर रस्त्यातले लोंढे राज्याराज्यातील विधान सभेत जाऊन बसतात. लोकसभेतही रस्त्यातील जमावाचे मानसशास्त्र जाऊन पोचते. आणि मग लोकसभेला व राज्याराज्यातील विधानसभांना बाजारपेठेतील चौरस्त्याचे स्वरूप

प्राप्त होते. अशा राजकारणाच्या प्रक्रियेमध्ये कोणता पक्ष निवडून येतो हा प्रश्न महत्वाचा नाही. अशा अवस्थेतही लोकशाही राज्यव्यवस्थेवर लोकांचा विश्वास कसा राहू शकेल, हा प्रश्न मात्र अतिशय महत्वाचा आहे.

तेव्हां अशा एका विचित्र अवस्थेमध्ये सापडलेल्या राजकारणामुळे देशात राजकीय नेतृत्वाचा पेचप्रसंग निर्माण झाला आहे. राजकीय नेतृत्वाचा हा " क्रायसिस " अराजकाला निमंत्रण देऊ शकतो; आणि अराजकाची अवस्था ही हुकुमशाही प्रवृत्तीला मार्ग निर्माण करून देऊ शकते. राजकीय जीवनात नैतिक मूल्यांची पोकळी निर्माण झाली की नेतृत्वाचा " क्रायसिस " निर्माण होतो हे आपण लक्षात घेतले पाहिजे. अशा प्रकारच्या पोकळीत आपण आज सापडलो आहोत हे नाकारता येत नाही. आपल्या देशातील राजकीय नेतृत्वाचा " क्रायसिस " हा वैचारिक निष्ठा, मूल्य प्रतिबद्धता आणि गतिमान कार्यप्रवणता या तीन गोष्टींच्या " क्रायसिस " चा परिपाक आहे असे मला वाटते.

आजच्या राजकारणाचे असे हे दुःखदायी स्वरूप आहे. उद्याच्या राजकारणाची बांधणी व उभारणी वैचारिक निष्ठा, नैतिक प्रतिबद्धता आणि आश्वासक कृतीशिलता – या तीन गोष्टींच्या आधारावर करावी लागेल. हे कार्य करता येत नसेल तर अनिश्चिततेचे सावट दूर सारता येणार नाही. लोकशाही राजकारणामध्ये राजकीय पक्षांची अपरिहार्यता लक्षात घेऊन किमान दोन तुल्यबल पक्षांची बांधणी व उभारणी होऊ शकली तर राजकीय स्थैर्याची आशा बाळगता येऊ शकेल. नसेल तर राजकीय पक्षांच्या उपयुक्ततेसंबंधी लोकांच्या मनात निर्माण झालेली अविश्वासाची भावना अधिकच वाढेल. ती आत्यंतिक टोकाला जाऊन पोचली तर लोकशाही राज्यव्यवस्थेवरचा लोकांचा

विश्वास पूर्णपणे उडून जाईल. राजकीय नेत्यांच्या व राजकीय पक्षांच्या विषयीची विश्वासार्हता कमी झाली की लोकशाहीवरचा विश्वास कमी व्हायला वेळ लागणार नाही. या संभाव्य धोक्याची जाणीव करून घेणे आवश्यक आहे. असे मला वाटते. वस्तुतः या देशातील अशा प्रकारच्या अधःपतीत राजकारणाने भारतीय लोकशाहीला धोक्याच्या वळणावर आणून सोडले आहे. पुढची दिशा कोणती राहाणार आहे, त्या दिशेतील वाटचाल कशा प्रकारची आहे, आणि त्या मार्गावरील कोणत्या गोष्टींना आम्ही **milestones** मानणार आहोत, या गोष्टी आपण आजच ठरविल्या पाहिजेत. त्या शिवाय उद्याच्या राजकारणाचे स्वरूप स्पष्ट होणार नाही.

मित्रहो, अशा " ह्या " राजकारणाचा दुष्परिणाम सामाजिक विघटनाला कारणीभूत ठरलेला आहे, हे सांगण्याची आवश्यकता नाही. राजकारण हे समाज जीवनाच्या राजकीय अंगावरच केवळ परिणाम करीत नाही; समाजाच्या इतर अंगांवरही त्याचा तितकाच भलाबुरा परिणाम होतो, हे आपल्याला विसरता येत नाही. वास्तविक महाराष्ट्राच्या सामाजिक विघटनाला आजचे राजकारण फार मोठ्या प्रमाणात जबाबदार आहे. आजच्या सामाजिक जीवनाचे विघटन जातीय तणावातून निर्माण झाले आहे, निर्माण होत आहे. एका काळी ब्राह्मण-ब्राह्मणेतर वादाने महाराष्ट्राच्या सामाजिक जीवनात पेट घेतला होता. तो वाद अजूनही पूर्णतः विझलेला नाही. आणि आज महाराष्ट्रातील सामाजिक जीवनातला संघर्ष ब्राह्मण-ब्राह्मणेतर वादापर्यंत मर्यादित राहिलेला नाही.. ब्राह्मण समाजाच्या विरुद्ध संघर्षाची भूमिका घेतलेला बहुजन समाजही आता अंतःकलहाच्या आहारी जात असताना दिसतो आहे. त्यामुळे " बहुजन समाज " या शब्दाचा " वर्गीय " अर्थ लोप पावून त्याला " जातीय " आशय

आज प्राप्त होतो आहे. सामाजिक समतेच्या संघर्षाची ही पराभूतताच आहे असे मला वाटते. अशा प्रकारची पराभूतता सामाजिक कलहाच्या ठिणग्या आपल्या पदराखाली अधिक वेळ झाकून ठेवू शकत नाही. त्या ठिणग्या मराठा-मराठे-तर किंवा दलित-दलितेतर वादाच्यारूपाने पेट घेऊ शकतात. महाराष्ट्राच्या अंत:करणात अशा प्रकारचे अनेक कलह आज धुमसत आहेत. आणि धुमसणाऱ्या गोष्टींना पेट घेण्यास फारसा वेळ लागत नाही, हे सांगण्याची आवश्यकता नाही.

विविध जाती-जमातींच्या संकुचित आणि अर्थहीन अस्मिता विविध मार्गांनी व्यक्त होत असताना आपण आज पाहतो आहोत. संकुचित अस्मिता किंवा अहंता प्रज्वलित केल्यामुळे सामाजिक एकात्मतेचा विचार मागे पडलेला आहे. विविध जातींच्या मध्ये सुधारणावादी प्रवृती वाढल्या तर सामाजिक प्रगतीला व ऐक्याला त्या अंतिमत: उपयुक्तच ठरतील. पण सुधारणावादाचा एकंदर अभावच आहे. सध्याच्या परिस्थितीमध्ये सामाजिक संतुलन ढळलेले आहे. वस्तुत: महाराष्ट्रात सामाजिक संतुलन या पूर्वीही नव्हते. आजही त्याचा अभाव आहे. राजकीय परिस्थितीच्या संदर्भातही सामाजिक संतुलनाचा विचार करणे आवश्यक असते. महाराष्ट्रात मराठा समाज संख्यात्मकदृष्टया मोठा असल्यामुळे राजकीय नेतृत्वामध्ये व शासन यंत्रणेमध्ये त्याची भागीदारी अधिक असणार हे स्वाभाविक व रास्त आहे. पण त्याच बरोबर या समाजाने ह्या "भागीदारी" चे सतत भान राखणे आवश्यक आहे. भागीदारीमध्ये सगळयांचीच "मालकी" असते; आणि म्हणून तिच्यात सगळयांनाच न्याय वाटा मिळणे आवश्यक असते. सर्व समाजघटकांचा अशा भागीदारीमध्ये सहभाग व सहकार्य असणे आवश्यक आहे. नसेल तर अंत:कलह निर्माण होण्याची शक्यता असते; हितसंबंधांचे

संतुलन ढळण्याची शक्यता असते; लहान व दुर्बल समाज घटकांमध्ये असुरक्षिततेची भावना बळावते; आणि मग विकासाच्या मार्गावर सगळयांनाच एकमेकांबरोबर सारख्याच गतीने चालता येणे कठीण होऊन बसते. अशा अवस्थेत सुजाण व सर्वसमावेशक नेतृत्वाची आवश्यकता असते. स्थानिक स्तरांपासून ते राज्य पातळीपर्यंत अशा नेतृत्वाची आवश्यकता असते. आणि अशा प्रकारच्या नेतृत्वाची अधिक जबाबदारी बहुसंख्यांक समाजावर पडते. पण ती जबाबदारी चांगल्या प्रकारे पार पडू शकत नसेल तर अल्पसंख्यांक जातींची ओरड सुरू होते. अशा अवस्थेमध्ये त्यांचा आक्रोश अर्थहीन असतो असे म्हणता येणार नाही. मराठा–मराठेतर वादाच्या मुळाशी अशा प्रकारचे असंतुलन आहे. हे नाकारता येत नाही.

जातीयव्यवस्थेवर आधारलेल्या आमच्या समाजामध्ये ज्या विविध अल्पसंख्यांक जाती आहेत त्यांची विभागणी दोन गटांमध्ये केली पाहिजे : उच्चवर्णीय अल्पसंख्यांक व मागासवर्गीय अल्पसंख्यांक. ज्या जाती सांस्कृतिक, सामाजिक व आर्थिक या तिन्हीही दृष्टीने अतिशय मागासलेल्या आहेत अशा जातींचा अंतर्भाव अनुसूचित जाती-जमातींमध्ये करण्यात आलेला आहे. पण इतर बऱ्याच जाती सवर्ण समाजामध्ये दुर्बल व शोषित घटकांच्या रूपाने अस्तित्वात आहेत. आजच्या राजकीय संदर्भात अशा दुर्बल व पीडित अल्पसंख्यांक जातींना कोणत्याही प्रकारचा आधार मिळत नाही. खरे तर "अल्पसंख्यांका" च्या आक्रोशातून ज्यांना राजकीय फायदे मिळतात ते दुर्बल अल्पसंख्यांकांचे प्रतिनिधित्व करीत नाहीत, करू शकत नाहीत. अल्पसंख्यांकांच्या बहुजन समाजाविरुद्धच्या हाकाटीतून जे राजकीय फायदे प्राप्त होतात ते ह्या शोषित अल्पसंख्यांच्या पदरात पडत नाहीत. शासनाच्या धोरणानुसार चार-दोन नोकऱ्या त्यांच्या पदरात पडत असतील,

नाही असे नाही; पण सत्तेत त्यांना सहभागाची संधी मिळत नाही. ती मिळते उच्चवर्गीय प्रतिष्ठित अल्पसंख्यांकांना (**priviledged minorities**). वस्तुत: या देशातील समाज जीवनाच्या जवळपास सर्व क्षेत्रात अनेक शतकांपर्यंत अशा उच्च-वर्णीय व उच्चवर्गीय अल्पसंख्यांक जातींचेच प्राबल्य राहात आलेले होते. अशा जातींच्या हातातच धार्मिक, सामाजिक, शैक्षणिक, आर्थिक व सांस्कृतिक जीवनाच्या नाड्या होत्या. तथाकथित बहुजन समाजाच्या हातात सत्ता अगदी कालपरवा आलेली आहे. या सत्तेचा अधिक फायदा मराठा समाजाच्या पदरात पडतो आहे; आणि त्यामुळे त्याला एक नवीन मानसिकता प्राप्त झाली आहे यात शंका नाही. मराठा समाजाच्या हातात राजकीय सत्ता आल्यानंतर बहुजन समाजात अंतर्भूत असणाऱ्या मराठेतर दुर्बल घटकांना "अल्प संख्यांक" हा पारिभाषिक शब्द मिळाला. त्यांची असुरक्षिततेची भावना हे नाव परिधान करून विविध अर्थछटांतून अभिव्यक्त होत असताना आपण आज पाहात आहोत. पण त्यांच्या वाट्याला असुरक्षिततेशिवाय खरोखर काहीच आले नाही. त्यांचे शोषित जीवन विकासाच्या वाटेवर चालताना आपल्याला दिसत नाही. दलितांना विशेष सवलती व राखीव जागा राजकारणाच्या क्षेत्रात मिळाल्या नसत्या तर त्यांच्या जीवनालाही परिवर्तनाच्या दिशा मिळू शकल्या नसत्या. दलित समाजामध्ये आज एक प्रकारची सामाजिक "आक्रमकता" (**militancy**) निर्माण झाली आहे. तो संख्येनेही नगण्य नाही. खरा प्रश्न आहे तो दलितेतर दुर्बल, दुर्लक्षित, शोषित व शापित अल्पसंख्यांक जातीतील लोकांचा. त्यांची संख्या बोटावर मोजण्या इतकीही नाही. ज्यांच्या जवळ संख्या नाही त्यांना राजकारणात व राजकीय सत्तेत स्थान नाही. राजकारणाच्या संदर्भात त्या **non-entities** आहेत. आर्थिक व शैक्षणिक दृष्टीनेही त्या मागासलेल्या असल्यामुळे त्यांना समाज

जीवनात "मार्जिनल" स्थानावर उभे रहावे लागते. परंपरेने चालत आलेले त्यांचे व्यवसाय पूर्णत: कोलमडल्यामुळे उच्च-वर्णीय किंवा उच्चवर्गीय अल्पसंख्यांका प्रमाणे त्यांना इतर क्षेत्रात प्रवेश करता आलेला नाही. विस्थापित जीवनाचे ते वाटेकरी आहेत. असे म्हटले तरी चालेल. एकत्रित जमून आक्रोश करण्याचे त्यांनी ठरविले तरी फारसा फरक पडणार नाही. कारण त्यांच क्षीण आवाज हवेत ताबडतोब विरून जाईल. अशा ह्या दुर्लक्षित अल्पसंख्यांक जातींना आजही सामाजिक व आर्थिकदृष्टचा "मार्जिनल" जीवन जगल्याशिवाय गत्यंतर नाही. सामाजिक-दृष्टचा त्या मुख्य प्रवाहात असल्या तरी प्रत्यक्षत: त्या "मार्जिनल" च आहेत. सामाजिकदृष्टचा त्या बहिष्कृत नाहीत; पण दुर्लक्षित निश्चितच आहेत. आजच्या राजकीय परिस्थिती-मुळे जे सामाजिक संदर्भ निर्माण झालेले आहेत, त्यामध्ये त्यांचे स्थान हे उपेक्षितांचे स्थान आहे. सामाजिक संघर्षाचे कसलेच बळ त्यांच्या बाहूमध्ये नाही. राजकारणात त्यांचा कोणीही प्रवक्ता नाही. पॉलो फ्रिअरे जिला "कल्चर ऑफ सायलंस" म्हणतो त्या संस्कृतीच्या आवर्तात शोषणाच्या खुणा आपल्या सर्वांगांवर घेऊन मुकेपणाने त्या अल्पसंख्यांक जाती जगताहेत असे मला प्रामाणिकपणे वाटते. मराठा समाजाच्या विरुद्ध हाकाटी करणाऱ्या "अल्पसंख्यांकांना" अशा दुर्बल व शोषित जातींचे राजकीय हितसंबंध अभिप्रेत नाहीत. अशा लोकांच्यासाठी उद्याचे राजकारण काय करणार आहे? कोणत्या प्रकारचे आश्वासन त्यांना उद्याचा राजकीय महाराष्ट्र देणार आहे?

महाराष्ट्रातील दलितांची अवस्था तर अतिशय बिकट आहे. शोषित अल्पसंख्यांक सवर्ण जाती ह्या महाराष्ट्राच्या समाज जीवनामध्ये "मार्जिनल" स्थानी आहेत असे मी मघाशी म्हणालो. पण दलितांना आमच्या समाज जीवनातील "मार्जिनल" स्थानाच्याही

पलिकडचे जीवन जगावे लागते. आमच्या समाज जीवनाच्या परिघा पलीकडचे स्थान त्यांना पिढ्यान् पिढ्यापासून देण्यात आलेले आहे. दलित समाजातही काही " मुक्या " जाती आहेत. त्यांच्या निकृष्ट जीवनाचे कोणत्या शब्दात वर्णन करावे! वेशी-बाहेरील जगाच्याही बाहेरच्या जगातले जीवन ज्यांच्या वाट्याला आले आहे. आशा अनेक दलित जाती महाराष्ट्रात आहेत. त्यांचा आक्रोश स्वतःच्या गळ्याबाहेर सहसा पडू शकत नाही; आणि पडलाच तर तो त्यांच्याच कानापर्यंत जाऊन तो पोचू शकत नाही. आदिवासी व भटक्या जमातींचा समावेश अशा दलितांमध्ये होतो. त्यांच्या अविश्रांत विस्थापित जीवनाचे मानसिक, सामाजिक व आर्थिक पुनर्वसन होऊ शकलेले नाही. शिक्षणाच्या सुविधा त्यांच्या-पर्यंत जाऊन पोचल्या नाहीत. शोषणाच्या चक्रव्यूहात त्या पूर्णतःच अडकून पडलेल्या आहेत. राजकारणात अशा लोकांचे प्रतिनिधित्व कोण करू शकेल? सत्तेचा लाभ अशा लोकांना कोण मिळवून देऊ शकेल? दोन वेळच्या जेवणाची जिथे शाश्वती नाही तिथे अशा कमनशीब लोकांना उत्पादन व्यवस्थेत उभे करण्याचा कोण प्रयत्न करू शकेल? महाराष्ट्रातील उद्याचे राजकारण आणि समाजकारण अशा लोकांची दखल घेईल का? समाज जीवनाच्या मुख्य प्रवाहात अशा लोकांना आणण्याचा प्रयत्न उद्याच्या राजकारणाला व समाजकारणाला करता आला नाही तर अशा अनेक लोकांच्या जीवनात कसलाच उजेड पडणार नाही. काळोख पांघरून रानोमाळी त्यांना या पुढेही सतत भटकावे लागेल.

तेव्हा मित्रहो, आमच्या समाजपुरुषाचे व्यक्तित्व हे अशा प्रकारे दुभंगले आहे. अनेक प्रकारच्या कलहांमध्ये हा समाजपुरुष उभा आहे. काही विशिष्ठ अवस्थामध्ये समाजिक संघर्ष टाळता येत नसतात. उलट ते अपरिहार्य ठरतात. पण त्यामुळे सबंध समाज

विनाशकारी विघटनाच्या प्रक्रियेत सापडला तर त्याचे व्यक्तित्व पूर्णतः दुभंगून जाईल. महाराष्ट्राचे समाज मन अशा प्रकारे दुभंगलेले समाज मन आहे. त्याच्या एकसंध व एकात्म व्यक्तित्वाची पुनर्बांधणी कधी व कशी करायची? त्याचे विघटित समाज-जीवननव्याने संघटित कसे करायचे? दुभंगलेल्या आमच्या या समाज जीवनामध्ये भावनिक एकात्मता आढळत नाही ही वस्तू-स्थिती आहे. महाराष्ट्राचे समाज मन विविध गंडांनी पछाडलेले आहे. अनेक प्रकारच्या पूर्वग्रहांनी ते व्यापलेले आहे. आणि विविध समाज गटांमध्ये एकमेकांविषयी आपुलकीची भावना सापडत नाही. अविश्वासाच्या वातावरणा बाहेर त्याला त्यामुळेच येता येत नाही. तेव्हा महाराष्ट्राचे हे दुभंगलेले मन कसे सांधायचे? कुठल्याही समाजजीवनामध्ये या किंवा त्या स्वरूपामध्ये संघर्षाची प्रक्रिया सातत्याने चालूच राहते. त्यातून सामाजिक विघटनाची परिस्थिती निर्माण होत असते हे निराळे सांगण्याची आवश्यकता नाही. आणि हे विघटन टाळायचे असेल तर सामाजिक संघर्षाच्या या प्रक्रियेला समांतर अशी सामाजिक पुनर्रचनेची किंवा नव-निर्माणाची प्रक्रिया जाणीवपूर्वक चालू करावी लागते. संघर्षामध्ये उभे राहून सामाजिक पुनर्रचनेचे किंवा नवनिर्माणाचे कार्य करणे सोपे नसते. महाराष्ट्रात अशा प्रकारचे प्रयत्न कुणीच केले नाहीत असे म्हणता येत नाही. पण त्याचे दुभंगलेले मन सांधण्याच्या कामी त्यांना यश प्राप्त होऊ शकलेले नाही. त्यांची शक्ती कमी पडली असावी. सामाजिक प्रबोधनाचे कार्य व्हावे तेवढे होऊ शकलेले नाही. स्वातंत्र्योत्तर काळात त्याला फारशी गती मिळू शकली नाही. राजकारणाला सामाजिक प्रबोधनाचे माध्यम बनता आले नाही. परिणामतः विविध सामाजिक कलहांमध्ये उभ्या असलेल्या आमच्या समाज पुरुषाच्या अंगावर अनेक भेगा पडलेल्या आहेत. त्यातील प्रत्येक भेग ही जखमांची मालिका आहे. त्या बुजवण्यासाठी रचनात्मक किंवा नवनिर्माणशील

राजकारणाची आणि समाजकारणाची आवश्यकता आहे. रचनात्मक कार्यासाठी वचनबद्ध असाणाऱ्या राजकारणाची आम्हाला आवश्यकता आहे. अशा प्रकारचे राजकारण समाजकारणाच्या बाबतीत नकाराची भूमिका घेऊ शकणार नाही. राज्यसत्तेला समाजकारणाच्या व्यासपीठावर कदाचित बसता येणार नाही. पण त्या व्यासपीठाला अभिप्रेत असणाऱ्या गोष्टींना अप्रत्यक्षतः प्रोत्साहन त्याला जरूर देता येईल. वस्तुतः राज्यसत्ता ही आजच्या काळात मर्यादित स्वरूपाची राहिलेली नाही. अतिशय व्यापक असे तिला स्वरूप प्राप्त झालेले आहे. तिचे हे स्वरूप लक्षात घेवूनच तिला एकाकाळी " लेव्हियतन " हे नामाभिदान देण्यात आले होते. पण तिची सर्वंकषता आज तर अधिकच वाढली आहे. ती " ऑक्टोपस " बनली आहे. या अक्राळविक्राळ संस्थेला सामाजिक आशय मिळाला तर परिवर्तनाची गती फार मोठ्या प्रमाणात वाढू शकेल. या देशात समाज सुधारणेच्या क्षेत्रात ब्रिटिश राज्य-सत्तेने जी दृष्टी व धडाडी दाखविली ती आमच्या राज्यकर्त्यांना दाखविता आलेली नाही. ती दाखवता आली असती तर " समान कायदा " आजपर्यंत पास होऊ शकला असता. उद्याच्या राजकारणाला याचा विचार करावाच लागणार आहे. सर्वच जाती-धर्मातील लोकांना सम पातळीवर आणण्यासाठी, प्रगतीच्या व विकासाच्या समान दिशेत त्यांना घेवून जाण्यासाठी " समान कायद्या "ची व त्याच्या अंमलबजावणीची नितांत आवश्यकता आहे. एकात्म भारताच्या निर्मितीसाठी या गोष्टीची आवश्यकता आहे. त्या साठी ध्येयवादाने भारलेल्या लोकप्रतिनिधींची आवश्यकता आहे. शेली नावाच्या एका प्रसिद्ध सौंदर्यवादी कवीचे एक वाक्य मला या प्रसंगी आठवते. तो म्हणाला होता : "**Poets are the legislators of the world.**" उलट मी म्हणतो : **Legislators should be the poets of the world.**

मला काय अभिप्रेत आहे हे आपल्या लक्षात आलेच असेल. आजच्या आमदार व खासदारांना कवीच्या प्रतिभेचे दान प्राप्त करून घ्यावेच लागेल. त्या शिवाय उद्याच्या एकसंध सामाजिक मनाची निर्मिती करता येणार नाही. त्या शिवाय उद्याच्या एकात्म राष्ट्रीय जीवनाची अपेक्षा करता येणार नाही. आजच्या दुख:दायी वास्तवातून उद्याच्या आनंददायी स्वप्नाकडे भारलेल्या मनांनी आपल्याला वाटचाल करता आली नाही ही वस्तुस्थिती आहे. गांधी आणि नेहरू अशा प्रकारचे "कवी" होते. राजकारणात जाऊन अशा प्रकारचे "स्वप्न" साकार करण्याचा, निदान पाहण्याचा प्रयत्न आमच्या लोकप्रतिनिधींनी करावा असे मला वाटते. सांस्कृतिक परिवर्तनासाठी व समृद्धीसाठी याची फार आवश्यकता आहे. आमचे राजकारण अशा प्रकारच्या "पॅशन" (**Passion**) ने प्रेरित झाले पाहिजे.

महाराष्ट्रासमोर प्रश्न आहे तो दुभंगलेली मने सांधण्याचा–जोडण्याचा. **How to integrate the mind of Maharashtra** ? आजच्या परिस्थिती मध्ये तर हा प्रश्न अतिशय बिकट आणि गुंतागुंतीचा बनलेला आहे. सामाजिक जीवनातल्या संघर्षाला मोठ्या लढाईचे स्वरूप प्राप्त झाले आहे. विशेषत: दलितांवर होणाऱ्या अन्याय–अत्याचारांचे प्रमाण खूप वाढले आहे. दलित समाज आजही बहिष्कृत आहे. शापित आणि पीडित आहे. त्याच्या पदरात जे काही पडले आहे ते हिसकावून परत घेण्याचे प्रयत्न चालू आहेत. माणूस म्हणून जगण्याचे अधिकार त्यांना आम्ही देणार आहोत किंवा नाही ? मराठवाड्यात विद्यापीठाच्या नामांतराच्या प्रश्नावरून दलितांची घरेदारे जाळण्यात आली. त्यामागे कोणती प्रवृती होती ? नामांतराला विरोध करण्याच्या निमित्ताने सवर्ण जातींनी दलितांच्या अस्तित्वावर घाव घातले. दलितांची घरे जाळणाऱ्या लोकांच्या लक्षात

हे आले नाही की दलितांच्या घराबरोबर आम्ही आमची माणुसकी देखील जाळीत आहोत. "माणुसकी" जाळून टाकण्याच्या निर्घृण कृत्यामुळे मराठवाड्याची "अस्मिता" उजळून निघणार असेल तर मला काहीच म्हणावयाचे नाही. प्रश्न मराठवाड्यातील सवर्ण जातींच्या अस्मितेचा नाही; वस्तुतः तो आहे पुरोगामी महाराष्ट्राच्या अस्मितेचा. फुले, आगरकर, शाहू, आंबेडकर आदी महापुरूषांच्या विचारांचा व कार्यांचा वारसा सांगणाऱ्या महाराष्ट्राच्या अस्मितेचा तो प्रश्न आहे. दलितांची घरे जळत असताना या पुरोगामी महाराष्ट्राने नीरोची भूमिका घ्यायची का? नीरोचे वाद्यसंगीत हे अमानुषतेकडे नेणारे संगीत आहे हे मी आपल्याला सांगू इच्छितो. त्याच्या तालावर बेभान होऊन दलितांच्या घरावरची आग थयथय नाचताना मला तरी दिसते आहे. त्याचे हे तांडवनृत्य थांबवायचे कसे?

मित्रहो, सबंध देशच आज विद्वेषाच्या आगीत सापडला आहे. महाराष्ट्रातही ती आग भडकली आहे. ती विझवण्यासाठी कोणत्या पाणवठ्यावरचे पाणी आणावयाचे? आमचे पाणवठे दलितांची घरे जाळणारी आग विझविण्यासाठी थोडेच आहेत? गावकुसा-बाहेरची आग विझविण्यांसाठी हे पाणी मिळणार नाही असे मनुस्मृती आपल्याला ओरडून सांगेल. पण ही आग आपल्याला विझवावीच लागेल. मराठवाड्यातील मित्रांना मी हेच सांगितले. आपल्यालाही मी या ठिकाणी तेच सांगतो आहे. ही आग विझविण्यासाठी आम्हाला पाणी आणावेच लागेल. ते पाणी आणावे लागेल आम्हाला महात्मा फुल्यांच्या हौदातून, ते पाणी आणावे लागेल आम्हाला राजर्षी शाहूंच्या पंचगंगेतून, आणि ते पाणी आणावे लागेल आम्हाला आंबेडकरांच्या स्पर्शाने पूनित झालेल्या महाडच्या चवदार तळ्यातून. आणि या तीन ठिका-णाहून आणलेल्या पाण्यात सोडावी लागेल आम्हाला साने

गुरुजींनी आयुष्यभर ढाळलेल्या अश्रूंची धार ! असे "हे" पाणी "ही" आग विझवू शकेल याचा मला आत्मविश्वास आहे. या पाण्यात संघर्ष, रचना आणि मानवता या तिन्ही गोष्टींची ताकद आहे. उद्याच्या महाराष्ट्राची चिंता बाळगणाऱ्यांनी हे काम आजच करणे आवश्यक आहे. जातीय विद्वेषातून महाराष्ट्राला वाचविणे आवश्यक आहे.

वस्तुतः सर्वप्रकारच्या विषमतेवर आधारलेल्या समाजामध्ये प्रश्नांशिवाय दुसरे काहीच सापडू शकत नाही. त्या प्रश्नांची उत्तरे शोधण्याचा प्रयत्न करणे हे अपरिहार्य असतेच. त्याशिवाय आपल्याला पुढे जाताच येणार नाही. त्यापैकी आर्थिक विकासाचा प्रश्न, अस्पृश्यता निर्मूलनाचा प्रश्न आणि राष्ट्रीय एकात्मतेचा प्रश्न–हे तीन प्रश्न माझ्या दृष्टीने अतिशय महत्वाचे आहेत. राजकारण, समाजकारण व अर्थकारण एकत्रित आल्याशिवाय त्यांची उत्तरे शोधणं कठीण आहे. साठ टक्क्यापेक्षा अधिक लोक या देशात दारिद्र्यरेषे खालचं जीवन जगताहेत; त्यांना दोन वेळच्या जेवणाची शाश्वती हा देश देऊ शकत नाही; दोन वेळच्या जेवण्याचा प्रश्न सोडविण्यासाठी आवश्यक असणाऱ्या कामाची हमी हा देश त्यांना देऊ शकत नाही. लोकसंख्या वाढीचा प्रश्न हा युद्धपातळीवर सोडवण्याचा प्रश्न आहे. आर्थिक विकास कासवाच्या गतीने होऊ शकणार नाही. आर्थिक विकास हा समाजवादी धोरण कठोरपणे राबविल्या शिवाय सामान्य जनतेपर्यंत [illegible] पोचू शकणार नाही. अस्पृश्यता निर्मूलनाचा प्रश्न हा [illegible] प्रश्न मानणे आवश्यक आहे. तो सोडविल्या-शिवाय दलित–दलितेरांमधली दरी आम्हाला बुजविता येणार नाही. अस्पृश्यते विरूद्ध आमचा संघर्ष तीव्र झाला पाहिजे. विसाव्या शतकाच्या अंतापर्यंत अस्पृश्यतेचा अंत झालाच पाहिजे. नसेल तर एकविसाव्या शतकाच्या आगमनाचे स्वागत आम्हाला

हसतमुखाने करणा येणार नाही. राष्ट्रीय एकात्मतेचा प्रश्न देखील सोडवणे आवश्यक आहे धर्मांधता आणि जातीसंघर्ष संपल्याशिवाय राष्ट्रीय एकात्मता अस्तित्वात येवू शकणार नाही.

आजच्या राजकारणाचे आणि समाजकारणाचे प्रमुख उद्दिष्ट सामाजिक पुनर्रचना हे असले पाहिजे. समान उद्दिष्ट असेल तर समान दिशेत समांतरपणे राजकारण आणि समाजकारणाला पुढची वाटचाल करता येऊ शकेल. राजकारण आणि समाजकारण ह्या दोन्ही प्रक्रियांच्या मागे सृजनात्मक प्रेरणा उभ्या कराव्या लागतील. आजच्या राजकारणाने समाजकारणा विषयी नकारात्मक भूमिका घेतली आहे. ती बदलावी लागेल. राजकारण आणि समाजकारण या दोन्हींच्या सामूहिक कृतीतून सांस्कृतिक परिवर्तन घडू शकेल, असे मला वाटते. वास्तविक आम्हाला गरज आहे ती सांस्कृतिक कृतीची. **We need cultural action for cultural change in our country.**

खरेतर एकेकाळी समाजकारणाने महाष्ट्रात फार मोठी आघाडी मारली होती. पण आज समाजकारणाची अवस्था ही शेक्सपिअरने चित्रित केलेल्या किंग लियरच्या अवस्थेसारखी झालेली आहे. राजकारणाच्या दारात त्याला थारा मिळत नाही. अर्थकारणाने त्याच्याकडे पाठ फिरविलेली आहे. साहित्यही त्याची फारशी दखल घेत नाही. ते आमच्या समोर नार्सिससच्या (**narcissus**) भूमिकेत उभे आहे. त्याची ही अवस्था बदलली पाहिजे. आणि ती बदलेल याची मला खात्री आहे. महाराष्ट्राची सृजनशक्ती (**creative power**) संपलेली नाही, हे लक्षात घ्या. ती संपली असती तर या ठिकाणी मुस्लिम समाजाला मुख्य प्रवाहाशी एकरूप करण्याचा संघर्षशाली प्रयत्न झाला नसता. मुस्लिम सत्यशोधक समाजाची स्थापना करून समाज सुधारणेच्या कार्याला

वाहून घेणारा हमीद दलवाई येथे जन्माला आला नसता. " एक गाव, एक पाणवठा " हा जयघोष उच्चारित दलितांसाठी संघर्ष करणारा बाबा आढाव आपल्याला दिसला नसता, आदिवासींच्या जीवनात प्रकाश आणणारी गोदुताई परुळेकर दिसली नसती अनुताई वाघ दिसली नसती, अंबरसींग सुरवंती किंवा जयंतराव पाटील दिसला नसता. बोहरा धर्मगुरूच्या अन्यायाविरुद्ध बंड करणारा असगरअली इंजिनिअर दिसला नसता. कुष्टरोग्यांच्या जीवनात आशेच्या किरणांची उधळण करणारा बाबा आमटया-सारखा महापुरुष दिसला नसता. अनेक युवक संघटना या दिशेत काम करताना आज दिसताहेत. साहित्यात दलित साहित्यासारखी चळवळ आज उभी आहे. नवप्रबोधनाची ही सुचिन्हे आहेत. प्रबोधन खेडयापाडयांपर्यंत जाऊन पोचले पाहिजे. खेडयापाडयां-पर्यंत शिक्षण जाऊन पोचले आहे, पण प्रबोधन पोचले नाही ही माझी खंत आहे.

बंधुभगिनींनो, यापेक्षा आपला अधिक वेळ घेणार नाही. दोन दिवस आपण माझे विचार अतिशय शांतपणे ऐकलेत. आपण मला खूप प्रतिसाद दिला आहे. कराडकरांचा मी ऋणी आहे. माननीय पी. डी. पाटील व त्यांच्या सहकाऱ्यांनी येथे येण्याची मला संधी उपलब्ध करून दिली, त्याबद्दल मी त्यांचा मनापासून आभारी आहे. माननीय यशवंतराव चव्हाणांचा उद्या वाढदिवस आहे. त्यांना दीर्घायुरारोग्य चिंतितो आणि त्यांच्या हातून यापुढेही उदंड देशसेवा घडावी अशी अपेक्षा व्यक्त करतो. धन्यवाद !



००



# 'शेतीचे अर्थशास्त्र व त्यातील दुग्ध व्यवसायाचे स्थान.'

– श्री. भोसले प्रतापराव बाबुराव

महाराष्ट्रातील सुमारे सत्तर टक्के लोक शेतीवर उपजीविका करतात. पण जमा–खर्चाच्या दृष्टीने विचार करता शेतीचे अर्थशास्त्र चांगले राहिलेले नाही. शेतीचा व्यवसाय डोळसपणाने केला पाहिजे. महाराष्ट्रातील खचलेल्या, नामोहरम झालेल्या शेतकऱ्याला जोडधंदा म्हणून दुधाचा उत्तम व्यवसाय आहे.

दूध हे पूर्ण अन्न आहे. समाज समर्थ व आरोग्यसंपन्न होण्यासाठी दुधासारखे दुसरे अन्न नाही. दूध भरपूर मिळण्यासाठी म्हशीपेक्षा गाईंचा वा त्याही मिश्र (क्रॉस केलेल्या) गाईंचा वापर केला पाहिजे. आपल्याच भागातील गाईंवर क्रॉस करून प्रयोग करून दुधाचे उत्पादन वाढविणे योग्य ठरेल. दूध व दुधापासून तयार होणाऱ्या पदार्थांचे बाय प्रॉडक्टस् जास्त प्रमाणात कसे निर्माण करता येतील याचा जाणीवपूर्वक शास्त्रशुद्ध विचार झाला, तर शेतकरी व समाजही समर्थ आणि संपन्न होतील.

# श्री. भोसले प्रतापराव बाबूराव

जन्म : २५ ऑक्टोबर १९३४, भुईंज, जि. सातारा, येथे एका सामान्य शेतकरी कुटुंबात.

व्यवसाय : शेती.

- १९६२ ते ६७ या काळात ते भुईंज ग्रामपंचायतीचे सरपंच.
- सातारा जिल्हा सहकारी जमीन विकास बँकेचे संचालक मंडळाचे ४ वर्षे सदस्य.
- वाई येथील आर्टस् व कॉमर्स कॉलेजच्या जनता शिक्षण संस्थेचे उपाध्यक्ष व विश्वस्त.
- १९६७, १९७२, १९७८, १९८० या चार सार्वत्रिक निवडणुकीत वाई मतदार संघातून कॉंग्रेसचे अधिकृत उमेदवार म्हणून ते प्रचंड मतांनी विधानसभेवर निवडून आले.
- १ ऑगस्ट १९७८ रोजी महाराष्ट्र राज्याचे ग्रामविकास आणि पुनर्वसन खात्याचे राज्यमंत्री म्हणून मंत्रीमंडळात समावेश.
- विधानसभा सदस्य असतांना त्यांनी अंदाज, वन, महाराष्ट्र राज्य स्टेट फार्मिंग कार्पो. महामंडळ, वगैरे अनेकविध समित्यावर काम केले आहे. विधान सभेतील एक तडफदार आमदार म्हणून त्यांची ख्याती आहे.
- वाई तालुक्यातील झालेले धोम धरण आणि धरणामुळे विस्थापित होणाऱ्यांचे पुनर्वसनाचा जटिल प्रश्न त्यांनी अगदी अल्पावधीत सोडविला.

प्र. बा. भोसले.

पत्ता –
मु. पो. भुईंज, ता. वाई
जि. सातारा.

अध्यक्ष, मा. पी. डी. पाटीलसाहेब, आपल्या नगरपालिकेचे उपाध्यक्ष, आजच्या व्याख्यानाच्या निमित्ताने येथे उपस्थित असलेले कऱ्हाडकर सूज्ञ नागरीक बंधू आणि भगिनींनो! पहिल्यांदा पी. डी. पाटीलसाहेबांनी सुचविल्याप्रमाणे, गेल्यावर्षी व्याख्यान-मालेमध्ये झालेल्या भाषणांचा संग्रह करून जे पुस्तक छापण्यात आलेले आहे, त्याचे प्रकाशन झाले असे मी जाहीर करतो.

ज्या पुस्तकाचे प्रकाशन झाले, ज्या थोर महनीय वक्त्यांनी येथे व्याख्याने दिली, त्यांच्या पुस्तकाचा लाभ समाजातल्या जाणत्या आणि सुशिक्षीत अशा वर्गासाठी व्हावा, त्यांनी ते अवघड विषय

मांडण्याचे, जे परिश्रम केले त्याबदल त्यांना धन्यवाद ! आणि या पुस्तकामार्फत त्यांनी दिलेले विचार आपल्या विभागातल्या सर्व कानाकोपऱ्यात पोहोचावेत अशी अपेक्षा व्यक्त करतो.

मित्रहो, मा. यशवंतरावजी चव्हाणसाहेबांच्या वाढदिवसानिमित्ताने, आपण सुरू केलेल्या व्याख्यानमालेचे, मला वाटते, हे सातवे वर्ष. आजची ही व्याख्यानमाला आणि या व्याख्यानमालेमध्ये, माझ्यापूर्वी दोन दिवस दोन वक्त्यांनी भाषणे दिली. आज माझ्याकडे विषय सोपविला आहे, ' शेतीचे अर्थशास्त्र व त्यातील दुग्ध व्यवसायाचे स्थान. ' अर्थात हा विषय माझ्या थोडासा सोयीचा मला वाटला आणि म्हणूनच मी त्यास होय म्हटले. कारण मी काही वक्ता नाही. कोणी चिंतन करणारा नाही. आणि आज तर त्या क्षेत्रातलाही नाही, अशी माझी खरी अवस्था असल्यामुळे, मी व्याख्यान देण्याचे स्वीकारले. व्याख्यान देणारी जी मंडळी असतात, त्या संज्ञेतच मी बसत नसल्यामुळे व्याख्यानाला मी यायचे की नाही हाच खरा प्रश्न होता. परंतु विषय सोयीचा वाटला, म्हणूनच मी धाडस केले आहे. आणि येथे आलो आहे.

महाराष्ट्रामध्ये साधारणतः ६७ ते ६८ टक्के लोक हे शेतीवर आपली उपजीविका करतात. काही शेतीचे मालक म्हणून, काही मजूर म्हणून, काही अल्प–भूधारक म्हणून तर काही गैरहजर राहून शेती करणारे असे लोक यामध्ये मोडतात. पूर्वीच्या काळामध्ये उत्तम शेती, मध्यम व्यापार आणि कनिष्ठ नोकरी अशी म्हण होती. परंतु या बदलत्या परिस्थितीमध्ये उत्तम आणि मध्यम कोणाला म्हणावयाचे हे समाज ठरवील. पण कनिष्ठ शेती अशी मात्र आज परिस्थिती निर्माण झालेली आहे. त्याची कारणे अनेक आहेत. त्याची चर्चा करण्याचे येथे कारण नाही. या

देशामध्ये शास्त्रज्ञ या परिस्थितीतून देशाला बाहेर काढण्याचे प्रयत्न करत आहेत. या देशामध्ये शेतीच्या बाबतीत जरूर काही क्रांतीही घडली आहे. ज्या देशाला धान्यासाठी अनेक देशांच्या दारी जाऊन, भिक्षेची झोळी घेऊन, 'आमच्या देशाच्या माणसांना जगविण्यासाठी तुमच्याकडे जे शिल्लक असेल, जे उपलब्ध असेल व जसे असेल ते धान्य द्या,' म्हणून सांगण्याची पाळी येत होती. मात्र गेल्या दोन वर्षामध्ये या देशात काही धान्य दुसऱ्या देशातही पाठविण्याइतके निर्माण झाले आहे. व काही धान्य दुसऱ्या देशात निर्यातही झाले आहे? ही काय या देशाच्या दृष्टीने कमी महत्वाची गोष्ट आहे. ही कृषीक्रांती झाली. हे झाले देशाच्या दृष्टीने, परंतु व्यक्तिगत शेतकऱ्याच्या दृष्टीने विचार केला, किंवा जर पाचपंन्नास शेतकरी आपण आपल्या समोर घेतले आणि त्यांच्या सर्व परिस्थितीचा विचार केला, तर त्यांची परिस्थिती काही चांगली दिसत नाही. त्यातल्या बहुसंख्य लोकांना विचारले, 'जर तुमचा जमा-खर्च अशा पद्धतीने तुटीचा आहे तर तुम्ही शेती कां करता' तर ते म्हणतात की, 'दुसर काही करता येत नाही म्हणून शेती करतो.' अशा पद्धतीने नाईलाजास्तव शेती करण्यामुळे महाराष्ट्रातल्या बऱ्याच विभागामध्ये शेतीने शेतकऱ्यांना धोका दिला आहे. आणि म्हणूनच शेतीचे अर्थशास्त्र तसे काही फारसे चांगले राहिलेले नाही. याची कारणे अनेक आहेत. वाढती महागाई हे एक कारण. श्रमाची प्रतिष्ठा जेवढी समाजामध्ये असली पाहिजे तेवढी नाही. ती कमी व्हायला लागली आहे. हेही एक कारण आहे. उत्पादनासाठी येणारा जो खर्च आहे, आणि उत्पादन होणारा जो माल आहे, त्याच्यातून मिळणाऱ्या किमतीचा जो प्रश्न आहे, हीही कारणे शेतीच्या तुटीच्या अर्थव्यवस्थेची आहेत.

जर या देशातल्या सुमारे ७० टक्के लोकांना शेतीशिवाय दुसरा

व्यवसायच करणे शक्य नाही, तर नजिकच्या काळामध्ये त्यातून काहीतरी मार्ग शोधण्याची आवश्यकता, तुमच्या आमच्या समोर निर्माण होते. सरकारी पातळीवरून त्यासंबंधी काही प्रयत्न होत आहेत. काही नवनवीन संशोधने होत आहेत. पाटबंधाऱ्यांचे प्रकल्प होत आहेत, पाण्याखाली शेती आणण्याचा प्रयत्न जारीने होत आहेत. पण त्यालाही काही मर्यादा आहेत. पाण्याखाली आलेली जी शेती आहे, तिच्या संदर्भात आज उत्पादनाचा खर्च आणि उत्पादन होणाऱ्या मालाची किंमत, यांचा विचार केला असता आज कुठेही त्यांचा मेळ बसत नाही; अशी ही परिस्थिती आहे. आणि यामुळे आजच्या महाराष्ट्रातील सर्व-सामान्य शेतकऱ्यांची जी आर्थिक अवस्था आहे, ती मोठी चिंतनीय आहे. एखाद्या गावातील १०० शेतकरी जर आपण तपासले, मग ते गाव संपन्न असो, बागाईत असो, मध्यम प्रतीचे असो नाहीतर आणखी दुष्काळी भागातील असो; त्या शंभर शेतकऱ्यापैकी ८० टक्क्यांपेक्षा जास्त शेतकऱ्यांच्या '७।१२' वर आता लिहायला जागा नाही. त्या[illegible]ी एक सन्माननीय पदवी आहे, 'थकबाकीदार'! या [illegible]तून हा ८० टक्के शेतकरी सुटलेला नाही. तुम्ही कोणतही गाव पाहिल तरी अशा परिस्थिती-मध्ये एकीकडे व्याजाचा बोजा वाढतो आहे, शेतमालाच्या किंमती कमी व्हायला लागल्या आहेत, उत्पादनाचा खर्च वाढतो आहे, कारण खतांच्या किंमती एकसारख्या वाढवाव्या लागतात. पेट्रोलियम्स आणि तज्जन्य पदार्थापासून निर्माण होणारी रासा-यनिय खते दिवसे दिवस महाग होत आहेत. शेतीच्या उत्पादनाचा भांडवली खर्च भरमसाठ वाढत आहे. त्यामुळे सामान्य शेतकऱ्याला शेती करणे परवडत नाही, अशी खरी अवस्था आहे. त्यासाठी खताचा प्रश्न सोडविणे गरजेचे आहे. तो प्रश्न सोडविताना शेतकऱ्यांना जर एखादा पूरक धंदा मिळाला, तर तोही त्यांच्या हितावह ठरणारा आहे. अशी ही शेतकऱ्यांची अवस्था बिकट

बनत चालली आहे, तिला जर दुसरा पर्यायच नसेल तर त्यासाठी काही मार्ग शोधण्याची आवश्यकता समाज म्हणून, सरकार म्हणून, समाजातील जाणते लोक म्हणून, किंवा समाज शिक्षणाच्या संस्था म्हणून, तुम्हा-आम्हाला ही जबाबदारी टाळता येणार नाही. म्हणून, शेतीला कुठले तरी जोड धंदे उपलब्ध करून दिले पाहिजेत. शेतकऱ्यांना जो मोकळा वेळ मिळतो, तो वाचविला पाहिजे. त्याला कुठेतरी काम करायला लावले पाहिजे. त्या मोकळ्या वेळामध्ये उत्पन्न म्हणून त्याच्या प्रपंचाला उपयोगी पडणारे, काही तरी मिळाले पाहिजे. अशा प्रकारचा विचार करण्याची आवश्यकता तुमच्या-आमच्या समोर निर्माण झालेली आहे.

याबाबतीत मी खूप विचार केला, कारण मी एक तपभर शेती केलेला माणूस आहे. म्हणून शेतीच्या संदर्भात येणाऱ्या अडचणी, एक अभ्यासक म्हणून शेतीच्या व्यवसायाकडे मी पाहिले आहे. ऐन उमेदीमध्ये शेती केली. शेतीचा व्यवसाय हा डोळसपणाने केला पाहिजे. त्याला एखादा पूरक धंदा असला पाहिजे. असे माझे मत बनले. आणि मग पूरक धंदा कोणता असला पाहिजे, असा विचार करण्यासाठी मी या देशामध्ये, आणि जेथे जेथे शेती संशोधन केंद्रे व शेती संदर्भातल्या शेतकऱ्यांच्या जोड धंद्याला पूरक अशा अनेक ठिकाणी ज्या योजना चालू आहेत, तेथे तेथे जाण्याचा प्रयत्न त्यावेळी केला. इज्जतनगर पासून बंगलोरपर्यंत सर्व शेती आणि शेतीचे पूरक धंदे असणारी क्षेत्रे पाहिली. प्रथम अनेक प्रांतांतील विद्यापीठे पाहिली. कृषिविद्यापीठातून होणारे संशोधन पाहिले. अनेक ठिकाणच्या प्रगत शेतकऱ्यांचे शेतीफार्म्स पाहण्याचा प्रयत्न केला. परंतु बोटावर मोजण्या इतक्या दोन पाच लोकांची शेती समर्थपणे चाललेली आहे, असे दिसले. आणि म्हणून पुन्हा नुसती शेती पहाण्याऐवजी, मी नंतर शेतीच्या पूरक धंद्यांची जी

निरनिराळी केन्द्रे आहेत ती, मग सरकारी क्षेत्रातील असोत, सहकारी क्षेत्रातली असोत किंवा कोणा उद्योगपतीची असोत, ती पहाण्याचा प्रयत्न केला. आणि त्यानंतर माझे असे मत बनले आहे की, आपल्या महाराष्ट्रामधल्या शेतकऱ्यांना जोड धंदा म्हणून दुधाचा व्यवसाय देण्याशिवाय दुसरा पर्याय नाही. आणि तोच एक उत्तम व्यवसाय आहे, असे माझ्यासारख्या शेतकऱ्याचे मत बनले आहे.

दुधाचा धंदा हा खरोखर 'डेअरी' साठी म्हणून आहे. या धंद्यासाठी जर शहाणा माणूस असेल, शिकलेला माणूस असेल तर उत्तम. तो आणखी जाणतेपणाने, शहाणपणाने, थोडा शास्त्रीयदृष्टया विचार करून हा व्यवसाय करू शकतो. परंतु तसे नसेल तर अगदी अडाणी माणूससुद्धा, आंगठेबहाद्दर माणूससुद्धा, मग पुरुष असो वा स्त्री असो, ती सुद्धा दुधाचा व्यवसाय करू शकते. असे एक सिद्ध झालेले आहे की, जनावरे जोपासणे व दूध उत्पादन करणे, ही आपल्याकडे पूर्वपरंपरेने चालत आलेली व्यावसायीक बाब आहे, तो पूर्वापार धंदा आहे. या धंद्याकडे पाहताना त्याकडे आपण कोणत्या पद्धतीने पहाणार आहोत, मोकळा वेळ आहे म्हणून चार म्हशी पाळावयाच्या, की दुसरं काही काम नाही म्हणून दोन गायी पाळायच्या, अशाप्रकारे या व्यवसायाकडे पाहून आज चालणार नाही. त्याला थोडासा शास्त्रीय दृष्टीकोण स्वीकारून, नव्या नव्या जातींचा शोध घेऊन, नवनवीन प्रकारचे संकर घडवून, त्या व्यवसायामध्ये उतरण्याची आवश्यकता आहे. मी असेही पाहिले आहे की, अनेक पदवीधर महाराष्ट्रामध्ये चांगल्या पद्धतीने डेअरी धंदा करू शकतात. त्यात ते यशस्वी होऊ शकतात. त्याविषयीच्या शास्त्रीय चर्चामध्ये ते बोलू शकतात. चांगल्या पद्धतीने या क्षेत्रात यश संपादन करून आपले जीवन सुखी करण्याचा प्रयत्न करतात. हे मी पाच पंचवीस

ठिकाणी पाहिले आहे. म्हणून ह्या देशाची, महाराष्ट्रातल्या सामान्य माणसाची, ही जी मूलभूत गरज आहे, ती पूर्ण केली पाहिजे. दूध हे एक पूरक अन्न आहे. ते तुम्ही कितीही उत्पादन केले तरी, त्याला काही गिऱ्हाईक मिळाले नाही, त्याचा काही खप झाला नाही, उठाव झाला नाही अशी काही परिस्थिती येणार नाही. आजपर्यंत दुधाचा उठाव कमी होता, मागणी कमी होती, त्याचे कारण उत्पादन कमी होते. सामान्य माणसाला अजूनही दूध परवडत नाही, अशी परिस्थिती आहे. अनेकांच्या घरामध्ये चहा पांढरा करण्यापुरतेच दूध वापरले जाते. काही बड्या-ज्यांची सांपत्तिक स्थिती चांगली आहे अशी कुटुंबेच आज दुधाचा जास्त वापर करू शकतात. म्हणून दुधाचा खप वाढविणे गरजेचे ठरते. ज्यामुळे नव्या पिढीमध्ये अेक सामर्थ्य येते, शारिरिक क्षमता वाढते, बुद्धी सतेज होते, अशा प्रकारचा दृष्टीकोन या व्यवसायाच्या वाढीमुळे, निर्मितीमुळे समाजासमोर येण्याची शक्यता आहे. आणि म्हणून दुग्ध-व्यवसायाकडे पहाताना, या दोन्ही दृष्टीकोनांनी पहाण्याचा प्रयत्न आपण केला पाहिजे.

मी मघाशी सुरुवातीलाच म्हणालो, त्या प्रमाणे या व्यवसायाकडे थोडे शास्त्रीय दृष्टीनेही पाहिले पाहिजे. मी या संबंध देशामध्ये या व्यवसायाच्या निमित्ताने फिरलो. हरियानामधील कर्नालचे जे नॅशनल डेअरी रिसर्च सेंटर आहे, तिथपासून ते बंगलोरच्या रिसर्च सेंटर पर्यन्त जाऊन आलो. राजस्थानमध्ये सुरतगड येथे जो 'थरपारकर' हा फार्म आहे, त्यासही मी भेट दिली आहे. इज्जतनगरला फक्त 'थरपारकर' या एका जातीच्या गाईच्या डेव्हलपमेंटचा प्रयत्न केला जातो. तेच जर तुम्ही हरियानामध्ये गेला, तर तेथील जी मूळची – पाकिस्तान आणि हिंदुस्थान होण्यापूर्वीची 'साहिवल' नावाची एक चांगली जात होती; त्या जातीवर संकर करण्याचे हरियानामध्ये प्रयत्न केले जात

आहेत. त्याच्यासाठी ' रेड – डेन ' ' होस्टन – फ्रिजन ' किंवा ' जर्सी ' अशा प्रकारच्या वळूंचे सिमेन देण्याचा प्रयत्न, तेथे केला जातो. त्यांच्यापासून क्रॉस करून, त्याची होणारी ' प्रोजनी ' डेव्हलप करण्याचा प्रयत्न तेथे केला जातो.

परंतु केवळ एवढ्यावरच आपल्याला समाधान मानता येणार नाही. रिसर्च सेंटरमध्ये चाललेले रिसर्च हे शेतकऱ्यांपर्यंत त्याचपद्धतीने शेतकऱ्यांपर्यंत पोहोचतील, अशी काही परिस्थिती नाही. आणि म्हणून मी या व्यवसायाकडे यादृष्टीने पहातो की, कोणत्या रिसर्च सेंटरमध्ये कोणत्या पद्धतीने रिसर्च चाललेले आहे, त्यापेक्षा, आमच्या या विभागामध्ये कोणत्या पद्धतीने आम्हाला जावे लागेल? कोणत्या पद्धतीने या व्यवसायाचा अभ्यास करावा लागेल? कोणत्या पद्धतीच्या जनावरांचा येथे विकास करावा लागेल? ह्या प्रश्नांचा विचार होण्याची आज आवश्यकता आहे. आज आपण पहातो की या देशामध्ये म्हैशीच्या दुधाचा अजून जास्त उठाव आहे. आपणासर्वांचाच कल म्हैसीचे दूध खाण्याकडे व म्हणून निर्माण करण्याकडेही आहे. जगामध्ये किती देश म्हैसीचे दूध वापरतात वा निर्माण करतात? जगाच्या पाठीवर दोन-तीन देश आहेत, की ज्या देशांमध्ये फक्त म्हैसींचेच दूध निर्माण केले जाते, आणि वापरलेही जाते. याचे कारण काय? मी एकदा विनोदाने सहज म्हटले होते की, म्हैस ही तशी ' सेंसेटिव्ह ' नाही. ती गायी इतकी तर मुळीच सेंसेटिव्ह नाही, तिचा 'ड्राय पिरियड' (भाकडकाळ) ज्यास्तकाळ रहाण्याचा आहे. ती सेंसेटिव्ह नाही, म्हणून तिला वात्सल्य नाही आणि वात्सल्य नाही, म्हणून तिला जास्त दूध नाही. तिचा जो ड्राय पिरियड आहे (भाकडकाळ) तो जास्त आहे. हे म्हैसीच्या बाबतीतले अेक महत्वाचे कारण. तिच्या बाबतीतले दुसरे अेक महत्वाचे कारण म्हणजे, म्हैसीच्या दुधामध्ये किंवा तिच्या सेकंड जनरेशनमध्ये

फर्स्ट जनरेशन पेक्षा जास्त दुधाची वाढ होऊ शकत नाही, तिला क्रॉस करता येत नाही. सजातीय वळू पासूनच निर्मिती करावी लागते. आणि सजातीय वळू पासून निर्मिती केल्यानंतर, दुधाच्या वाढीला काही मर्यादा आहेत, हे सिद्ध झाले आहे.

म्हणून या देशामध्ये आपण जे म्हैसीवर अवलंबून आहोत, ते म्हैसीवर अवलंबून न राहता, आपणास गायीचे दूध वाढविण्याचा आणि गायींच्या जातींचा विकास करण्याचा प्रयत्न करावा लागेल. आणि त्यासाठी त्यांच्यातीलच काही मूलभूत प्रश्न शोधून, कोणत्या पद्धतीने त्या क्षेत्रात जावयाचे, याचा विचार करावा लागेल. मी पाहिले आहे की, आपल्या देशामध्ये दोन तीन प्रकारच्या गायी, या थोडं बरं दूध देतात. त्यामध्ये एक 'थरपारकर' दुसरी 'सायवाल' तिसरी 'गीर' चवथी 'राठी' आणि मग आपल्या विभागामध्ये आढळणाऱ्या, होणाऱ्या ज्या गायी आहेत, त्यामध्ये माजी पशुसंवर्धन खात्याचे संचालक, मुन्शी श्री. अब्दुल रहेमान, यांनी परिश्रमाने संशोधन करून निर्माण केलेली 'देवणी' हा पाचवी जात जरा बरी आहे. आपल्याकडील गायी पहिल्या चार गायींच्या तुलनेने तशा कमीच दूध देणाऱ्या आहेत. 'सायवाल' ही जात तशी पाकिस्तानमध्ये गेली आहे. त्याचा काही भाग पंजाबला लागून आहे. ज्या ट्रॅकमध्ये (पाकिस्तानातील) 'सायवाल' जातीची गाय होती, आता काही भाग जो भारतामध्ये राहिला आहे, तेथे तेवढी ती आज उपलब्ध आहे. त्याचप्रमाणे 'थरपारकर' नावाचा जो डिस्ट्रिक्ट सिंधला लागून आहे, त्या थरपारकर डिस्ट्रिक्टमध्येच 'थरपारकर' गायी होत्या. राजस्थानच्या बॉर्डरवरती त्या आजही उपलब्ध होतात, पण फार कमी प्रमाणात. चोरट्या आलेल्या तरी मिळतात किंवा जी गावे आपल्या विभागाकडे राहिली तेथे, एकमेकांची नाती-गोती असलेल्या ठिकाणी गेलेल्या गायी,

तेवढ्याच पहावयास मिळतात. जोधपूरच्या मार्केटमध्ये त्या कधी कधी पहावयास मिळतात. या दोन्हीही महत्वाच्या जाती पाकिस्तानमध्ये गेल्या आहेत. तिसरी 'गीर' ही जात राजस्थानच्या काही जिल्ह्यांमध्ये मोठ्या प्रमाणावर आहे. परंतु तिचा ड्राय पिरियड म्हणजे भाकड काळ, या अगोदर सांगितलेल्या दोन्ही जातींपेक्षा जास्त आहे चवथी जी गायीची जात आहे, ती म्हणजे 'राठी'. ती अतिशय काटक, कणखर कष्टाळू व कोणत्याही नैसर्गिक परिस्थितीमध्ये टिकणारी अशी गाय आहे. ही राठी गाय बिकानेर नावाच्या संस्थानच्या आसपासच्या प्रदेशात उपलब्ध आहे. तिला जरी दिवसाआड पाणी मिळाले, तरी ती टिकाव धरते. कारण त्या भागामध्ये दोन-दोन, तीन-तीन वर्षे पाऊसच पडत नाही. जनावरांना पाणी पाजावयाचे म्हटले तरी पाच-पाच, सहा-सहा मैल जनावरे न्यावी लागतात. तेव्हा पाणी मिळते. (पाजता येते). अशा प्रकारच्या अगदी प्रतिकूल परिस्थितीमध्ये टिकणारी ही जात आहे. या चारही चांगल्या गायींचा विचार केला असता, त्यामध्ये 'राठी'चा शेवटचा नंबर लागतो. 'गीर' चा तिसरा नंबर लागतो. परंतु 'राठी' आणि 'गीर' या दोन्ही गायी आपल्या इकडे आणायला बंधन आहे. राजस्थान आणि गुजराथच्या काही भागामध्ये या दोन्ही जातीच्या गायी मिळतात. पण आपल्याकडे आणायला अवघड जातात. 'थरपारकर' आणि 'सायवाल' ह्यांची मी अगोदरच कथा सांगितली आहे. त्या दोन्ही जाती पाकिस्तानमध्ये गेल्या आहेत. आणि ह्या दोन आणता येत नाहीत. अशी परिस्थिती आहे.

अशा वेळी तुमच्या आमच्या समोर कोणता पर्याय राहतो? पर्याय एकच राहतो व तो म्हणजे, आपल्या विभागातील काही चांगल्या जातीच्या, चांगल्या बांध्याच्या चांगल्या कांतीच्या, थोड्याशा सकस प्रकृतीच्या, ज्यांची जीन थोडीसी सॉफ्ट आहे, त्या शोधून

काढल्या पाहिजे. अशा गायीमध्ये दूध देण्याचे जे कॅरेक्टर आहे, ते तपासावे लागते. ते कॅरेक्टर कशावरून पहावयाचे, तर ते त्या गाईचा बांधा, तिची कातडी, इत्यादी गोष्टींशी गायीच्या दूध देण्याचा, म्हणजे कॅरेक्टरचा संबंध असतो. म्हणून अशा प्रकारच्या गायी शोधून त्यावर आपणाला क्रॉस करून घ्यावा लागणार आहे. अशा गायीवर क्रॉस करताना, कोणत्या जातीच्या वळूचा क्रॉस करावयाचा, याचाही विचार करावा लागणार आहे. क्रॉस केल्यानंतर त्यांच्यामध्ये पन्नास टक्के गायी आणि पन्नास टक्के खोंड होणार आहेत, हे गृहीत धरले पाहिजे. पन्नास टक्के मेल आणि पन्नास टक्के फिमेल जसे माणसांमध्ये आहे, तसेच जनावरांमध्येही आहे. एखादा भाग्यवान मिळतो की, त्याला सगळेच मुलगे होतात व एखादा दुर्दैवी असतो की, त्याला सगळ्याच मुली होतात! परंतु गायींच्या बाबतीमध्ये ज्याच्या गायीला जास्त कालवडी झाल्या, तो खरा भाग्यवान! पण असे नेमके त्या क्षेत्रामध्येही होत नाही. आणि त्यामुळे पन्नास टक्के गायी होणार व पन्नास टक्के खोंड होणार हे गृहीत धरून, आपण त्या कार्यक्रमाकडे वळले पाहिजे. आपणास हे कळत असताना सगळे शास्त्रीयदृष्टीकोन स्वीकारून कोणत्या जातीपासून कोणती पैदास केली पाहिजे, यामध्ये नुसते ज्यापासून क्रॉस करावयाचे जे फौंडेशन मानावयाचे, तो वळूच महत्वाचा नसून त्याबाबतीत गाय कोणती आहे, हेही महत्वाचे ठरते. याक्षेत्रामधले जे काही जाणकार लोक आहेत, त्यांच्यामध्ये याबाबतीत अजूनही मतभेद आहेत. ते नेहमी सांगतात की, 'वळू'ची कॅरेक्टर्स पाहिली पाहिजेत. गायीची कॅरेक्टर्स पहाण्याची गरज नाही. ती कोणत्याही निकशाची असली तरी चालेल. मात्र काही मंडळी म्हणतात की, 'गायीमधले चांगले गुण हे सुद्धा विचारात घेतले पाहिजेत.' विशेषतः आपण शेतीमध्ये पहातोच की, एखाद्या सकस जमिनीमध्ये हायब्रीडचा एखाद्या वाण आपण केला व तोच वाण

मध्यम प्रतीच्या व हलक्या प्रतीच्या जमिनीमध्ये केला, तर त्याचा उतार सर्वच जमिनीमध्ये सारखा मिळतो असे नाही. बियाणे सारखे असले तरीही ते शक्य होत नाही. आणि तोच निकश याही क्षेत्रामध्ये – या क्रॉस ब्रिडींगच्या क्षेत्रामध्ये मादी ही कोणत्या तरी निकशावर पाहिली पाहिजे, असा विचार करण्याची आवश्यकता आहे. मात्र अजून तज्ञ मंडळी या मुद्याशी सहमत व्हायला तयार नाहीत.

तज्ञ मंडळी या विषयावर सहमत होवोत अथवा न होवोत, पण आपणाला मात्र असा विचार करावा लागेल की, या बाबीमध्ये प्रयोगासाठी सूट होणारी गाय आणि तिच्यापासून होणारी "प्रोजनि" तिच्यामध्ये काही चांगले गुण, काही चांगले कॅरेक्टर्स आले पाहिजेत. आणि ते येण्यासाठी आपणाला असे प्रयोग करावे लागतील की, याच विभागामध्ये मिळणाऱ्या चांगल्या गायी शोधून, त्या अेकत्र आणून कोणत्यातरी तज्ञ जाणत्याकडून, कोणत्या गायीवर कोणता क्रॉस केला तर, त्याच्या पासून आम्हाला अधिक फायदा होईल, याचा विचार करणे गरजेचे आहे. ग्रामीण भागामध्ये जेथे शेतीप्रधान वसती आहे, जेथे शेतकरी लोक राहातात, शेतीशी ज्यांचे नाते आहे, अशा मंडळीनी या क्षेत्रामध्ये अुतरायला काहीच हरकत नाही. मग ते कऱ्हाडमध्ये राहोत, नाहीतर आणखी लहानशा शेजारच्या खेड्यामध्ये राहोत कोणत्याही ठिकाणी हा धंदा होऊ शकतो, जेथे जवळच शेती आहे, चाऱ्याचा प्रश्न सोपा आहे, पाणीही उपलब्ध आहे आणि कष्ट करण्याची मानसिक तयारी आहे, अशा दोन-चार गोष्टी असल्यानंतर, आपणाला या व्यवसायाकडे वळावयाला काहीच हरकत नाही.

याठिकाणी मी मुद्दाम माझा अनुभव सांगतो की, मी हा विचार

करून दुग्ध व्यवसाय करावयाचा ठरवून, १२–१४ वर्षापूर्वी तिकडे वळलो आणि ठरवून टाकले की, आपण म्हैसी पाळावयाच्या. तेव्हा मी या देशातल्या सगळ्या चांगल्या बाजारपेठा पहाण्याचा प्रयत्न केला. कोठे चांगली म्हैस मिळते, तेथे गेलो. मिरज–सांगलीकडचा सगळा भाग पाहिला. हरियाना मधील 'रोहटक' येथील, जगातील म्हैसीचे एक उत्तम मार्केट समजल्या जाणाऱ्या ठिकाणी गेलो. आणि तीस-पस्तीस म्हैसी आणल्या. मी आणलेल्या म्हैसी चांगल्या प्रतीच्या होत्या. त्या दूधही चांगल्या देत, शिवाय व्यवसाय म्हणून मी या क्षेत्राकडे वळलो होतो. तेव्हा माझ्या असे लक्षात आले की, म्हैसीचा धंदा (दुग्धव्यवसाय) हा आजच्या कळामध्ये किफायतशीर ठरत नाही. म्हैसीला जेवढा खर्च येतो तेवढाच खर्च, जर आम्ही गायीसाठी केला तर, ती अधिक किफायतशीर ठरते. गायीवर क्रॉस होऊ शकतो, गाय आणि म्हैस यांच्यातील ड्राय पिरियड (भाकड काळ) मध्ये फरक आहे. तर मग आम्ही शेतकऱ्यांनी, म्हैसी ऐवजी गायी पाळण्याचा व्यवसाय कां करू नये? गायींवर क्रॉस [illegible] नव्या नव्या जातीच्या गायी निर्माण करण्याचा प्रयत्न [illegible] केला पाहिजे अशा विचाराप्रत मी आलो.

मी हे पहाताना अनेक शेतकऱ्यांकडे गेलो. अनेक रिसर्च सेंटरमध्ये गेलो, सरकारी फार्म्समध्ये गेलो आणि तेथे बारकाईने सर्व गोष्टींचे निरिक्षण केले. तेथे असे दिसले की, म्हैसीला जर तुम्ही पाच रुपयांचे खाद्य घातले तर, ती काही काळ पाच रुपयाऐवजी सात रुपयांचे दूध देते. पण ती सतत–सर्वकाळ दूध देत नाही. ते तिला शक्य नसते, त्यामुळे खायला घातलेले अन्न हे तिला जगविण्यासाठी उपयोगी ठरते. त्याचा दूध वाढविण्यासाठी उपयोग होत नाही. परंतु क्रॉस केलेली गाय दूध देत असेल तर ते या म्हैसीपेक्षा कमी असले तरी, ती सदासर्वकाळ दूध देऊ शकते.

आपण एखाद्या चक्कीवर गेलो. जर पायलीभर दळण दळले तर, पायलीचेच पीठ खाली पडते. तसे त्या दुभत्या गायीला तुम्ही ज्या प्रमाणात चारा द्याल त्या प्रमाणात तिच्या दुधामध्ये वाढ होऊ शकते. हें म्हैसीच्या बाबतीत होत नाही. तसेच क्रॉस न केलेल्या गायीच्या बाबतीतही ते आढळत नाही. यातली दुसरी एक महत्वाची गोष्ट म्हणजे, क्रॉस केलेली जनावरे व्याल्यानंतर तीस ते शंभर दिवसात पुन्हा हिटवर येतात. ती जर पुन्हा कव्हर झाली तर, ती पुन्हा आटण्यापूर्वी वितात. त्यामुळे विण्यापूर्वीचा जो अगदी शेवटचा महिना-दीड महिना असतो; तेवढयाच काळापुरते, तिचे दूध सोडून द्यावे लागते. एवढा काळ सोडला तर, क्रॉस केलेली गायीची आयुष्यभर दूध देण्याची क्रीया चालू असते. शिवाय क्रॉस केलेली गाय व क्रॉस न केलेली गाय, यांची तुलना करता सारख्याच आयुर्मानामध्ये क्रॉस केलेली गाय, क्रॉस न केलेल्या गायीपेक्षा अल्पकाळ भाकड राहते. उलट क्रॉस न केलेली गाय दीर्घकाल भाकड राहते. याचे प्रमाण तिपटीपेक्षा जास्त असते. दोन्ही गायींना खावयाला मात्र तेवढेच लागते. त्यांच्यासाठी दिलेली किंमत, त्याच्यावरचे बँकेचे व्याज द्यावेच लागते. ते काही कोणाला सोडत नाहीत. म्हणजे जास्त दूध देणाऱ्या गायीसाठी जर आम्ही कर्ज काढले तर, तिच्यासाठी बारा टक्के व्याज आणि दूध न देणाऱ्या गायीसाठी, भाकडकाळ जास्त असलेल्या गायीसाठी, काही कमी व्याज अशी मात्र परिस्थिती नाही. दोन्हीसाठी सारखेच कर्ज व सारखेच व्याज भरावे लागते. त्यांच्यासाठी गोठाही सारखाच बांधावा लागतो. दोन वेळेला पाणीही पाजावे लागते. श्रम सारखेच पडतात, फक्त दावणीला नगाला नग असतो. दुधाचा मात्र पत्ता नसतो. म्हणून क्रॉस न केलेली गाय ही आर्थिकदृष्टया परवडत नाही. म्हणून दुधाचा व्यवसाय करताना आपणाला कोणती गाय परवडेल हाही विचार करावा लागतो.

मात्र शेतीसाठी आपणाला सजातीय जनावरांची गरज असते. कारण सजातीय वळूपासून निर्माण झालेले बैल जसे परवडतात, तसे विजातीयपासून निर्माण झालेले बैल वा जनावरांच्या जाती परवडत नाहीत. विशेषत: गायीच्या बाबतीमध्ये यादृष्टीने आणखी एक अडचण आहे, तीही लक्षात ठेवली पाहिजे. क्रॉस केल्लेली गाय फार 'सेन्सेटिव्ह' असते. ती रोगाला बळी पडण्याची लवकर शक्यता असते. एवढी गोष्ट याबाबतीत अडचणीची आहे. ज्याप्रमाणे आपण आपल्या जवळची कुऱ्हाड ओसरीला किंवा दरवाज्याच्या बाजूला कोठेही ठेवतो, पण आपल्याकडे तलवार असेल तर ती म्यान करून ठेवावी लागते. याचे कारण तिची धार तेज असते. ती एका घावात दोन तुकडे करू शकेल. पण ती सांभाळण्यासाठी तिला कव्हर ठेवावे लागते, म्यान करावी लागते. कारण नाजूकता आणि इफिशिएन्सी यांचा फार जवळचा संबंध आहे. इफिसिएन्सी ज्याच्या जवळ असते, त्याच्या जवळ नाजूकता असते, म्हणून तिला सांभाळण्याची जबाबदारीही वाढते. एखादी चांगली कुऱ्हाड जी क्रिया करेल, तीच क्रिया तलवार करेल, परंतु कुऱ्हाड आणि तलवार ठेवताना, तुम्ही त्यांना सारख्याच पद्धतीने ठेवू शकत नाही. याचपद्धतीने ह्या दोन गायी आहेत असे आपण समजलो तरी चालेल. सजातीय जातीपासून निर्माण झालेली एखादी गाय, तिला सांभाळण्यासाठी पडणारे कष्ट, त्यासाठी वापरलेली पद्धती, तिला द्यावा लागणारा खुराक आणि याविजातीय जातीपासून किंवा कॉस केलेली एखादी गाय असेल तर, तिला सांभाळण्याची पद्धती, तिला द्यावा लागणारा खुराक व औषधोपचार यामध्ये खूप तफावत आहे. हा मुद्दा याबाबतीत अत्यंत महत्वाचा आहे. दुसरे असे की विजातीय जातीपासून मिळणारा बैल आपणास शेतीसाठी परवडत नाही. कारण क्रॉस केलेली जनावरे जशी जास्त खातात तशीच त्यांची क्रय शक्ती ही मर्यादित असते, कुंटीत होते. आपण आपली साधी

ज्वारी व हायब्रीड ज्वारीची जर तुलना केली तर, असे दिसते की हायब्रीड ज्वारीच्या व्हरायटीला खत जास्त लागते, खायला जास्त लागते. अनेक रोग पडतात शिवाय दुसऱ्या पिकाच्या वेळेला जमीन थोडी निकस बनण्याचीही शक्यता असते. तिच अवस्था या क्रॉस केलेल्या जनावरांच्या बाबतीमध्ये आढळते. ती जरूर फायद्याची आहे. परंतु काही धोकेही आहेत, तोटेही आहेत. म्हणून मी आपणाला मघाशी सांगितले की, ही जात थोडीसी सेंसेटिव्ह असते. ती तशी असल्यामुळे आम्हाला तिच्या पासूनचा बैल शेतीला परवडत नाही. एखादा त्यातला बैल चांगला चालत असेल, परंतु सर्रास शेतीसाठी क्रॉस केलेली जनावरे वापरणे परवडणारे नाही.

बरेच ठिकाणी कोणीतरी व्याख्याने देतात. आमच्यासारखे लोक येऊन सांगतात आणि काही तरुण मित्र त्यांच्या नादी लागून या व्यवसायाकडे वळतात. कोणी बंगलोरला जातात. आणखी कोठेतरी जातात आणि १०० टक्के परदेशी वळूचे रक्त असलेली गाय घेऊन येतात. त्यांचे अनुभव तेवढे बरोबर नाहीत. त्या गायी ट्रकमधून इकडे आणतात. आणल्याबरोबर येथे तिला निमोनिया होतो, दुसरा कुठला तरी रोग होतो, हवामानाचाही तिच्यावर परिणाम होतो. या क्षेत्रामध्ये काम करू इच्छिणाऱ्यांनी व करणाऱ्यांनी याचाही विचार केलाच पाहिजे. ही बाब अतिशय महत्वाची आहे. जसे तुमच्या गावामध्ये जन्माला आलेला माणूस, मुलगा वा मुलगी किंवा जनावरे, त्या वातावरणामध्ये ॲडजस्ट होतात; तसे बाहेरून आलेल्या माणसाला वा जनावराला नवीन परिस्थिती हवामान पचेलच किंवा सूट होईलच असे नाही. म्हणून या क्षेत्रामध्ये काम करणाऱ्या लोकांना हेही सांगितले पाहिजे की आपण गायी आपल्या येथल्याच घेतल्या पाहिजेत. त्यासाठी परदेशी वळूचे सिमेन घेऊन त्या क्रॉस केल्या पाहिजेत.

आपल्या येथेच क्रॉस गायी कशा निर्माण होतील याचा प्रयत्न केला पाहिजे. विशेषतः पन्नास ते पंचाहत्तर टक्क्यांपर्यंत वळूचे रक्त त्यांच्यामध्ये कसे येईल असा प्रयत्न करावा लागतो. कदाचित आपण शंभर टक्के रक्ताच्या गायी येथे आणण्याचा प्रयत्न केला किंवा वाढविण्याचा प्रयत्न केला तर त्या रोगाला लवकर बळी पडतात. त्या जास्त सेंसेटिव्ह असतात म्हणून त्यांची देखभालही जास्त काळजीने करावी लागते व त्यामध्येच आपली खूप शक्ती खर्च होते. म्हणून आपल्या या नैसर्गिक परिस्थितीमध्ये निभाऊन निघतील, हवामानाशी अनुरूप ठरतील, अशाच जाती निर्माण करण्याचा प्रयत्न केला पाहिजे. याबाबतीत इतरही काही महत्वाच्या अडचणी आहेत. त्याही मी मुद्दाम आपणास सांगणार आहे.

आपल्या देशात बऱ्याच ठिकाणी आज आपण सरकारच्या मदतीने केन्द्रे चालवितो. एड् सेंटर चालवितो. आर्टिफिसीयल 'इन्सिमिनेशन' सेंटर चालवितो किंवा फ्रेजन्स सिमेन–गोठविलेले विर्य काही ठिकाणी मिळते, उरूळीकांचनची श्री. मनीभाई देसाई यांची जी संस्था आहे, तिच्या मार्फतही काही ठिकाणी त्यांची केंद्र चालविली जातात. मात्र अनुभव असा येतो की, कोणत्या गायीला कोणत्या वळूचा क्रॉस करावा याचे ज्ञान नसल्यामुळे, त्यामध्ये अनेक चुका होतात. शेतकऱ्यांच्यामध्ये अजूनही एक प्रवृत्ती आहे की, ते अगोदर गाय बैलाकडूनच कव्हर झाली पाहिजे असा प्रयत्न करतात. ती चार–दोन वेळा उलटली की, पुन्हा प्रयत्न होतो तो म्हणजे. 'आता डॉक्टरांची परीक्षा बघू' म्हणून. आणि मग तेथेही फारसे चांगले अनुभव येतात असे नाही. मी एका केंद्राचा अभ्यासक म्हणून मुद्दाम त्या केंद्रावर जात होतो. तेथे मी पाहिले की, रिपिटेशनचे परसेंटेज फार मोठे होते. किती असावे असे तुम्हाला वाटते? त्या केंद्रावर रिपिटेशनचे

परसेंटेज सुमारे सत्तेचाळीस टक्के होते! एवढे मोठे जर परसेंटेज असेल तर कोणाचा विश्वास बसेल की, ही केंद्रे योग्य चालली आहेत म्हणून! हे विर्य योग्य आहे असे कोणीच म्हणणार नाही, आणि तसे म्हणतही नाही. म्हणून याची कारणमीमांसा शोधण्याचा प्रयत्न केला, तेव्हा लक्षात आले की, माणसे सगळीकडची परीक्षा फसल्यावर, मग डॉक्टरची परीक्षा घ्यायची, मग त्या जनावराची आणि शेवटी त्या गायीच्या कसोटीला आपले नशीब घासत बसावयाचे असा प्रयत्न करतात. याबाबतीत जाणीव पूर्वक ही गाय माझी आहे, या गायीवर योग्य पद्धतीचा क्रॉस केला पाहिजे, तिच्यापासून जी नवी पिढी निर्माण होईल, ती कोणत्या कॅरेक्टरची निर्माण झाली पाहिजे, असाही प्रयत्न या निमित्ताने झाला पाहिजे. गायीच्या दुधाचे प्रमाण वाढले पाहिजे, त्यातील प्रोटीन्सही वाढली पाहिजेत याबाबतीत तसेच जाणीवपूर्वक प्रयत्न होण्याची गरज आहे. पण तसे होत नाही.

दुर्दैवाची गोष्ट अशी की, ज्याची ' जिनेटिक टेस्ट ' झालेली आहे, असा एखादासुद्धा वळू आम्ही महाराष्ट्रामध्ये निर्माण करू शकलो नाही ! याबाबत... अजूनही टेस्ट चालू आहेत म्हणे ! आपण ज्याला सिद्ध वळू म्हणतो, किंवा ज्याची कॅरेक्टर्स शास्त्रीयदृष्टचा तपासून, 'हा या आमच्या महाराष्ट्रातला सर्वोच्च किताब देण्यास योग्य असा वळू आहे', असे अजूनही धाडसाने म्हणता येत नाही. म्हणून आम्ही परदेशातून मिळेल तो, तोही डोनेशनमधून किंवा कोणी मदत केली म्हणून, एखाद्या संस्थेने मनावर घेतले म्हणून, किंवा एखाद्या संस्थेने त्यांना नको आहे म्हणून, तुम्हाला देऊ केला, अशा प्रकारच्या वळूची आपल्या इकडे आयात केली जाते. परदेशामध्ये याबाबतीत फार काळजी घेतली जाते. विशेषत: वळू म्हणून ज्याचा वापर करावयाचा आहे, त्या वळूची आजी कशी होती, त्याची आई कशी होती, आई किती दूध देत होती,

त्याच्यात तिची आई आणि ज्याचा क्रॉस केला त्या दोन्हीमधील कॅरेक्टर त्याच्यामध्ये किती आल्या, त्याचा प्रयोग पहाण्यासाठी त्याची गुणात्मक खात्री करून घेतली का, हे पाहिले पाहिजे. ह्या सगळ्या बाबी चेक करून घेतल्यानंतर जो पात्र ठरणारा वळू असतो त्याला सिद्ध वळू असे म्हणतात व हीच ती जिनेटिक टेस्ट. ही इतकी अवघड आहे की, अजूनही आम्ही तिच्यापर्यंत पोहोचलो नाही. आम्ही प्राथमिक अवस्थेत आहोत. म्हणजे त्या क्षेत्रातले आमचे 'किंडर गार्डन' चालू आहे. काही देश या क्षेत्रात मात्र 'पीएच्.'डी. झालेले आहेत. या व्यवसायामध्ये डेन्मार्कसारखे किंवा त्याच्या जवळची जी लहान लहान राष्ट्रे आहेत, तेथे त्यांनी दुधाची व लोण्याची 'धवल क्रांती' केली. ही क्रांती करताना त्यांनी खूप कष्ट केलेत, श्रम घेतलेत आणि ते करायला आपणाला फार काळ लागेल. आपण जगासाठी, देशासाठी नंतर पाहू. पण आपल्या संसाराला काही तरी उपयुक्त व्हावे, आपल्या नव्या पिढीला एक पूरक अन्न मिळावे. ही सुदृढ बनावी म्हणून या व्यवसायाकडे पाहण्याची आवश्यकता आहे. असे माझे स्वतःचे मत आहे. या व्यवसायाकडे पहात असताना या क्षेत्रामध्ये आपल्या गावापुरते आपण काय करू शकतो, आपल्या तालुक्या-पुरते आपण काय करू शकतो, याचा विचार करण्याची आवश्यकता आहे, आणि ही आवश्यकता पुरी करण्यास कोणीतरी सरकारी माणूस, एखादा डॉक्टर, किंवा त्याक्षेत्रामध्ये असणारा कोणीतरी हितचिंतक, कोणीतरी व्याख्याता येईल व आपली गरज भागविल, असे म्हणून चालणार नाही. हे तर शेंडीवरचे संकट आहे ! हे दुहेरी संकट टाळावयाचे असेल, आर्थिक आपत्ती टाळावयाची असेल, त्याक्षेत्रात यशस्वी व्हावयाचे असेल, शेतीला पूरक धंदा शोधावयाचा असेल तर, या व्यवसायाची जाणीवपूर्वक निवड केली पाहिजे. आणि हे करण्यासाठी आपल्याला यापुढे शेडचूल्ड ठरवावी लागतील. व त्या प्रमाणे कार्य करावे लागेल.

आपल्या देशात याक्षेत्रातले अनेक नवीन तज्ञ लोक निर्माण झाले आहेत. त्यांचा उपयोग करून घेऊन आपण हा व्यवसाय सुरू केला पाहिजे. आपण आपल्या गावात निरनिराळी व्याख्याने आयोजित करतो, यात्रा करवितो, उरूस करतो, देवधर्माचे करीत असतो, ग्रंथही लावतो. माझी अशी अपेक्षा आहे की, आपल्या भागामध्ये एखादा ज्ञानेश्वरीचा ग्रंथ आपण लावतो आहोत, असे म्हणून जर प्रत्येक गाव आपला वर्षातला एक दिवस दुग्धविकास व्यवसाया- मधील तज्ञ लोकांना बोलवायचे ठरविल तो सुदिन होय! त्याचे मार्गदर्शन घ्यावयाचे आणि त्या गावामध्ये दहा-वीस लोकांनी मनावर घेऊन, आपणाला हा धंदा करावयाचा आहे, अशा इराद्याने प्रयत्न करण्याची आज आवश्यकता आहे.

सातारा तालुक्यामध्ये आरफळ म्हणून एक गाव आहे. तुम्हाला माहिती म्हणून सांगतो. आज त्या गावामध्ये क्रॉस केलेल्या ३०० च्या आसपास गायी आहेत. त्यातल्या पन्नास-साठ गायी त्यांनी प्रथम बाहेरून आणल्या आहेत. परंतु अडीचशे गायी या तिथल्याच गायीवर संकर करून तयार केलेल्या आहेत. आणि त्यातीलच एक गाय जिला गेल्या दोन वर्षापूर्वी महाराष्ट्रामध्ये सर्वोच्च बहुमान मिळाला. सरासरीने दिवसामध्ये ती सत्तावीस लिटर दूध देत होती. हे या जिल्ह्यामध्ये घडू शकते. आपल्या तालुक्यामध्ये एक अटके म्हणून गाव आहे.अटक्याकडे जाताना डाव्या बाजूला, शंकरबुवा यांचा श्री. बाळासाहेब म्हणून पुतण्या आहे. बी. एस्‌सी. ॲग्री. असून त्याच्याकडे २०-२५ गायी आहेत. माझा छंद असल्यामुळे या महाराष्ट्रात कोण 'गोपाल' आहे, तो आमचा मित्र होतो. मी तेथे जाऊन पहातो, तो तेथे काय करतो आहे. मी अटक्यामध्ये पाहिले की, एक तरुण मुलगा आपल्या श्रमाने नवनवीन गायी पैदा करू शकला. त्यांची गुणात्मक वाढ करू शकला. व नोकरी पासून मिळणाऱ्या उत्पन्नापेक्षा तिप्पट-

चौपट उत्पन्न स्वतःच्या अकलेने, मेहनतीने, आपल्या गावामध्ये निर्माण करू शकला आहे. ही काही कमी महत्वाची गोष्ट मानण्याचे कारण नाही!

मी महाराष्ट्रात व बाहेर अनेक ' गोपालांची ' भेट घेतली आहे. तेथे गायीच्या दुधाचे प्रमाण व त्यातील प्रोटीन्स वाढविण्यासाठीही अनेक ठिकाणी जाणीवपूर्वक प्रयत्न होत आहेत. यासाठी हिरवा चारा म्हणून ' लसूण घास ', ' हत्ती घास ', ' कोसबाड येथे आढळणारी ' कू–गाभूळ ', ' स्टॅलो गवत ' अशा अनेक तऱ्हेच्या हिरव्या गवताचे फार्म यासाठी मुद्दाम तयार करण्यात आलेले आहेत. त्याचा उपयोग करून घेवून गायीच्या दुधाची उत्पादन क्षमता जशी वाढविण्यात येते, त्याचप्रमाणे दुग्ध व्यवसायातील रॉ-मटेरियल म्हणून त्याचा उपयोग केला जातो. उदा. धुळे येथे अंजनीचा पाला गायींसाठी वापरतात व त्याच्या लाकडापासून इतर वस्तूही बनविण्यासाठी त्याचा वापर करतात. आपल्या महाराष्ट्रामध्ये तशा रीतीने गायीच्या दुधाची उत्पादनक्षमता वाढविण्याचे प्रयत्नही जाणीवपूर्वक होत आहेत. आपणही ते केले पाहिजेत. आपण पांढरपेशे बनून या व्यवसायाकडे अधिक पहातो असे मला वाटते.

मात्र या क्षेत्रात काम करणाराला थोडं झकपक रहाता येत नाही. त्याला कधी चिखल मातीत उतरावे लागते, कधी कपड्यावर शेणाचा डाग पडतो, कधी एखाद्या गायीच्या शेपटीचा फटकाही मिळतो, तर कधी लाथही मिळते! परंतु हा व्यवसाय करत असताना आपण आपल्या जीवनामध्ये स्वतःच्या पायावर, स्वतःच्या कष्टाने हिंमतीने उभे राहू शकतो, हे आमच्या अनेक तरूण मित्रांनी सिद्ध करून दाखविलेले आहे. त्या आरफळसारख्या गावामध्ये पाच वर्षांपूर्वी एक-दोन गायीसुद्धा आणलेल्या नव्हत्या.

आज तेथे ३०० च्यावर गायी आहेत. तेथे चढाओढ लागलेली असते, ती गायीविषयक ज्ञानाची. गाव त्या चर्चेमध्ये मशगूल असते. ते शास्त्रीयदृष्टया चर्चा करतात, प्रश्न निर्माण करतात, उत्तरे शोधतात. आमचा तेथील एखादा पागोटेवालासुद्धा, ही ए–वन आहे, ती इतक्या टक्क्याची आहे, हीची आई त्या गुणाची होती, तिचा बाप तसा होता आणि म्हणून तिचे हे गुण तिच्या–मध्ये उतरले आहेत आणि ती मागच्या वेताला साधारणपणे ३,००० लिटर दूध देऊन गेली तर या वेतामध्ये तिने ४,२०० लिटर दूध दिले, हे आमचे रामराव-शामराव कुणीही सांगत असतो. याचे कारण काय? तर व्यासंग. या व्यवसायाकडे पाहिले पाहिजे. ते एक काळाची गरज म्हणून, आपणाला आपली अर्थव्यवस्था सुधारण्यासाठी मिळालेला एक मार्ग म्हणून, या व्यवसायाकडे पाहिले पाहिजे; असे मला वाटते. म्हणून त्यादृष्टीने यासर्व गोष्टींचा विचार होणे आवश्यक आहे. गावागावत शिबीरे घेऊन विशेषतः तरूण मित्रांनी या प्रश्नाकडे जास्त जाणीवपूर्वक पाहिले पाहिजे. मी माझा अनुभव आपल्याला माहितीसाठी सांगतो. आजची शेती आणि हा दुग्ध व्यवसाय, शिकलेला माणूस न शिकलेल्या माणसापेक्षा जरा बरा करू शकतो. त्याला त्याची आकलन शक्ती उपयोगी पडते. त्याच्याजवळ दुसऱ्याचे ऐकण्याची प्रवृत्ती असते. दुसरीकडे गेला तर तो समर्थपणे चर्चा करू शकतो व त्या दुसऱ्या माणसाकडून काही तरी मिळवू शकतो, असा माझा अनुभव आहे.

मी नेहमी सांगतो की, मी बारा वर्षे शेती केली. परंतु माझ्यापेक्षा अधिक शिकलेला माझा मुलगा माझ्यापेक्षाही चांगली शेती करतो. हे मी माझा मुलगा म्हणून सांगतो असे नाही. मागच्याच वर्षी त्याने शेतात कारली केली होती. दोन फुटाची कारली मी माझ्या आयुष्यात कधीही पाहिली नाही. हजारो कारली दोन

फुटापर्यंत आल्याचे पाहिल्यावर, मी मुंबईहून मुद्दाम शेतावर जाण्यासाठी आलो. चौकशी केली, पाहिले, कळले की, १२–१४ लोकांनी एकच बियाणे आणले होते. ते एकाच कंपनीचे होते, एकाच पिशवीतून आणले होते. आणि एकाच जातीचे होते. १०-१२ शेतकरी एकत्र येऊन त्यांनी कारली लावली. एकाच्या शेतात दोन फुटाची कारली आणि दुसऱ्याच्या शेतात १६ इंचाची तर तिसऱ्याच्या शेतात ७॥ इंचाची अशी त्यांची सरासरी होती. आमच्या मुलाच्या शेतामध्ये सर्वात जास्त उत्पन्न निघाले. दुसऱ्याच्या शेतामध्ये त्यापेक्षा कमी तर तिसऱ्याच्या शेतात सर्वात कमी. हे जर शेती-मध्ये घडू शकते ते आपण लक्षात घेतले पाहिजे. मी मुद्दाम यासाठी उदाहरण दिले की, नवीन शिकलेला माणूस जर या धंद्याकडे प्रवृत्त झाला, त्यात त्याला गोडी निर्माण झाली तर, या दुग्धविकासामध्ये किंवा शेती व्यवसायामध्ये चांगल्याप्रकारे व समर्थपणाने तो काम करू शकतो, हे मी अनुभवले आहे. म्हणून आजची जी राजकीय परिस्थिती आहे, सामाजिक परिस्थिती आहे ती फार कठीण आहे. गावोगाव दिवसाला साधारणपणे शे-पन्नास नवीन पदवीधर झालेली मुले भेटतात. ' नोकरीसाठी चिठ्ठी द्या, चपाटी द्या, याला सांगा, त्याला सांगा ' म्हणून आग्रह धरतात. महाराष्ट्रामध्ये आपण कितीही प्रगती साधली तरी माझ्या समजूतीप्रमाणे आपण प्रतीवर्षी सर्वच क्षेत्रामध्ये, आपण ८० ते ९० हजार नोकऱ्या निर्माण करू शकू. मात्र ग्रॅज्युअेट आणि एस. एस. सी. झालेल्यांची, सुशिक्षीत झालेल्यांची संख्या यापेक्षा कितीतरी पटीने अधिक असते. तो आकडा सरा-सरी ४॥ लाखाच्या आसपास आहे हेही आपण जाणता.

या व्यवसायाच्या बाबतीत मार्गदर्शन करण्यासाठी फार मोठ्या तत्ववेत्या मार्गदर्शकाची फारशी गरज पडत नाही. दोन पुस्तके वाचून कोणाकडे तरी चार शेतकऱ्यांकडे जाऊन, तो व्यवसाय

करणाऱ्याकडे जावून मार्गदर्शन घेण्यापुरता हा व्यवसाय सोपा आहे. मी या व्यवसायाच्या संदर्भात मुद्दामच जरा स्पष्टपणे बोलतो आहे. या व्यवसायासंबंधीची आजची परिस्थिती विचारात घेतली तर, निर्माण होणारे दूध आणि महाराष्ट्रामध्ये खपणारे दूध, त्याला मिळणारे भाव, ह्या सगळ्या गोष्टीचा विचार केला तर पाच वर्षापूर्वी महाराष्ट्रामध्ये दुधाला लिटर मागे सरासरी ९२ पैसे मिळत होते. पण आजची परिस्थिती काय आहे? सरकाने जाहीर करून टाकले की, दूध म्हैसीचे असो किंवा गायीचे असो मग ते क्रॉस केलेल्या गायीचे असो अगर बिगर क्रॉस केलेल्या गायीचे असो त्याचा दर दोन रुपये दहा पैसे लिटर असून, आम्ही त्या दराने तुमचे दूध घेतो. त्या क्षेत्रात आज थोडीशी भावाची हमी या सरकारच्या धोरणामुळे मिळाली आहे. परवा बरखास्त झालेल्या असेंब्लिच्यापूर्वी शरद पवारांचे जे सरकार होते, त्याने हे दर बांधून दिले आहेत. शरदराव पवारांच्या सरकारने या व्यवसाया[illegible] संदर्भात एक अतिशय क्रांतीकारी निर्णय घेतला होता. व्यवसाय नुसता वाढावयाचा, उत्पन्न वाढावयाचे, पण ते दूध कोठेतरी स्वस्त भावाने विकावे लागले तर,तो धंदा पुन्हा मार खाईल, म्हणून एक महत्वाकांक्षी निर्णय त्यांनी घेतला. महाराष्ट्रामधल्या ज्या ज्या खेडेगावामध्ये डेअरी सोसायटया आहेत, ज्या गावामध्ये अडीचशे लिटरपेक्षा दूध निर्माण होऊ शकते. तेथील दूध तिथल्या शाळेतल्या सहा ते अकरा वर्षे वयोगटाच्या विद्यार्थ्यांना दर विद्यार्थ्यामागे एक वेळेला २०० मिली या प्रमाणात सरकारच्या खर्चाने पुरवावयाचे असा तो निर्णय होता. मला वाटते त्याची सुरुवातही झाली होती. त्यावेळी त्याची दोन लाखाच्या आसपास बेनिफिशअरी म्हणजे लाभार्थी विद्यार्थी संख्या होती. तो निर्णय आज ना उद्या लोकांच्या दडपणाने म्हणा किंवा एक सामाजिक गरज म्हणून म्हणा कार्यान्वीत आणावाच लागणार आहे. महाराष्ट्रामध्मे दुग्धव्यव-

सायाच्या धंद्याला उत्तेजन म्हणून गरिबांच्या मुलांना दूध मिळाले पाहिजे. पूरक अन्न मिळाले पाहिजे. त्याद्वारा त्यांचे आरोग्य आणि मनोधैर्य वाढविले पाहिजे. बुद्धीमत्ता सतेज बनविली पाहिजे हा त्याच्या पाठीमागील एक उद्देश होता. महाराष्ट्रामध्ये शेतीच्या धंद्याला पूरक धंदा म्हणून दुग्धव्यसायाला यामुळे हमी मिळणार होती. आमच्या त्यावेळच्या उद्दिष्टाप्रमाणे नजिकच्या काळात विद्यार्थ्यांचे पाच ते दहा लाखांचे कायमचे गिऱ्हाईक उपलब्ध होणार होते. त्याचा पैसा सरकार देणार होते. ती जबाबदारीही आपल्यावर नव्हती. अशा रीतीने या व्यवसायाला कायमचे गिऱ्हाईक मिळण्याची शक्यता निर्माण होते. शिवाय मुंबई-पुण्यासारखे मार्केटही आपल्याला जवळच आहे. गेल्या दोन वर्षा-पर्यंत आपण गुजरातकडून दूध आयात करीत होतो. त्याशिवाय आपल्याला तरणोपाय नव्हता. नाहीतर पावडरचे कारखाने काढून आपणाला पुण्या-मुंबईच्या गिऱ्हाईकांना पावडचे दूध द्यावे लागत होते. व ते आपण देतही होतो. तेही अपुरे पडत होते. आमच्या सरकारने घेतलेला वरील स्वरूपाचा निर्णय दुग्धव्यव-सायाच्या क्षेत्रामध्ये चांगली परिस्थिती निर्माण करणारा होता. आम्ही दुधाला चांगले भाव देण्याचा प्रयत्न केला. त्या धंद्याला उर्जितावस्था आणण्याचा प्रयत्न केला.

दुग्ध व्यवसायाच्या क्षेत्रामध्ये आज नवनवीन माणसे, काही संशोधन घेऊन त्याक्षेत्रात उतरत आहेत. मात्र ग्रामीण भागामध्ये असूनही या व्यवसायाकडे पहाण्याचा दृष्टीकोन जुनाच आहे. कारण या व्यवसायातला एक अभ्यासक आणि शेतकरी, स्वतः धार काढून दूध विकलेला माणूस म्हणून मी तुम्हाला सांगू इच्छितो की, एखाद्या गावातील, जर आपण १०० म्हैसी घेतल्या, त्यांना जे नॉर्मल कोर्समध्ये आपण खायला घालतो, जी वैरण घालतो तीच घातली, पेंड दिली नाही, भुसा दिला नाही. तरीही

ती म्हैस महिन्यापूर्वी व्याली असेल तर, ७ परसेंट फॅटचे दूध देते. म्हैसीच्या दुधाचे फॅट परसेंटेज सातच्या आत कधीही येत नाही. परंतु आपण खेड्यातील कोणत्याही डेरीमध्ये जा तिचे कागद पत्र पहा तेथे नापास झालेल्या दुधाची काय परवड चाललेली असते, महाराष्ट्रामधील या धंद्याला हा एक मोठा धोका आहे. मी मघाशी आपणास मुद्दाम सांगितले की, तुम्ही कोणत्याही गावामध्ये जा, समोर म्हैशी पिळून पहा, त्या दुधाला फॅट मशीन लावा, त्याला सात परसेंट फॅट पेक्षा कमी फॅट कधी येत नाही. हजारो म्हैसी असलेल्या ठिकाणी सुद्धा एखादी म्हैस सात परसेंट फॅट पेक्षा दुधाचा फॅट कमी असलेली मिळत नाही. मात्र डेअरीवर दूध गेले की ते सात परसेंट फॅटचे भरायलाच तयार नाही ! आमच्या काही जुन्या खुळचट कल्पना आहेत, जुन्या माणसांनी सांगून ठेवलेले आहे की, 'दूधात पाणी टाकले नाही तर म्हैसीची कास जळते' काय ह्या खोटया कल्पना ! त्या महादेवाच्या गाभाऱ्याची जशी ती गोष्ट सांगतात-महादेवाला दूधाचा अभिषेक करायचा असे एका गावामध्ये ठरले. त्यासाठी प्रत्येकाने तांब्याभर दूध आणावे असें जाहीर झाले. धूर्तमाणसापैकी प्रत्येकालाच वाटले की, आपण तांब्याभर पाणी नेवून घातले तर ते काय कोणाच्या लक्षात येणार आहे ! सगळयाच गावाचे दूध येणार, आपण तांब्याभर पाणी घेऊन जावू या. आणि तशीच अवस्था आज या दुग्ध व्यवसायाच्या धंद्यामध्ये निर्माण झालेली दिसते. कोणत्याही गावामधल्या डेअरीवर दुधाला फॅट मशीन लावल्याबरोबर कळते की, हे दूध निकशाला उतरत नाही. बिचारा आमच्या शेतकरी मित्रांना किंवा भगिनींना उत्तरे मिळतात, 'नुकतीच व्याली' नाहीतर 'ओला चारा आहे' म्हणून सांगतात. अहो उन्हाळयातही थापा मारतात. म्हणतात 'पाण्यात जास्त वेळ बसली' व 'पाणी जास्त प्याली' अशा ही थापा मारतात. ही लक्षणे चांगली नाहीत. धंदे मार खाण्याची ही लक्षणे आहेत. धंदे

बिघडविण्याचे एक सामाजिक कारण किंवा हा सामाजिक रोग आहे सर्वच क्षेत्रामध्ये हा भेसळीचा रोग पसरलेला आहे. तो काही तुमच्या आमच्या पुरता मर्यादित नाही. शिकलेली, शहाणी सुरती माणसेही धंदेवायीकपणा करतात. तेलात भेसळ करतात, अन्न पदार्थात भेसळ करतात हे आपण अनेक वर्तमानपत्रांतून वाचतो. मग त्या तेलापासून माणसाच्या शरीरावर काय परिणाम होतील, रोग होतील किंवा आणखी काय नुकसान होईल हे कोणीही पहायला तयार नाही. महाराष्ट्र सरकारने दोन वर्षापूर्वी ठरविले की, गायीच्या दुधाला उत्तेजन दिले पाहिजे. गायीचे दूध जर या महाराष्ट्रामध्ये वाढवावयाचे असेल तर, ते वाढू शकते. म्हैसीचे दूध वाढवायाला मात्र अडचणी आहेत. काही मर्यादा आहेत. आपल्या इकडची माणसे फार हुशार. सरकारने गाय व म्हैसीच्या दुधाला सारखाच भाव जाहीर केला. तर मग म्हैसीचे दूध दुप्पट करून बघूया म्हणून काही लोकांनी प्रयत्न केला. त्यांना बिचाऱ्यांना माहिती नाही की, गायीचे आणि म्हैसीचे दूध 'हंसा टेस्ट' मधून तावडतोब कळते. हे कळते हे कळायलाच त्या भेसळ करणाऱ्यांना बराच काळ लागल्यामुळे, त्यांचे हे उद्योग चालूच राहिले. म्हणजे प्रामाणिकपणाने या व्यवसायात उतरणारे कोठेतरी लबाडी करून चार जास्त पैसे मिळतात का, या आशेने प्रयत्न करू लागले. समाजामध्ये हा रोग आज फैलावलेला आहे. या व्यवसायाचा विचार करताना याही गोष्टीचा विचार केला पाहिजे. आणि हे ज्ञानही लोकांच्यापर्यंत पोहोचविले पाहिजे. 'फॅट परसेंटेज' आणि 'एस. एन. एफ.' वाढविण्यासाठी काही मंडळी दुधात साखर घालतात. या धंद्यातला जो तज्ञ आहे त्याला त्याचीही टेस्ट कळते.

प्रामाणिकपणे चांगला व्यवसाय करून परिस्थितीवर मात करण्याऐवजी या व्यवसायात चांगले यश मिळण्याऐवजी, चुकीच्या

पद्धतीने मात करण्याचे प्रयोग अशाप्रकारे याही क्षेत्रात चालू आहेत त्यामुळे काही ठिकाणी डेअरी-सोसायटी नुकसानीत आली. डेअरीच्या संस्था अडचणीमध्ये आल्या. त्या लिक्वीडेशनमध्ये निघाल्या. आता सरकारने दूध घ्यावे. अशी जर तुमची अपेक्षा आहे, तर जो पिणारा माणूस आहे, जो ग्राहक आहे, जो पैसे देतो तोही माणूस आहे. त्याच्या आरोग्याला बाधा येईल किंवा त्याचे काही नुकसान होईल अशी भूमिका कोणतेही सरकार कसे स्वीकारील? कोणतेही सरकार असले तरी, ते भेसळीचे केंद्रावर गेलेले दूध परत पाठविते. परिणामी सोसायटीमध्ये तोटा येतो. अशा सोसायटच्यांचा वर्षाचा किंवा महिन्याचा हिशोब पाहिल्या-नंतर कळते की, एका महिन्यामध्ये सोसायटीस पन्नास टक्के तूट! दूध फॅट परसेंटेजला आणि त्याच्या निकशाला उतरत नाही म्हणून नुकसान होते; असे आपणाला वाचावयास आणि पहावयास मिळते. मग त्या गावामध्ये काम करणारे, ज्यांनी घाम गाळून, श्रम करून, कष्ट करून हा व्यवसाय उभा केलेला असतो. कोणी तरी आपल्या आईचे, बहिणीचे किंवा बायकोचे चार दागीने गहाण ठेवून एखादी गाय किंवा म्हैस खरेदी केलेली असते. कोणी बँकेत जाऊन कर्ज काढलेले असते. त्या माणसांची अवस्था काय होत असेल? याचा विचार करवत नाही. म्हणून लहान गाव असो, मोठा गाव असो सर्वच ठिकाणी या व्यवसायाच्या संदर्भात प्रामाणिकपणाने आणि निष्ठेने काही प्रयत्न होणे ही आजची काळाची गरज आहे.

मला असे वाटते की, महाराष्ट्रातल्या सामान्य शेतकऱ्यां . हिताच्या दृष्टीने, दुग्ध व्यवसायाच्या प्रश्नाकडे तुम्ही आम्ही पाहिले पाहिजे. हा व्यवसाय लोकांनी कोणत्या पद्धतीने केला पाहिजे, दुभत्या जनावरांच्या (गायी) कोणत्या नवनवीन जाती निर्माण करण्याचा प्रयत्न केला पाहिजे. दुधासाठी कोणते मार्केट

शोधले पाहिजे, त्याच्यातला बायप्रॉडक्टस् कोणता निर्माण केला पाहिजे, ते बायप्रॉडक्टस् करणे परवडते काय, या गोष्टींचा मी एक सारखा विचार करीत असतो. या देशामध्ये जेथे दुधाचे उत्पादन मोठ्याप्रमाणात निघते, तेथे निरनिराळे प्लॅन्टस् पहावयास मिळतात. तेथे दुधापासून ' कंपलीट टी ' आणि 'कंप्लीट कॉफी ' तयार करण्याचे उद्योग चालतात. आपण पहाता ती, 'कॅडबरी' चॉकलेट, या व्यवसायात बरीच शहरी व सुशिक्षीत मंडळी आहेत, कॅडबरी चॉकलेटसंबंधी मी त्यांना भेटलो. या व्यावसायिकांचा एक फार्म तळेगाव जवळच्या इंदोरी खेड्यात आहे. तेथे चार–पाचशे गायी आहेत. पण त्यांना तेवढ्यांचे दूध काही पुरत नाही. मध्यंतरी ते परदेशातून दुधाची पावडर आणत होते. आणि मग त्याचे चॉकलेट बनवित होते. चॉकलेटला गायीचे दूध जास्त चांगले. मी मुद्दाम त्यांच्याकडे गेलो आणि पाहिले की, अशा प्रकारचे काही आपल्याला आपल्या येथे करता येईल का? याचा विचार केला. तुम्हाला आश्चर्य वाटेल दूध बाहेरून आणावयाचे, त्यासाठी ट्रान्स्पोर्ट चार्ज भरावयाचा, चार-चार–पाच-पाच हजार रुपये पगाराची ऑफिसर मंडळी नेमावयाची, बनविलेल्या चॉकलेटसाठी खूप पॅकींग खर्च करावयाचा आणि ती विकावयाची, एवढा खर्च करूनसुद्धा त्यांना खूप डिव्हीडंड मिळतो. कल्पना करा की ते शहरी लोक जर हा किफायतशीर व्यवसाय करतात. आपण ग्रामीण भागामध्ये असे काही करणार आहोत की नाही? अशा प्रकारचे दुधाचे उत्पादन तुमचा कराड तालुका करीत आहे आणि त्याला जर दुसरा एखादा पूरक धंदा आपण उभा करीत असू तर आपणालाही तो करता येण्यासारखा आहे. मघाशी सांगितल्याप्रमाणे कॅडबरी चॉकलेट करणाऱ्या कंपनीला जर एवढा फायदा होतो. तो आपण का मिळवू नये? दुसरे असे की, दुग्ध व्यवसायावर अवलंबून असणारे, ' जम्बो आइस्क्रीम ' किंवा ' क्वॉलिटी आइस्क्रीम ' हीसुद्धा दुधापासूनच

बनतात. ग्रामीण भागात निर्माण होणारे दूध शहरात जाते व तिथे त्याचे आइस्क्रीम बनते. तेच खेडयात आणून पुन्हा विकावचे, हे सगळे होऊन सुद्धा या व्यवसायात खूप मोठा नफा उरतो. मग आम्ही का नाही या व्यवसायात उतरायचे? असा विचार आम्ही करणार आहोत की नाही? मी आपणाला सुरुवातीला सांगितले की, या व्यवसायांचे ' रॉ मटेरियल ' निर्माण करण्यासाठी आम्हाला काही मोठा फौजफाटा शोधावा लागणार नाही. त्यासाठी तज्ज्ञ माणसे शोधावी लागणार नाहीत. पगारी माणसे नेमावी लागणार नाहीत. आमच्या घरामधलाच साधा भोळा माणूस हा व्यवसाय करू शकतो. आमची एखादी भगिनी, आई सुद्धा हा व्यवसाय करू शकते. असे असूनही आम्ही तिकडे दुर्लक्ष करतो. सामान्य माणसाला आधारभूत होणारा, त्याच्या जीवना- मध्ये चैतन्य निर्माण करणारा माणूस म्हणून जगण्याचे सामर्थ्य देणारा असा हा व्यवसाय आहे. अशा या व्यवसायाची वाढ करण्याचा जर आम्ही प्रयत्न करणार नसलो तर, आम्ही जी सामाजिक कामे करतो. आहोत, आयुष्यभर जी राजकीय कामे केली. त्यासाठी काही किंमतही मोजली, पण त्याला काहीच अर्थ उरत नाही.

म्हणून मी म्हणतो की, एक सामाजिक सुधारणेचे काम म्हणून, आपल्यापैकी काही लोकांनी ह्या प्रश्नाकडे पाहिले पाहिजे. हे काम मी स्वखुशीने स्वीकारले होते. पण दुर्दैवाने आमदार झालो आणि सगळं विसरून गेलो. नाहीतर हा उद्योग करायचा, या व्यवसायाबद्दल लोकांमध्ये जागृती करायची, म्हैस न पाळता गाय का पाळायची, याची गावोगाव फिरून व्याख्याने द्यायची खेडयामध्ये जाऊन बसायचे, चार शेतकरी भोवती बोलवावयाचे व त्यांना समजूतदारपणे या व्यवसायाकडे वळवायचे असे मी ठरविले होते. पण सगळ्याच गोष्टी ठरविल्याप्रमाणे होतात असे,

नाही आणि नेमके माझ्या बाबतीत तसे घडले आहे, परंतु या व्यवसायाकडे जाणीवपूर्वक पहाण्याची जबाबदारी समाजातल्या काही शहाण्या माणसांनी, जाणत्या माणसांनी, ज्यांना आपला समाज सुधारला पाहिजे, त्याची आर्थिक परिस्थिती सुधारली पाहिजे असे वाटते; त्याने हे काम करण्याची व्रतस्थ म्हणून जबाबदारी स्वीकारण्याची फार मोठी गरज आहे. आज आमचे जे सुशिक्षित तरुण, बेकारीची लेबले लावून नोकरीसाठी गावोगाव फिरतात, नामोहरण होतात, बिचाऱ्यांचे वय निघून जात आहे, त्याना समर्थ बनविण्याचा, त्यांच्यात आत्मविश्वास निर्माण करण्याचा, एक नवा व्यवसाय म्हणून या व्यवसायाकडे त्यांना वळविण्याची गरज आहे. मला वाटते या प्रश्नावर आणखी खूप बोलता येण्यासारखे आहे. परंतु मी कारणापुरते बोललो आहे. या व्यवसायाची आवश्यकता, त्याचे फायदे, आणि तोटे या व्यवसायाची आजची स्थिती या संदर्भात माझी मते, मी आपणा-समोर मांडण्याचा प्रयत्न केला आहे.

हा व्यवसाय खचलेल्या नामोहरम झालेल्या शेतकरी समाजाला माणूस म्हणून समर्थपणे जगावयाला एक साधन बनेल, असा माझ्या सारख्याचा एक सामान्य कार्यकर्ता म्हणून विश्वास आहे. म्हणून हे काम कोठेतरी चांगल्या माणसांनीच एखादे गाव, एखादा मोहल्ला, एखादी आळी, गल्ली वाटून घेऊन, किंवा पाच पंचवीस तरुणांचे गट वाटून घेऊन एक सामाजिक कार्य, राष्ट्रीय कार्य म्हणून त्या कामाला वाहून घेतले पाहिजे. असे वाहून घेण्याचा जर प्रयत्न झाला तर मला खात्री आहे की, महाराष्ट्रातला हा एक चांगला व्यवसाय म्हणून त्याला मान्यता प्राप्त होईल. हजारो तरुणांना आधार देणारा व्यवसाय मिळेल. दुसरी महत्वाची गोष्ट अशी की, त्यामुळे उत्पादन वाढले व उत्पादनाबरोबर लोकांची गरज सुद्धा वाढेल. आज गरिबांच्या घरामध्ये अजूनही

दूध खाण्याची, दूध पिण्याची किंवा लहान मुलांना दूध देण्याची सवय गरिबीमुळे नष्ट झालेली आहे. जे लोक बेकारीच्या रेषेखालील जीवन जगतात त्यांच्या घरामधले दूध खाण्याचे प्रमाण नाममात्र आहे. दूध मिळते म्हटल्यानंतर ग्राहक ते घ्यायला तयार होतो. पूर्वी आपण कोठे आइस्क्रीम खात होतो, कुठें थॉमसन सिडलेस द्राक्षे खात होतो, पूर्वीची कोणती ती जात–भोकरी की काय ? कदाचित आमच्या लहानपणी आम्ही खाल्ली. पण आता मिळतात म्हणून सर्रास थॉमसनच खातात. पूर्वी गावामध्ये सिनेमा पहाणारी किती माणसे होती ? पण जवळ सिनेमाची टॉकिज आल्यानंतर आपण पहातोच की नाही ! त्यांनाही गिऱ्हाईक मिळते. तसेच या दूध धंद्याचेही आहे. हा धंदा चैनीचा म्हणून नाही, तर माणसाच्या जीवनामध्ये ते पूर्ण अन्न म्हणून खाण्याची सवय वाढविली पाहिजे. माणसाच्या वाढीसाठी आरोग्यासाठी, सतेज मनोवृत्तीसाठी त्याला जेवढे चांगले घटक असलेले दूध मिळेल तेवढे फायदेशीर आहे. ते इतर कोणत्याही अन्नामधून, कृत्रिम किंवा नॅचरल अन्नामधून मिळणार नाही. म्हणून दुधाचा वापर अधिकातअधिक वाढविला पाहिजे. समाजातल्या सामान्य माणसापर्यंत एक पूरक अन्न म्हणून दूध जेव्हा पोहोचेल, तेव्हा शारीरिक दृष्टचा संपत्ता अशी नवी पिढी, आरोग्यदायक पिढी निर्माण व्हायला मदत होईल. निरोगी मनाची, निकोप मनाची तरुण पिढी स्वतःबरोबर समाजाचे आणि राष्ट्राचे भवितव्य उज्वल केल्याशिवाय रहाणार नाही.

मला वाटते यापेक्षा ज्यास्तवेळ बोलून आपला वेळ घेणे काही उचित होणार नाही. आपल्या अध्यक्षांनी मला मोठ्या प्रेमाने येथे बोलाविले आणि माझे आपले जे बनलेले विचार, अनुभव होते ते मांडण्याची आपल्यासमोर सांगण्याची संधी दिली त्याबद्दल त्यांचे आभार, मी अपेक्षा करतो की यातल्या काही लोकांनी

जरी मनावर घेतले, आणि या कार्याचा प्रचार करण्याचा निर्णय घेतला, त्यासाठी काही मित्रांनी वाहून घेतले तर त्यातून टक्का-अर्धा टक्का का होईना मी येथे येण्याचे सार्थक झाले असे मी मानीन. यापेक्षा जास्त काही न बोलता आपल्या अध्यक्षांचे, उपाध्यक्षांचे आणि जमलेल्या सर्व बंधू भगिनींचे मनापासून आभार मानतो आणि माझे चार शब्द पुरे करतो.

जयहिंद.



## – व्याख्यानमालेतील यापूर्वीचे व्याख्याते नि विषय –

| व्याख्याते | विषय |
|---|---|
| वर्ष : पहिले १९७३ : | |
| **श्री. देवदत्त दाभोळकर**<br>प्राचार्य, फर्ग्युसन कॉलेज, पुणे. | राजकारण आणि समाजजीवन |
| **आमदार मा. पं. मंगुडकर**<br>पुणे. | भारतीय समाजवाद<br>कांही विचार. |
| **प्रा. गं. बा. सरदार**<br>पुणे. | भारतीय समाजवाद आणि<br>ऐहिक निष्ठा. |
| वर्ष : दुसरे : १९७४. | |
| **प्रा. ए. एम्. खान**<br>श्री शाहू मंदीर महाविद्यालय, पुणे. | भारतीय लोकशाही :<br>कांही विचार. |
| **श्री. वि. अ. नाईक**<br>न्यायमूर्ती, पुणे. | लोकशाही समाजवाद. |
| **श्री. सदाशिव बागाईतकर**<br>पुणे. | अविकसीत देशातील<br>समाजवादाचे स्वरूप |
| वर्ष : तिसरे : १९७५ | |
| **श्री. भा. शं. भणगे**<br>प्राचार्य, चिनाई कॉलेज ऑफ कॉमर्स<br>ॲन्ड इकॉनॉमिक्स, मुंबई. | आजची आर्थिक परिस्थिती व<br>त्यातून बाहेर पडण्याचा मार्ग. |
| **श्री. त्र्यं. कृ. टोपे**<br>कुलगुरु, मुंबई विद्यापीठ, मुंबई. | समाज सुधारणेच्या समस्या. |
| **डॉ. प्र. चिं. शेजवलकर**<br>संचालक,<br>इन्स्टिटयूट ऑफ मॅनेजमेंट<br>डेव्हलपमेंट ॲन्ड रिसर्च, पुणे. | सद्य:स्थिती. |

| व्याख्याते | विषय |
|---|---|
| वर्ष : चौथे :१९७६ : | |
| **श्री. गोपाळराव मयेकर**<br>माजी शिक्षण मंत्री, गोवा व<br>प्राचार्य, देवगड कॉलेज, देवगड. | भारतीय समाजाच्या परिवर्तनाची दिशा आणि वेग. |
| प्रसिद्ध चरित्रकार<br>**पद्मभूषण धनंजय कीर**<br>मुंबई. | राजर्षी शाहू छत्रपती आणि नवभारताची मागणी. |
| वर्ष : सहावे : १९७८ | |
| **डॉ. भालचंद्र फडके**<br>व्याख्याते, मराठी विभाग<br>पुणे विद्यापीठ, पुणे. | डॉ. बाबासाहेब आंबेडकर आणि सामाजिक क्रांती. |
| वर्ष : सातवे : १९७९ : | |
| **आमदार पी. बी. साळुंखे**<br>कोल्हापूर. | महाराष्ट्रातील सामाजिक क्रांतीचे टप्पे. |
| **डॉ. सत्यरंजन साठे**<br>प्राचार्य, लॉ कॉलेज, पुणे. | भारतीय राज्यघटना आणि सामाजिक परिवर्तन. |
| वर्ष : आठवे : १९८०. | |
| **डॉ. जनार्दन वाघमारे**<br>प्राचार्य,<br>राजर्षी शाहू महाविद्यालय, लातूर. | महाराष्ट्रातील राजकारण व समाजकारण : कालचे, आजचे व उद्याचे. |
| **मा. श्री प्रतापराव भोसले**<br>माजी राज्यमंत्री,<br>महाराष्ट्र राज्य. | शेतीचे अर्थशास्त्र व त्यातील दुग्ध व्यवसायाचे स्थान. |

आणि यंदाच्या (१९८१) व्याख्यानमालेत

| | |
|---|---|
| **मा. तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्री जोशी**<br>प्रमुख संपादक, मराठी विश्वकोश, वाई. | विज्ञान आणि मानवी मूल्यें |




प्रीतिसंगमावरील सांस्कृतिक केंद्र — कऱ्हाड नगरपरिषद - नगरभवन व ग्रंथालय.




प्रीतिसंगमावरील सांस्कृतिक केंद्र — कऱ्हाड नगरपरिषद - नगरभवन व ग्रंथालय.